नोव्हेंबर २०२६

# सुवार्ता

स्थापना १५ ऑगस्ट १९५५

श्रद्धेच्या प्रकाशात
संपन्न जीवनासाठी

“जेथे तुझे धन तेथे तुझे मन.” (मत्तय ६:२१)

www.bccb.bank.in
BASSEIN CATHOLIC
CO-OPERATIVE BANK LTD.
(SCHEDULED BANK)
ESTD. 1918
YOUR
DREAM CAR
IS CLOSER
THAN YOU THINK
BCCB
SUPER FAST WHEELZ
VEHICLE LOAN SCHEME
% 7.75 P.A.*
INTEREST RATE
5 YEARS
REPAYMENT TENURE
FOR NEW VEHICLES | PETROL • DIESEL • HYBRID • CNG • ELECTRIC
For more details, Visit your nearest BCCB branch.
Toll Free No: 08069420000
*T&C Apply, Scheme Effective from 18-09-2026



IN ILLO UNO UNUM

*Venerabili Fratri*

FELICI ANTONIO MACHADO

*Archiepiscopo-Episcopo emerito Vasaiensi*

*aureum ordinationis presbyteralis iubilaeum feliciter celebranti, ministerium pastorale studiose exercitum fraternae caritatis officiis gratulamur ac probatam evangelici nuntii sollicitudinem, qua, fecundi varios inter populos dialogi instaurandi et harmoniae promovendae sollicitus, boni Pastoris humanitate exornati praebuit testimonium. Cui dum optima quaeque ominamur, precibus eum prosequimur, caelestia per Apostolicam Nostram Benedictionem exposcentes munera, quam ipsi eiusque propinquis libentes ex animo largimur.*

*Ex Aedibus Vaticanis, die I mensis Octobris, anno Domini MMXXVI.*

Leo PP. XIV

# आर्चबिशप - बिशप फेलिक्स मच्याडो ह्यांना अभिवादन

पोप संत व्दितीय जॉन पॉल

पोप सोळावे बेनेडिक्ट

पोप फ्रान्सिस

पोप चौदावे लिओ

# आर्चबिशप - बिशप महोदयांचे शिल्पकार

आई आणि पाय

ख्रि. फा. बर्नड भंडारी

ख्रि. ब्रदर रॉजर

# Congratulations

to Our Beloved

## Archbishop Emeritus,

# Dr. Felix Machado

GOLDEN SACERDOTAL ORDINATION

Winds of Change extends its heartiest congratulations to
Archbishop (Dr.) Felix Machado
on the momentous occasion of the
Golden Jubilee of your Sacerdotal Anniversary.
Thank you for 50 years of selfless devotion,
spiritual leadership, and untiring service
to the Church and the community.
As you celebrate this remarkable milestone of priesthood,
we pray that God continues to fill your life
with abundant health, peace, and joy.

*"As each has received a gift, use it to serve one another,
as good stewards of God's varied grace."* 1 Peter 4:10

Winds of Change

# Congratulations to Mr. Roland Machado!

Winds of Change proudly congratulates

**Mr. Roland Machado**

on being elected as the **Vice Chairman**

of Cardinal Gracious Memorial Hospital.

Having witnessed his dedicated service to the community
we pray for God's blessings upon his new assignment.

*God Bless.*

# सुवार्ता ८५६

स्थापना : १५ ऑगस्ट १९५५

**नोव्हेंबर २०२६**

**वर्ष ७२ / अंक ४ / मूल्य रु. २०/-**

**संपादक : फा. (डॉ.) जोएल डिकुना**

**संपादक मंडळ :** फा. रॉबर्ट गोन्साल्वीस
फा. डॉमनिक डिआब्रिओ, फा. जॉनी निग्रेल

**सहकार्य :** जॉन गोन्सालविस, जॉन परेरा
हेलन डिसिल्वा, नाझरेथ अथाईत
लुकस परेरा

**मुखपृष्ठ रचना :** सुमित परेरा

**रेखाचित्रे :** रॉबर्ट परेरा

**अक्षरजुळणी :** रिटा डाबरे

**कार्यालयीन सहकार्य :** रेजीना अथाईत



**'सुवार्ता' कार्यालय**
जीवन दर्शन केंद्र, गिरीज
वसई, महाराष्ट्र - ४०१ २०१.

**मोबाईल नंबर्स**

**'सुवार्ता' कार्यालय : 97 02 09 02 31**

**जीवन दर्शन केंद्र : 97 02 09 02 32**

**वेळ : सोमवार ते शनिवार**
सकाळी ९.३० ते दुपारी १२.३०
दुपारी २.३० ते संध्या. ५.३०

E-mail : suvartavasai@gmail.com
Web. : www.suvarta.org


## अंर्तनाद

**पोपमहोदयांचा नोव्हेंबर महिन्यातील प्रार्थना हेतू**

**: संपत्तीच्या समर्पक वापरासाठी प्रार्थना :**

संपत्तीचा यथायोग्य वापर करून, स्वार्थाच्या मोहाला बळी न पडता, गोरगरिबांशी एकात्मता साधत, सर्वांच्या हितासाठी सेवा करता यावी, म्हणून आपण प्रार्थना करूया.

**संत पोप महान लिओ (४४०-४६१)**

स्मृतिदिन: १० नोव्हेंबर

'प्रत्यक्ष जगलेली श्रद्धा प्रसन्न असते; इतरांमधील चूक सुधारण्यात अपयशी ठरणे ही स्वतःमधील चूक असल्याचे चिन्ह असते, तसेच जे लोक इतरांशी कठोर किंवा क्रूरपणे वागतात ते स्वतःचेच नुकसान करून घेतात.'

# अ नु क्र म


| | | |
|---|---|---|
| | : अंतर्नाद | ७ |
| बिशप थॉमस डिसोजा (अधिकृत) | : मुलांच्या आध्यात्मिक जडणघडणीकडे नव्याने पाहूया | ८ |
| संपादक | : संपत्ती व शहाणपण सर्वांगीण स्वास्थ्यासाठी | १० |
| | : आर्चबिशप फेलिक्स मच्याडो : मैलाचे दगड | १२ |
| | : पोप लिओ ह्यांच्या आर्चबिशपांना शुभेच्छा | १३ |
| डॉ. सिंथिया डिकॉस्टा | : श्रद्धा, सेवा आणि समर्पणाची ५० वर्षे | १४ |
| संकलन | : संपादकांस पत्रे | १७ |
| वनिता पटवर्धन | : सण : इंद्रधनुष्यी अंतरंग | १९ |
| फा. ग्लेन फर्नांडीस | : शुद्धीकरणाचे ठिकाण : परिशुद्धीस्थान | २१ |
| फा. नितीन डिसोजा | : ज्यांना आपण विसरलो नाहीत... | २३ |
| अनिल एल. गोन्सालविस | : संत जॉन लॅटरन | २५ |
| स्मिता लोपीस-डिकोष्टा | : बालहक्क संवर्धन व संरक्षण | २७ |
| फा. ॲण्ड्र्यू रॉड्रीक्स | : विश्वबंधू : संत चार्लस दि फुको | ३१ |
| ॲन्थनी मनवेल डाबरे | : संत सिसिलिया | ३२ |
| कॅलेश जे. गोन्सालविस | : देवाच्या सामर्थ्याचे प्रकटीकरण | ३३ |
| सिओना कोरिया | : माझी एक छोटीशी कहाणी...! | ४७ |
| सि. क्रिस्टल तुस्कानो | : बाण डोंगर येथील क्षारनिरास | ४९ |
| फ्रान्सिस अंतोन गावद्या | : मच्छीमार समाज समस्यांच्या जाळ्यात | ५१ |
| रॉबर्ट लोबो | : नेहा बोरा हिस पत्र | ५२ |
| संकलन | : 'सुवार्ता' साहित्य मेळावा | ६७ |
| फा. मायकल जी., ॲड. विल्यम फर्नांडिस, स्टिफन एम. परेरा, संदेश घोलप, पीटर कर्नेल | : 'सुवार्ता' साहित्य मेळावा : बोलक्या प्रतिक्रिया | ७५ |
| स्विनल कर्वाल | : धर्मप्रांतीय युवा दिन : युवा संवाद | ७६ |
| फा. ॲण्ड्र्यू डाबरे, बेन्जामिन केदारकर, ब्रिनल क्रास्टो, वनितामेरी डिमेलो, प्रेसिला परेरा इझाबेल कोरिया, कॅथरीन फरगोज, जेम्स लोपीस, संजीवनी, डॉनल्ड तुस्कानो, डॉ. सुभाष डिसोजा, नागेश राऊत, इग्नेशियस पिंटो, आल्बर्ट कोयलो, | : साद-प्रतिसाद | ७७ |
| ज्यो परेरा, रॉनल्ड ग्रेशियस, विजय रॉड्रिग्ज, नॉर्मा डिसिल्वा, ऋतुजा बने | : कविता | ८२ |
| रोशन लोपीस, जोसेफ डाबरे | : माझे मत | ८३ |
| संदीप राऊत | : पुस्तक परिचय | ८४ |
| झेविअर डिमेलो | : विशाल विश्वात | ८५ |
| संकलन | : वृत्तविहार | ८७ |
| अनिल गोन्साल्वीस | : 'सुवार्ता' शब्दकोडे - १५ | ९२ |
| फा. (डॉ.) जोएल डिकुना | : मनन-चिंतन-मंथन : जीवनातील लक्ष... | ९३ |
| धर्मप्रांतीय उपासना आयोग | : उपासना वर्ष दिनदर्शिका : नोव्हेंबर २०२६ | ९४ |

# मुलांच्या आध्यात्मिक जडणघडणीकडे नव्याने पाहू या...

प्रत्येक कुटुंब हे देवाच्या प्रेमाचे एक छोटेसे मंदिर आहे. ह्या मंदिरात मुलांचे बालपण फुलते, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होते आणि त्यांच्या जीवनाला श्रद्धा, प्रेम, करुणा व सेवाभावाची दिशा मिळते. मुलांचे संगोपन करणे म्हणजे केवळ त्यांना चांगल शिक्षण देणे, आर्थिक दृष्ट्या सक्षम बनविणे किंवा समाजात प्रतिष्ठा मिळवून देणे नव्हे; तर त्यांना देवावर प्रेम करणारे, माणसाचा सन्मान करणारे आणि सत्याच्या मार्गाने चालणारे जबाबदार ख्रिस्ती नागरिक बनविणे होय. आजच्या बदलत्या जगात पालकत्वाची ही जबाबदारी अधिक महत्त्वाची झाली आहे. तंत्रज्ञानाचा झपाट्याने होणारा विकास, कृत्रिम बुद्धिमत्ता, समाजमाध्यमांचा वाढता प्रभाव, स्पर्धात्मक जीवनशैली, स्थलांतर आणि बदलती कौटुंबिक मूल्ये ह्यांमुळे मुलांच्या विचारविश्वावर अनेक प्रकारचे परिणाम होत आहेत. अशा परिस्थितीत पालकांनी आपल्या मुलांना केवळ आधुनिक जगासाठी तयार करणे पुरेसे नाही; तर त्या जगात शुभवर्तमानातील मूल्यांनुसार विवेकाने जगण्यासही शिकविले पाहिजे. पोप लिओ चौदावे ह्यांच्या *'Magnifica Humanitas'* ह्या परिपत्रकात मानवी प्रतिष्ठेचे रक्षण, तंत्रज्ञानाचा जबाबदारीने वापर, कुटुंबाचे महत्त्व आणि मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणाची भूमिका ह्यांवर भर देण्यात आला आहे. ह्या शिकवणीच्या प्रकाशात आपण आपल्या कुटुंबांकडे आणि मुलांच्या आध्यात्मिक जडणघडणीकडे नव्याने पाहण्याची गरज आहे.

**मुलांचे जीवन : देवाने सोपविलेले पवित्र पाचारण :** पवित्र शास्त्र आपल्याला शिकवते की मुले ही परमेश्वराची देणगी आहेत (स्तोत्र १२७:३). मुलांना जन्म देणे ही पालकांसाठी आनंदाची बाब असली, तरी त्यांना प्रेमाने वाढविणे, योग्य संस्कार देणे आणि त्यांच्या जीवनाला योग्य दिशा देणे ही एक पवित्र जबाबदारी आहे. ते ईश्वरी पाचारण आहे. प्रत्येक मूल हे देवाच्या प्रतिमेत निर्माण झालेले आहे. त्याची प्रतिष्ठा त्याच्या बुद्धिमत्तेवर, गुणांवर, आर्थिक परिस्थितीवर किंवा शैक्षणिक यशावर अवलंबून नसते. प्रत्येक मूल प्रेमास, आदरास आणि सुरक्षिततेस पात्र आहे. म्हणूनच पालकांनी आपल्या मुलांची तुलना इतर मुलांशी करू नये. प्रत्येक मुलामध्ये वेगवेगळ्या क्षमता, गुण आणि मर्यादा असतात. काही मुल अभ्यासात प्रगती करतात, काही कला किंवा क्रीडाक्षेत्रात चमकतात; तर काहींमध्ये सेवाभाव, संवेदनशीलता आणि सर्जनशीलता विशेष असते. पालकांनी मुलांच्या गुणांना प्रोत्साहन देतानाच त्यांच्या कमतरतांकडेही समजूतदारपणे पाहिले पाहिजे. मुलांवर आपल्या अपेक्षा लादण्याऐवजी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आदर करणे, त्यांच्या भावना समजून घेणे आणि त्यांना योग्य निर्णय घेण्यासाठी मार्गदर्शन करणे, हे चांगल्या व प्रगल्भ पालकत्वाचे लक्षण आहे.

**पालक : श्रद्धेचे पहिले साक्षीदार :** अनुवादकाच्या नव्हे, तर जीवनातून शिकविणाऱ्या शिक्षकाच्या भूमिकेत पालकांनी उभे राहिले पाहिजे. मुलांना श्रद्धेची ओळख सर्वप्रथम घरातून होते. ते पालकांच्या शब्दांपेक्षा त्यांच्या आचरणातून अधिक शिकतात. पालक एकमेकांशी आदराने वागतात का, गरजू व्यक्तींना मदत करतात का आणि संकटाच्या वेळी देवावर विश्वास ठेवतात का, हे मुलांच्या मनावर खोलवर परिणाम घडवते. प्रत्यक्ष जीवनाची साक्ष देणारी ही शिकवण मुलांच्या मनात खोलवर रुजते. पालकांच्या जीवनातील प्रामाणिकपणा, क्षमाशीलता, संयम आणि प्रेम हे मुलांच्या श्रद्धेचे भक्कम पायाभूत दगड ठरतात. अनुवादित शब्दांपेक्षा जिवंत उदाहरण अधिक प्रभावी असते. म्हणून पालकांनी मुलांना केवळ श्रद्धा शिकवू नये; तर आपल्या दैनंदिन जीवनातून श्रद्धा जगून दाखवावी व त्या श्रद्धेचे साक्षीदार व्हावेत.

**कौटुंबिक प्रार्थना : श्रद्धेच्या जडणघडणीचा पाया :** कुटुंबातील प्रार्थना ही मुलांच्या आध्यात्मिक जीवनाला आकार देणारी महत्त्वाची साधना आहे. रोजच्या धावपळीत कुटुंब एकत्र येऊन प्रार्थना करण्यासाठी वेळ काढणे आवश्यक आहे. दिवसाची सुरुवात देवाच्या आशीर्वादाने करणे, जेवणापूर्वी कृतज्ञतेची प्रार्थना म्हणणे, रात्री झोपण्यापूर्वी दिवसभरातील अनुभव प्रभूच्या चरणी अर्पण करणे ह्या साध्या कृती मुलांच्या श्रद्धेला बळकटी देतात. कुटुंबातील प्रार्थना ही केवळ शब्दांची पुनरावृत्ती नसावी. त्यातून मुलांना देवाशी संवाद साधण्याची, आपल्या चुका मान्य करण्याची, इतरांसाठी प्रार्थना करण्याची आणि मिळालेल्या आशीर्वादांबद्दल कृतज्ञ राहण्याची सवय लागली पाहिजे. पालकांनी मुलांना बायबलमधील कथा सांगाव्यात, येशूच्या जीवनातील प्रसंग समजावून सांगावेत आणि त्या शिकवणीचा दैनंदिन जीवनाशी संबंध जोडावा. प्रेम, क्षमा, दया, नम्रता आणि शांती ही मूल्ये मुलांच्या जीवनात प्रत्यक्ष उतरतील, अशी संधी निर्माण करावी. 'आपण आपल्या मुलांना कोणती श्रद्धा शिकविली?' हा प्रश्न प्रत्येक पालकाने स्वतःला विचारावा. कुटुंबात मुलांना आपलेपणा, सहभाग, जबाबदारी आणि सेवाभाव ह्यांचा अनुभव मिळाला पाहिजे.

**डिजिटल युगातील पालकत्व : तंत्रज्ञानावर प्रभुत्व, तंत्रज्ञानाचे गुलामत्व नव्हे :** आज मुलांचे बालपण मोबाईल, ट्याब, इंटरनेट, व्हिडिओ, ऑनलाईन खेळ आणि समाज माध्यमांच्या प्रभावाखाली घडत आहे. डिजिटल साधने शिक्षण, ज्ञान आणि संवादासाठी उपयुक्त असली, तरी त्यांचा अनियंत्रित वापर मुलांच्या मनावर, नातेसंबंधांवर, एकाग्रतेवर आणि नैतिक विकासावर विपरीत परिणाम करतो. पोप लिओ चौदावे ह्यांच्या *'Magnifica Humanitas'* परिपत्रकातील एक महत्त्वाचा संदेश असा आहे की तंत्रज्ञानाने मानवी व्यक्तीची सेवा केली पाहिजे; मानवी प्रतिष्ठा, स्वातंत्र्य आणि परस्पर संबंध ह्यांना बाधा पोहोचवू नये. ह्या पार्श्वभूमीवर पालकांनी मुलांच्या डिजिटल जीवनाकडे दुर्लक्ष करू नये. त्याऐवजी वयानुसार योग्य मर्यादा, पालकांचे मार्गदर्शन आणि जबाबदार वापराची सवय निर्माण करणे अधिक आवश्यक आहे. तंत्रज्ञानाला पूर्णपणे नाकारण्याऐवजी त्याचा विवेकपूर्ण वापर शिकविणे महत्त्वाचे आहे. मुलांना हे समजले पाहिजे की प्रत्येक गोष्ट तंत्रज्ञान करू शकते म्हणून ती करणे योग्य ठरत नाही. मानवी विवेक, नैतिक जबाबदारी आणि प्रेम ह्यांना कोणतेही तंत्रज्ञान पर्याय ठरू शकत नाही.

**प्रेम आणि शिस्त ह्यांचा समतोल :** मुलांचे संगोपन करताना प्रेम आवश्यक आहे; परंतु प्रेमाबरोबर योग्य शिस्तही तितकीच महत्त्वाची आहे. मुलांना सर्व गोष्टी त्यांच्या इच्छेनुसार मिळाल्या पाहिजेत, असे नाही. त्यांना जबाबदारी स्वीकारणे, नियम पाळणे, वेळेचे नियोजन करणे आणि आपल्या कृतींचे परिणाम समजून घेणे शिकविले पाहिजे. मात्र शिस्त लावताना अपमान, हिंसा, भीती किंवा सततची तुलना ह्यांचा आधार घेऊ नये. मुलांच्या चुका समजून घेऊन त्यांना सुधारण्याची संधी द्यावी. मुलांनी एखादा प्रश्न विचारला किंवा आपल्या भावना व्यक्त केल्या, तर त्यांना समजून घेण्याचा प्रयत्न करावा. येशूने मुलांना आपल्याकडे येऊ दिले आणि त्यांना प्रेमाने स्वीकारले (मार्क १०:१४). प्रभू येशूच्या ह्या कृतीतून आपण शिकतो की मुलांशी वागताना प्रेम, आदर, संयम आणि समजूतदारपणा आवश्यक आहे.

**मुलांना श्रद्धा आणि विवेकाने निर्णय घेण्यास शिकवा :** आजच्या मुलांसमोर अनेक प्रकारची आव्हाने आहेत. मित्रांचा दबाव, यशाची स्पर्धा, समाज माध्यमांवरील आकर्षक प्रतिमा आणि समाजातील बदलती मूल्ये ह्यांमुळे योग्य-अयोग्य ह्यांतील फरक ओळखणे कधी कधी कठीण होते. म्हणून मुलांना केवळ नियम शिकविण्याऐवजी त्या नियमांमागील मूल्ये समजावून सांगणे आवश्यक आहे. मुलांना प्रश्न विचारण्याची मोकळीक द्यावी. त्यांच्या शंका श्रद्धेच्या दृष्टीने समजून घ्याव्यात आणि योग्य मार्गदर्शन करावे. श्रद्धा ही भीतीतून किंवा केवळ परंपरेच्या दबावातून नव्हे; तर देवावरील प्रेम, सत्याचा शोध आणि वैयक्तिक विश्वासातून अधिक दृढ होते. पालकांनी मुलांना शिकवावे की श्रद्धा ठेवणे म्हणजे धार्मिक विधींमध्ये सहभागी होणे नव्हे; तर शाळेत, मित्र परिवारात व डिजिटल जगातही सुवार्तेच्या मूल्यांनुसार जगणे.

**कुटुंबातून सेवाभाव आणि सामाजिक जबाबदारीची शिकवण :** श्रद्धेचा खरा अर्थ आपल्या जीवनातून व्यक्त होतो. आपली संस्कृती आपल्याला शिकवते की कुटुंबाने एकत्र येऊन गरजू लोकांना मदत करावी. आपल्या आजूबाजूला गरीब, आजारी, एकाकी, वृद्ध, दिव्यांग आणि विविध प्रकारच्या अडचणींना सामोरे जाणाऱ्या व्यक्ती आहेत. मुलांना ह्या व्यक्तींकडे करुणेने आणि सन्मानाने पाहण्याची सवय लावली पाहिजे तसेच पर्यावरणाच्या संरक्षणासाठी छोटे उपक्रम राबवावेत. अशा अनुभवांमधून मुलांना समजते की श्रद्धा ही केवळ वैयक्तिक बाब नसून समाजाच्या कल्याणासाठी कार्य करण्याची प्रेरणा आहे. *'Magnifica Humanitas'* मध्ये अधोरेखित केलेल्या मानवी प्रतिष्ठा, ऐक्यभाव, सामाजिक न्याय आणि सर्वांच्या कल्याणाच्या मूल्यांचा कौटुंबिक जीवनात अवलंब केल्यास मुलांना जबाबदार नागरिक बनण्यास मदत होईल.

**कुटुंबे : आशेने भरलेली भावी पिढी :** आपल्या मुलांना आपण कोणती सर्वात मोठी देणगी देऊ शकतो? उच्च शिक्षण, संपत्ती, प्रतिष्ठित नोकरी आणि सुरक्षित भविष्य ह्या सर्व गोष्टी महत्त्वाच्या आहेत. परंतु ह्या सर्वांबरोबर देवावरील दृढ विश्वास, सत्यनिष्ठा, प्रेमळ स्वभाव, योग्य निर्णयक्षमता आणि इतरांची सेवा करण्याची वृत्ती आपण मुलांना दिली, तर त्यांचे जीवन अधिक समृद्ध होईल. आपल्या प्रत्येक घरात प्रार्थनेचा सुगंध असो, संवादाची दारे खुली असोत, क्षमेची भावना नांदो आणि प्रेमाचा प्रकाश सदैव प्रज्वलित राहो. मुलांना घरात देवाच्या उपस्थितीचा अनुभव मिळो. त्यांना आई-वडिलांच्या प्रेमातून स्वर्गीय पित्याच्या प्रेमाची ओळख होवो आणि त्यांच्या जीवनातून ख्रिस्ताचा प्रकाश समाजात पसरत राहो. आपण अशी पिढी घडविण्याचा संकल्प करू या, जी तंत्रज्ञानाचा विवेकपूर्ण वापर करेल, प्रत्येक मानवी व्यक्तीच्या प्रतिष्ठेचा आदर करेल, गरजूंना मदत करेल आणि आपल्या शब्दांनी व कृतींनी शुभवर्तमानाची साक्ष देईल.

**+ बिशप थॉमस डिसोजा**

संपादकीय

# संपत्ती व शहाणपण सर्वांगीण स्वास्थ्यासाठी

सारे जग सध्या संपत्ती आणि आरोग्याबद्दल द्विधा मनस्थितीत आहे. ज्यांच्याकडे आहे, ते अधिक व उत्तम गोष्टींची लालसा बाळगतात; तर शहाणे लोक गरजा, सुखसोयी व चैनीच्या वस्तू कमी करून किमान गोष्टी निवडतात. संपत्ती मिळवून ती टिकविण्यासाठी इच्छा, दृढ निश्चय व आत्मशिस्त लागते. सर्वसामान्यत:, सामान्य लोक स्वत:, कुटुंब व मित्रांसाठी संपत्तीचा ध्यास घेतात; परंतु शहाणे लोक मात्र स्वातंत्र्य, मनःशांती, गरजूंप्रति एकात्मता नि समाजाचे 'सामूहिक हित' पसंत करतात; ते गरजू लोकांसाठी कार्य करण्याकरिता, समाजाच्या सुखसमाधानासाठी जाणीवपूर्वक, विवेकाने चर्चा व विचारविनिमय करून निर्णय घेतात.

**संपत्तीचे ७ स्रोत : ठळक दृष्टिकोन**

१. वैयक्तिक : शक्ती, ऊर्जा, चिकाटी, ज्ञान, कौशल्ये, तंत्रे, अनुभव, इत्यादी.

२. संतुलन : मानसिक समतोल, भावना, संवेदना; तणाव, दबावाचा सामना करण्याची क्षमता.

३. वित्त : पगार, मजुरी, गुंतवणूक, व्यवसाय, बचत इत्यादीं द्वारे मिळणारी आर्थिक संपत्ती.

४. नातेसंबंध : विश्वास; कुटुंब, मित्र, सामाजिक संबंध आणि शेजाऱ्यांसोबतचे नाते.

५. आरोग्य : व्यायाम, आहार, काम, विश्रांती, झोप; स्वतःचा स्वीकार, आवश्यक सुधारणा इत्यादी.

६. वेळ व्यवस्थापन : दैनंदिन वेळापत्रक, पोषक वातावरणाला प्राधान्य आणि सकारात्मक बदल.

७. श्रद्धा / प्रार्थना : निर्मात्याप्रति आस्था, मूल्ये, सद्‌गुण, तत्त्वे, एकाग्रता, ध्येय इत्यादी.

'खरी संपत्ती' ही केवळ मोठा पगार, उधळपट्टी किंवा दिखाऊपणा ह्यात नसून, ती प्रामुख्याने व्यक्तीच्या सकारात्मक दृष्टिकोनाशी, संयमाशी आणि विवेकाशी संबंधित असते.

**बायबलमधील 'संपत्ती'विषयक संकल्पना : मुख्य मुद्दे**

१. संपत्ती देवाकडून येते, ती देवाची, देवाचा गौरव करणारी, देवाकडून मिळालेला आशीर्वाद आहे. ती वापरताना अहंकार, लोभ वा स्वतःवर अति-अवलंबित्व नसावे (अनुवाद ८:१८; स्तोत्र २४:१).




२. देवाने दिलेली संपत्ती ही एक जबाबदारी आहे. संपत्तीद्वारे गरीब आणि गरजू लोकांच्या सहा प्रमुख गटांच्या गरजा पूर्ण करणे अपेक्षित आहे (मत्तय २५:३५-४०; २८:१९-२०).

३. संपत्तीचे मूळ देव त्यामुळे आर्थिक निर्णय हे आध्यात्मिक निर्णय ठरतात (मत्तय २५:१४-३०).

४. संपत्ती देवाच्या योजनासाठी आहे, अहंकार, नाव वा प्रसिद्धीसाठी नाही (नीतिसूत्रे १६:३).

४. संपत्ती ही शिस्त व ज्ञानाद्वारे प्राप्त होते; ती मोठ्या जबाबदारीसह येते (नीतिसूत्रे १०:१४; १२:११; १३:११; १४:२३). त्यामुळे प्रसन्नतेने दान करणे अपेक्षित आहे (२ करिंथकर ९:६-८).

६. बायबलमध्ये संपत्तीचा निषेध केलेला नाही (अब्राहाम, इयोब, शलमोन, इ.); मात्र, पैशांवरील प्रेम, संपत्ती वा मूर्तीची देव म्हणून पूजा करणे ह्या बाबी निषेधार्य आहेत (१ तिमथ्य ६:१०).

७. बायबलमधील संपत्तीची संकल्पना विश्वस्तपण (stewardship), समाधान, देवभक्ती आणि स्वर्गात संपत्ती साठवण्यावर भर देते (मत्तय ६:१९-२०).

८. बायबलनुसार संपत्ती ही नीतिमत्ता, ज्ञान व शाश्वत प्रभावांशी जोडलेली असते; ती मिळवण्यासाठी नेहमी कष्ट, परिश्रम लागत नसतात, ती विनाअट कृपा असते (नीतिसूत्रे १०:२२).

९. संपत्ती इतरांसोबत वाटण्यासाठी दिली जाते. गरीब, असाहाय्य आणि असुरक्षित लोकांसाठी उदार मनाने कार्य करणे, ही केवळ औपचारिकता नसून एक कर्तव्य आहे (१ तिमथ्य ६:१७-१८).

१०.सावधगिरी : संपत्तीमुळे चुकीने सुरक्षिततेची भावना, अहंकार व 'आपण स्वतःच सर्वस्व आहोत' (self-sufficiency) अशा वृत्तीचा आध्यात्मिक धोका असू शकतो (मार्क १०:२३).

'जिथे तुमचे धन तिथे तुमचे मन' असे येशू म्हणतो (लूक १२:३४).

'संपत्ती' (Wealth) हा शब्द अनेकदा 'धनदौलत' (Riches) ह्या अर्थाने वापरला जातो; परंतु 'धनदौलत' ही बाह्य, भौतिक आणि ऐहिक गोष्टींशी संबंधित असते.

'संपत्ती' ही तात्पुरती असते आणि ती सहजपणे नष्ट होऊ शकते (नीतिसूत्रे २३:५).

**सर्वांगीण आरोग्याचे सहा घटक**

सर्वसमावेशक (ग्रीक भाषेत 'होलॉस' *Holos* म्हणजे 'परिपूर्ण' वा 'अखंड') आरोग्य हे शारीरिक, मानसिक, भावनिक, सामाजिक, पर्यावरणीय आणि आध्यात्मिक अशा विविध पैलूंशी संबंधित आहे. हे सर्व घटक संपत्ती, ऐश्वर्य आणि शहाणपणाशी जोडलेले आहेत. 'विवेक' हा सर्व सद्‌गुणांची जननी मानला जात असला, तरी 'नम्रता' हा सर्व सद्‌गुण आणि मूल्यांचा दागिना आहे. म्हणूनच, केवळ संपत्ती किंवा ऐश्वर्य कोणालाही पूर्ण बनवू शकत नाही. जीवनाचे ध्येय किंवा उद्देश केवळ स्वतःची सेवा करणे हा नाही. मेणबत्ती इतरांसाठी जळते, नदी सर्वांसाठी वाहते आणि समुद्र ओढे, नाले व नद्यांचे पाणी सर्वांसाठी साठवून विविध कामी येतो त्याचप्रमाणे, ज्यांच्याकडे संपत्ती आहे, शहाणपणही आहे, अशा व्यक्तींनी कार्यक्षम रुग्णालये, शैक्षणिक जाळी आणि मानवी विकासाशी संबंधित संस्थांच्या माध्यमातून मोठी सेवाकेंद्रे उभारली आहेत. मानवतेच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करतात ते हे सिद्ध करतात की संपत्ती ही ईश्वराची देणगी आहे आणि समाजातील गरीब व गरजू व्यक्तींचाही श्रीमंत लोकांच्या समृद्धीमध्ये वाटा असतो.

**रस्त्यावरील, स्थानबद्ध व तुरुंगातील तरुण**

काय चमत्कार! भारताचे विचित्र चित्र रंगवले जात असताना, जे तरुण भारतात शिकले, चांगल्या संधींच्या शोधात परदेशात गेले होते, त्यांनी परतीचा प्रवास सुरू केला आणि ते पुन्हा भारतात परतले. त्यांनी जात, धर्म, वर्ग, लिंग आणि इतर भेदांच्या भिंती तोडून, रस्त्यावर उतरून, रात्रभर जागरणे सुरू केली, प्रसंगी कारावासाची शिक्षा भोगली. हे तरुण अशा लोकांसाठी उभे राहिले ज्यांना ते ओळखतही नव्हते; त्यांनी दुर्लक्षित तरुणांच्या हक्कांसाठी लढा दिला आणि अधिक चांगल्या देशाच्या भवितव्यासाठी, भारतीय संविधानाच्या बाजूने ठामपणे उभे राहिले. ते अशा मूल्यांसाठी, सद्‌गुणांसाठी आणि तत्त्वांसाठी उभे राहिले, जी त्यांच्या निवडीचे, दृढ धारणेचे आणि एका उदात्त ध्येयाप्रति झेपावलेल्या त्यांच्या वचनबद्धतेचे प्रतिबिंब आहेत. त्यांनी स्वतःचे 'सुख व सुरक्षिततेचे क्षेत्र' (Comfort Zone) सोडले; 'जोखमी क्षेत्र' (Risk Zone) निवडून तेथे पाऊल ठेवले; कारण त्यांना आपल्या स्वातंत्र्यसैनिकांच्या स्वप्नातील 'शांतिपूर्ण क्षेत्र' (Peace Zone) गाठायचे आहे. भविष्याच्या भीतीला न जुमानता, अहिंसा व सत्याग्रहाचा मार्ग चोखाळताना, त्याच वेळी ते एकमेकांशी वैयक्तिक नातेही जपत आहेत.

भारताच्या अशा ध्येयनिष्ठ, दूरदृष्टी असलेल्या आणि देशभक्त तरुणांना आपला सलाम!

**- फा जोएल डिकुना**

## 'सुवार्ता'
## नाताळ विशेषांक २०२६
## : परिसंवाद :

**विषय : संविधान साक्षरता आपला धर्म आणि सांप्रत जीवनातील उपयुक्तता**

**सहभाग :**
**चाकोरीबाहेरील कार्य करणाऱ्या तज्ज्ञ विचारवंतांचा अनुभव**

सोबत कथा, कविता, वैचारिक, आध्यात्मिक लेख आणि बालमेवा.

**- संपादक 'सुवार्ता'**

## मुखपृष्ठाविषयी

पोप महोदयांनी ह्या महिन्यात संपत्तीविषयक समस्यांशी संबंधित विषयावर आधारित प्रार्थना करण्याचे आवाहन केले आहे. त्याप्रमाणे सोने, नाणे, स्थावर, जंगम मालमत्ता ह्यांचा वापर गरीब, गरजवंत, प्राणिमात्र व पर्यावरण ह्यांच्या संवर्धनासाठी करणे क्रमप्राप्त आहे. अनेक साधुसंतांनी 'जेथे तुझे धन, तेथे तुझे मन' हा प्रभू येशू ख्रिस्ताचा सावधानतेचा इशारा प्रमाण मानून इतरांसाठी जीवन वेचले. ख्रिस्त, परमेश्वर व वंचित ह्यांना प्राधान्य दिले. म्हणून आजही आपण त्या ज्ञात आणि अज्ञात संतांचा सण साजरा करतो.

# आर्चबिशप फेलिक्स मच्याडो : आभार, अभिनंदन, अभीष्टचिंतन

## मैलाचे दगड

| | |
|---|---|
| ६ जून, १९४८ | : वसईतील रमेदी येथे आर्चबिशप फेलिक्स मच्याडो ह्यांचा जन्म. आई-वडील : स्वर्गीय कोसुबाई मच्याडो आणि स्वर्गीय अँथनी मच्याडो. |
| १९५४-६१ | : रमेदी चर्च प्राथमिक शाळेत (इयत्ता सातवी) पर्यंतचे शिक्षण. |
| १९६१-६५ | : देवतलाव, सांडोर येथील सेंट थॉमस हायस्कूलमध्ये एस.एस.सी. (इयत्ता ११वी) पर्यंतचे शिक्षण. |
| १९६५ | : गोरेगाव येथील सेंट पायस कॉलेज / सेमिनरीमध्ये प्रवेश. |
| १९६५-७२ | : सेमिनरीमध्ये मानवताशास्त्र, विविध भाषा आणि तत्त्वज्ञानाचा अभ्यास. |
| १९७१, डिसेंबर | : भारत-पाक युद्धादरम्यान कारितासच्या निर्वासित शिबिरात स्वयंसेवक कार्य. |
| १९७२-७३ | : तलासरी मिशन येथे 'रिजन्सी' (प्रशिक्षणातील कार्यानुभव) कालावधी. |
| १९७३-१९७६ | : फ्रान्समधील 'तेझे' विविध पंथीय मठस्थांसोबत कार्य; तसेच फ्रान्समधील कॅथलिक युनिव्हर्सिटी, लिऑन येथून ख्रिस्ती ईशपरिज्ञानाची पदव्युत्तर (Licentiate) पदवी प्राप्त केली. |
| १९७६, ३०ऑक्टो. | : रमेदी चर्च येथे ब्रदर फेलिक्स मच्याडो ह्यांची गुरुदीक्षा. |
| १९७६-७७ | : गिरीज येथील सेंट झेवियर्स चर्चमध्ये साहाय्यक धर्मगुरू म्हणून सेवा. |
| १९७७-७९ | : हॉफस्ट्रा युनिव्हर्सिटीमध्ये चॅपलिन (Chaplain) म्हणून कार्यरत; त्याच काळात मेरीनॉल स्कूल ऑफ थिओलॉजीमधून ईशपरिज्ञानात मास्टर्स पदवी प्राप्त केली. |
| १९७९-८४ | : न्यूयॉर्कमधील फोर्डहॅम युनिव्हर्सिटीमधून, रायमन पानिकर ह्यांच्या मार्गदर्शनाखाली 'ज्ञानेश्वरांची मुक्तीच्या तीन मार्गांविषयीची ईशपरिज्ञानीय संकल्पना' ह्या विषयावर डॉक्टरेट प्राप्त केली. त्यामध्ये त्यांनी अध्यात्माच्या सर्वांगीण प्रारूपाचा शोध घेतला. |
| १९८४-९३ | : सेंट पायस सेमिनरी येथे सैध्दांतिक ईशपरिज्ञान, भारतीय तत्त्वज्ञान आणि जागतिक धर्मांचे प्राध्यापक. |
| १९९३-९९ | : 'पॉन्टिफिकल कौन्सिल फॉर इंटर-रिलीजियस डायलॉग' (PCIRD) / आंतरधर्मीय संवादपरिषद, रोम येथे आशिया विभागासाठी कार्यरत. |
| १९९९-०८ | : PCIRD चे सह कार्यवाह (Under-Secretary) म्हणून सेवा. संपादक, व्हॅटिकनच्या त्रैमासिक 'प्रो दिआलोगो' |
| २००८, १६जाने. | : पोप सोळावे बेनेडिक्ट ह्यांनी मॉन्सिनिअर फेलिक्स मच्याडो ह्यांची नाशिकचे बिशप म्हणून नियुक्ती केली व त्यांना 'आर्चबिशप' हे वैयक्तिक पद प्रदान केले. |
| २००९, १०नोव्हें. | : बिशप थॉमस डाबरे ह्यांच्यानंतर वसईचे बिशप म्हणून नियुक्ती. |
| २००९, १९डिसें. | : वसईचे आर्चबिशप-बिशप म्हणून कथिड्रलमध्ये पदभार स्वीकारला. |
| २००९-१८ | : कॅथलिक बिशप्स कॉन्फरन्स ऑफ इंडिया (CBCI) आंतरधर्मीय संवाद आयोग अध्यक्ष |
| २०१०-१९ | : CBCI च्या 'इक्युमेनिसम' (ख्रिस्ती एकता) आयोगाचे अध्यक्ष तसेच CCBI 'इक्युमेनिसम' विभागाचे अध्यक्ष |
| २०१२-१९ | : 'फेडरेशन ऑफ एशियन बिशप्स कॉन्फरन्सेस' (FABC) च्या 'इक्युमेनिकल अँड इंटर-रिलीजियस अफेअर्स' (ख्रिस्ती एकता आणि आंतरधर्मीय व्यवहार) विभागाचे अध्यक्ष. |
| २०१५-१९ | : 'वेस्टर्न रिजन बिशप्स कौन्सिल'चे अध्यक्ष. |
| २०२०-२४ | : CBCI सरचिटणीस, PCIRD चे सदस्य. २०२४, ६ जून : वसई धर्मप्रांताचे मानद (*Emeritus*) बिशप. |
| २०२५ पासून | : FABC च्या 'इक्युमेनिकल अँड इंटर-रिलीजियस अफेअर्स' विभागाचे अध्यक्ष. |

आर्चबिशप-बिशप फेलिक्स ह्यांचा डॉक्टरेट प्रबंध 'संत ज्ञानेश्वरांची मुक्तीच्या तीन मार्गांविषयीची ईशपरिज्ञानीय संकल्पना' आणि त्यांचे 'जर्नीइंग टुगेदर' (Journeying Together) हे पुस्तक (इंग्रजी, इटालियन व फ्रेंच भाषांत प्रकाशन) आजही सर्वांना मार्गदर्शन करत आहे. ह्याव्यतिरिक्त, 'लुमेन जेंसियुम' ह्या दस्तऐवजाचा त्यांनी केलेला मराठी अनुवाद 'मांगल्याचे माहेरघर' तसेच 'आपली माता ख्रिस्तसभा' व 'मेंढपाळाची वाणी' ही पुस्तके सर्वांसाठी उपयुक्त ठरत आहेत.

आम्ही, वसई धर्मप्रांताचे बिशप थॉमस डिसोझा, धर्मगुरू, व्रतस्थ, श्रद्धावंत व 'सुवार्ता' परिवार, आर्चबिशप फेलिक्स ह्यांनी वसईत, भारतात व वैश्विक चर्चसाठी केलेल्या समर्पित योगदानाबद्दल त्यांचे आभार मानून त्यांच्या कार्याचा गौरव करतात आणि त्यांच्या दीर्घ तद्वत निरोगी आयुष्यासाठी प्रार्थना करतो.

Coat of Arms Motto: *In Illo Uno Unum* [In the One, we are one]

To our Venerable Brother

**FELIX ANTHONY MACHADO**

Archbishop-Bishop *Emeritus* of Vasai

To him who is happily celebrating the Golden Jubilee of his Priestly Ordination, we congratulate him on his Pastoral Ministry, diligently exercised in offices of fraternal charity and on his proven zeal for the Gospel message, by which, being solicitous to establish a fruitful dialogue among various peoples and to promote harmony, he has borne witness adorned with the humanity of the Good Shepherd.

While we wish him every best blessing, we accompany him with our prayers, asking for Heavenly Gifts through Our Apostolic Blessing, which we willingly impart from our heart to him and to his relatives.

From the Vatican Palace,
on the 1st day of the month of October, in the year of our Lord 2026.

**Leo PP. XIV**

---

**बोधचिन्हावरील ब्रीदवाक्यः 'इन इल्लो उनो उनुम' (In Illo Uno Unum)**

[त्या एका ठायी, आपण एक आहोत. ]

आमचे पूज्य बंधू

**आर्चबिशप फेलिक्स अँथनी मच्याडो**

मानद (*Emeritus*) बिशप, वसई धर्मप्रांत

तुमच्या धर्मगुरू दीक्षेची सुवर्णमहोत्सवी जयंती आनंदाने साजरी करीत असलेल्या तुमचे आम्ही, तुमच्या धर्मपाळकीय सेवेबद्दल अभिनंदन करतो. तुम्ही बंधुभावाच्या प्रेमापोटी विविध जबाबदाऱ्या अत्यंत निष्ठेने पार पाडल्या आहेत. सुवार्तेच्या संदेशाबद्दलचा तुमचा उत्कट उत्साह सर्वांच्या लक्षात आहे. भिन्न लोकसमूहांमध्ये फलदायी संवाद प्रस्थापित करण्यासाठी आणि सलोखा वाढविण्यासाठी तुम्ही दाखवलेली तत्परता, 'उत्तम मेंढपाळा'च्या माणुसकीने युक्त अशी साक्ष देत आहे.

आम्ही तुम्हास सर्वोत्कृष्ट आशीर्वादमय शुभेच्छा देतो आणि आमच्या प्रार्थनेद्वारे त्यांची सोबत करतो. आम्ही आमच्या 'प्रेषितीय आशीर्वादा'द्वारे तुमच्यासाठी स्वर्गीय देणग्यांची याचना करतो, तसेच हा आशीर्वाद आम्ही भरल्या अंतःकरणाने तुम्हास आणि तुमच्या आप्तेष्टांना प्रदान करीत आहोत.

व्हॅटिकन पॅलेस,

१ ऑक्टोबर २०२६ ह्या दिनी

**परमगुरू १४ वे लिओ**

# श्रद्धा, सेवा आणि समर्पणाची पन्नास वर्षे

- डॉ. सिंथिया डिकॉस्टा
मुळगाव

धर्मगुरुपदाचे पाचारण हे फक्त एका धर्मग्रामापुरते मर्यादित नसून ते श्रद्धा आणि मानवतेच्या नि:स्वार्थ सेवेची एक प्रेरणादायी गाथा असते. ऑक्टोबर २०२६ मध्ये आर्चबिशप (डॉ.) फेलिक्स मच्याडो आपल्या धर्मगुरुपदाची ५० वर्षे पूर्ण करीत आहेत. आपल्या तल्लख बुद्धिमत्तेने विविध धर्मामध्ये सुसंवाद साधत, श्रद्धावंतांची आत्मीयतेने काळजी घेणारे व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांचे सेवाकार्य ओळखले जाते. वसई येथील त्यांच्या पाळकीय कार्याच्या सुरुवातीपासून ते व्हॅटिकनमधील सेवाकार्यापर्यंत, शिक्षक आणि विद्वान म्हणून केलेल्या योगदानापासून ते नाशिकचे आणि त्यानंतर वसईचे मेंढपाळ म्हणून पार पाडलेल्या जबाबदाऱ्यापर्यंत ह्या पाच दशकांच्या प्रवासाने त्यांना विविध संस्कृती, खंड आणि ख्रिस्तसभेतील अनेक महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्यांशी जोडले आहे. देवाची, ख्रिस्तसभेची आणि श्रद्धावंतांची नम्रतेने केलेली सेवा हेच ह्या संपूर्ण प्रवासाचे केंद्रस्थान आहे.

**श्रद्धेच्या संस्कारांतून सेवाव्रताकडे : जडणघडणीची वर्षे**

आर्चबिशप फेलिक्स मच्याडो ह्यांचा जन्म ६ जून १९४८ रोजी वसईतील रमेदी येथे झाला. त्यांचे आईवडील श्री. अँथनी आणि श्रीमती कोसुबाई ह्यांनी बाल फेलिक्सचे संगोपन कॅथलिक श्रद्धेत केले. त्यामुळे त्यांच्या आध्यात्मिक पाचारणाचे बीज रुजण्यासाठी सुपीक भूमी तयार झाली. तरुण फेलिक्सने स्थानिक धर्मग्रामातील शाळेत आणि नंतर सांडोर येथील सेंट थॉमस हायस्कूलमध्ये शालेय शिक्षण पूर्ण केले. तेथे फा. बर्नर्ड भंडारी ह्यांच्या समर्पणाने ते प्रेरित झाले. मॅट्रिक नंतर त्यांनी गोरेगाव येथील सेंट दहावे पायस सेमिनरीमध्ये धर्मगुरू होण्यासाठी शिक्षण घेतले. पुढे ईशपरिज्ञान अभ्यासासाठी ते फ्रान्समधील लिऑन येथील कॅथलिक विद्यापीठात गेले. तेझे-फ्रान्समधील वास्तव्यात त्यांचा त्या संघाचे संस्थापक, ब्रदर रॉजर, ह्यांच्याशी झालेल्या संस्काराचा त्यांच्या जीवनावर मोठा प्रभाव पडला. प्रार्थना, समेट, सामुदायिक जीवन आणि ख्रिस्ती पंथांमधील ऐक्यभावना ह्यांवर भर देणाऱ्या तेझेच्या अनुभवाने त्यांच्या पुढील सेवाकार्याला महत्त्वपूर्ण दिशा मिळाली.

धर्मगुरू होण्यापूर्वी ब्रदर फेलिक्स ह्यांनी मदर तेरेजा ह्यांच्यासोबत कलकत्ता येथे काम केले होते. १९७१ च्या बांगला देश मुक्तिसंग्रामाच्या काळात भारत-बांगला देश सीमेवरील कारितासच्या शरणार्थीसाठी असलेल्या छावण्यांमध्ये सेवा केली. तसेच तलासरी येथील येशूसंघीय मिशन केंद्रांना सहकार्य केले. अशा प्रकारे सुमारे दशकभराच्या सखोल आध्यात्मिक व धार्मिक प्रशिक्षणानंतर, ३० ऑक्टोबर १९७६ रोजी ब्रदर फेलिक्स ह्यांना रमेदी माता चर्च येथे गुरुदीक्षा देण्यात आली. ब्रदर रॉजर हे ह्या सोहळ्यास उपस्थित होते व ते वसईत एक आठवडा राहिले. (मदर तेरेजाही ह्या सोहळ्याला उपस्थित राहणार होत्या; परंतु ऐनवेळी उद्‌भवलेल्या तातडीच्या कामामुळे त्यांना येणे शक्य झाले नाही.) त्यानंतर फादर फेलिक्स आणि ब्रदर रॉजर ह्यांनी मदर तेरेजा ह्यांची भेट घेतली आणि मिशनरीज ऑफ चॅरिटीच्या सेवाकार्यात सहभाग घेतला.

**पन्नास वर्षांच्या प्रवासाची सुरुवात**

गुरुदीक्षेनंतर, व्हॅलेरियन कार्डिनल ग्रेशियस ह्यांनी, फादर फेलिक्स मच्याडो ह्यांची पहिली नियुक्ती वसईतील गिरीज येथील सेंट फ्रान्सिस झेवियर चर्चमध्ये 'साहाय्यक धर्मगुरू' म्हणून केली. मात्र, त्यांचे याजकीय सेवाकार्य लवकरच स्थानिक सीमांच्या पलीकडे गेले. सात महिने गिरीज येथे कार्य केल्यानंतर फादर फेलिक्स अमेरिकेत गेले आणि तेथील हॉफस्ट्रा विद्यापीठात धर्मगुरू म्हणून सेवा करत असताना त्यांनी आपले उच्च शिक्षणही सुरू ठेवले. मेरी नॉल स्कूल ऑफ थिऑलॉजी येथून त्यांनी धर्मशास्त्रातील पदव्युत्तर पदवी संपादन केली. त्यानंतर १९८४ मध्ये न्यूयॉर्क येथील फोर्डहॅम विद्यापीठातून त्यांनी डॉक्टरेट (Ph.D) प्राप्त केली.

'ज्ञानेश्वरांचे मुक्तीच्या तीन मार्गांचे धर्मशास्त्र' या विषयावरील त्यांच्या संशोधनाला प्रख्यात विचारवंत डॉ. रायमन पनिक्कर ह्यांचे मार्गदर्शन लाभले.

ह्या संशोधनातून आध्यात्मिकतेकडे सर्वांगीण दृष्टिकोनातून पाहण्याचा मार्ग मोकळा झाला. पीएच.डी. पूर्ण केल्यानंतर ते भारतात परतले आणि मुंबईतील सेंट पायस सेमिनरीमध्ये ईशपरिज्ञान व जागतिक धर्म विषयाचे प्राध्यापक म्हणून कार्य करू लागले. फा. फेलिक्स ह्यांनी अनेक धर्मगुरूंना त्यांच्या प्रशिक्षणकाळात मार्गदर्शन केले. धर्मशास्त्र, तत्त्वज्ञान आणि विविध धर्मांचा अभ्यास ह्यांमुळे लोकांना, संस्कृतींना आणि मानवजाती-समोरील समस्यांना अधिक सखोलपणे समजून घेता येते, ही जाणीव त्यांनी भावी धर्मगुरूंमध्ये निर्माण केली.

## संवाद : आर्चबिशप मच्याडो ह्यांच्या याजकत्वाचा निर्णायक पैलू

१९९३ मध्ये पोप द्वितीय जॉन पॉल ह्यांनी फा. फेलिक्स मच्याडो ह्यांना व्हॅटिकनमध्ये सेवेसाठी बोलावले. तेथे १९९९ पर्यंत त्यांनी आशिया विभागाचे प्रभारी म्हणून कार्य केले. १९९९ ते २००८ ह्या काळात मॉन्सिनिअर फेलिक्स मच्याडो यांनी व्हॅटिकनमधील आंतरधर्मीय संवाद विषयक धर्माध्यक्षीय परिषदेचे सह-सचिव (Under-Secretary of the Pontifical Council for Interreligious Dialogue) म्हणून कार्य केले. त्यांच्या याजकीय जीवनातील हा एक अत्यंत महत्त्वपूर्ण टप्पा होता. ह्या काळात त्यांना संत पोप दुसरे जॉन पॉल आणि पोप बेनेडिक्ट सोळावे ह्यांच्याशी निकट संपर्कात काम करण्याची संधी मिळाली. तसेच जगभरातील विविध धर्मांचे नेते, विद्‌वान आणि पंथ ह्यांच्याशीही त्यांचा संवाद वाढत गेला.

आंतरधर्मीय प्रार्थना आणि संवादाशी संबंधित अनेक महत्त्वपूर्ण उपक्रमांमध्ये, विशेषत: असिसी येथील आंतरधर्मीय प्रार्थना आणि संवादाच्या उपक्रमात, त्यांचा मोलाचा सहभाग होता. परस्परांप्रति आदर, मानवी सन्मान, समेट, शांतता आणि सलोखा ह्यांवर आधारलेला संवाद आवश्यक असल्याचे त्यांनी सातत्याने अधोरेखित केले. आपल्यातील भिन्नता ही एकमेकांमध्ये फूट पाडणारी शक्ती न बनता ती ऐक्य वाढविण्याचे माध्यम असायला हवे, असा विचार त्यांनी वारंवार मांडला.

आंतरधर्मीय संवाद आणि शांतता ह्या विषयांवरील परिषदांमध्ये व चर्चासत्रांमध्ये मार्गदर्शन करण्यासाठी त्यांना विविध देशात आमंत्रित केले जात असे. धार्मिक गैरसमज, पूर्वग्रह आणि संघर्ष ह्यांनी ग्रासलेल्या जगात संत ज्ञानेश्वरांच्या

धर्मशास्त्रीय विचारांवरील त्यांचे डॉक्टरेट संशोधन आणि इंग्रजी, इटालियन व फ्रेंच भाषांत प्रकाशित झालेले 'Journeying Together' हे पुस्तक आजही मार्गदर्शक ठरते.

## वसईच्या सेवेतून वैश्विक चर्चच्या नेतृत्वापर्यंत

जानेवारी २००८ मध्ये पोप बेनेडिक्ट सोळावे ह्यांनी मॉन्सि. फेलिक्स मच्याडो ह्यांची नाशिकचे बिशप म्हणून नेमणूक केली आणि त्यांना ‘आर्चबिशप’ हे वैयक्तिक पद बहाल केले. त्यानंतर, नोव्हेंबर २००९ मध्ये बिशप थॉमस डाबरे ह्यांचे उत्तराधिकारी म्हणून त्यांची वसईचे बिशप म्हणून नेमणूक केली.

१९९८ मध्ये स्थापन झालेला वसई धर्मप्रांत त्या काळी तुलनेने नव्याने अस्तित्वात आलेला धर्मप्रांत होता. तथापि, वसईतील कॅथलिक श्रद्धेला पाचशे वर्षांची भक्कम परंपरा लाभली होती. आर्चबिशप मच्याडो ह्यांनी ह्या श्रद्धेचा वसा घेत वसईच्या धर्मप्रांताची ओळख आणि ध्येय अधिक दृढ करण्यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या विद्वत्तापूर्ण मार्गदर्शनाखाली वसईत अपोस्टोलिक नुन्सिओंच्या भेटी, पश्चिम विभागीय बिशप परिषदेच्या बैठका आणि ‘ख्रिस्ती ऐक्य मेळावे’ असे अनेक कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडले. दरवर्षी आर्चबिशप मच्याडो वसई धर्मप्रांतातील धर्मगुरूंच्या वार्षिक ध्यानसाधनेत (रिट्रीट) त्यांच्यासोबत सहभागी होत. ह्या शिबिरांचा भर आध्यात्मिक नूतनीकरण, आत्मचिंतन आणि सामुदायिक प्रार्थना ह्यांवर असे.

‘सुवार्ता’ आणि ‘शांतिदूत’ ह्या वसई धर्मप्रांताच्या मासिकांमधून प्रसिद्ध होणारे त्यांचे आध्यात्मिक चिंतन श्रद्धावंतांना मार्गदर्शन करणारे ठरले. दैनंदिन जीवनात श्रद्धा अधिक सखोलपणे जगण्यासाठी त्यांच्या लेखनाने अनेकांना प्रेरणा दिली. आर्चबिशप मच्याडो ह्यांनी मानवी प्रतिष्ठा, शांतता, संवाद, श्रद्धा, न्याय आणि वंचितांची काळजी ह्या मूल्यांना आपल्या सेवाकार्याच्या केंद्रस्थानी ठेवले. अनेक भाषांवरील त्यांचे प्रभुत्व, तीक्ष्ण बुद्धिमत्ता, दृढ श्रद्धा, वैश्विक चर्चचा अनुभव आणि आंतरधर्मीय संवादातील सहभाग ह्यांमुळे त्यांच्या सेवेला व्यापक दृष्टिकोन प्राप्त झाला.

वसई धर्मप्रांताचे ‘मेंढपाळ’ म्हणून जबाबदारी सांभाळत असतानाच, आर्चबिशप मच्याडो ह्यांनी भारतीय कॅथलिक बिशप परिषदेच्या (CBCI) आंतरधर्मीय संवाद आयोगाचे अध्यक्ष म्हणून २००९ ते २०१८ ह्या काळात कार्य केले. तसेच, २०१० ते २०१९ ह्या कालावधीत त्यांनी ख्रिस्ती पंथांमधील ऐक्य वाढीच्या (Ecumenism) आयोगाचे अध्यक्षपद भूषविले. २०१२ ते २०१९ ह्या काळात ते आशियाई बिशप परिषद महासंघाच्या (Federation of Asian Bishops' Conferences - FABC) ख्रिस्ती पंथांमधील ऐक्य आणि आंतरधर्मीय व्यवहार ह्या विशेष विभागाचे अध्यक्ष होते. त्याचबरोबर, २०१५ ते २०१९ ह्या काळात त्यांनी पश्चिम विभागीय बिशप परिषदेचे अध्यक्षपदही सांभाळले. २०२० ते २०२४ ह्या काळात त्यांनी भारतीय कॅथलिक बिशप परिषदेचे सरचिटणीस म्हणूनही कार्यभार सांभाळला.

जून २०२४ मध्ये नियमानुसार निवृत्त झाल्यानंतरही आर्चबिशप मच्याडो विविध महत्त्वाच्या जबाबदाऱ्यांद्वारे ख्रिस्तसभेची सेवा करीत आहेत. सध्या ते ख्रिस्ती पंथांमधील ऐक्य आणि आंतरधर्मीय व्यवहार (FABC Office of Ecumenical and Interreligious Affairs) ह्या विभागाचे तिसऱ्यांदा अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. ह्या जबाबदारीसाठी त्यांची पुन्हा नियुक्ती होणे, हे ख्रिस्ती ऐक्य आणि आंतरधर्मीय संवाद ह्या क्षेत्रांतील त्यांच्या प्रदीर्घ अनुभवाचे आणि सखोल विद्वत्तेची पोचपावती आहे.

अनेक कार्डिनल आणि आर्चबिशप ह्यांच्यासह ते आंतरधर्मीय संवादविषयक व्हॅटिकनच्या डिकॅस्टरीचे सदस्य-बिशप म्हणूनही कार्यरत आहेत. ह्या विभागाच्या विविध विषयांवरील विचारविनिमयात ते आपले अनुभव आणि अंतर्दृष्टीद्वारे योगदान देतात. ह्या संस्थात्मक जबाबदाऱ्यांपलीकडेही आर्चबिशप मच्याडो आपल्या अभ्यासपूर्ण व्याख्यानांतून आणि प्रवचनांतून श्रद्धावंतांना मार्गदर्शन करीत आहेत. जगभरातील लोकांशी त्यांचा आजही सुरू असलेला संवाद हा आध्यात्मिक मार्गदर्शनाचा आणि चिंतनाचा एक मोलाचा स्रोत ठरत आहे.

**व्यक्तिमत्त्वाचे सप्तरंग, सेवाकार्याचे इंद्रधनुष्य**

इंद्रधनुष्याचे सात रंग निसर्गातील सौंदर्य, विविधता आणि आशेचे प्रतीक आहेत. आर्चबिशप डॉ. फेलिक्स मच्याडो ह्यांच्या याजकीय जीवनाची पन्नास वर्षेही अशाच विविध रंगांनी नटलेली आहेत. त्यांच्या जीवनातील प्रत्येक टप्पा एका विशिष्ट गुणाचे दर्शन घडवतो. इंद्रधनुष्यातील सात रंगांप्रमाणेच त्यांच्या सेवाकार्यातील हे सात पैलू त्यांच्या समृद्ध आध्यात्मिक जीवनाची ओळख करून देतात.

* तेझे येथील अनुभवाने समृद्ध झालेले, सेवेसाठी सदैव तत्पर असलेले तडफदार व्यक्तिमत्त्व.

* निष्ठावंत अध्ययनार्थी, अमेरिकेत ईशपरिज्ञान आणि तत्त्वज्ञानाचे अभ्यास करणारे विद्वान.

* प्रतिभावान प्राध्यापक- सेमिनरीतील विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत, तसेच विविध समुदायांच्या आध्यात्मिक आणि सामाजिक विकासात योगदान देणारे.

* हितचिंतक - बांगला देशातील निर्वासितांसोबत आणि तलासरीतील मिशनमधील लोकांसोबत सेवा करणारे परोपकारी बंधू.

* नम्रता आणि शांतीची वृत्ती जपत व्हॅटिकनद्वारे आंतरधर्मीय संवादाला चालना देणारे तरुण अधिकारी.

* पारदर्शी आणि मनमोकळ्या नेतृत्वातून नाशिक व वसई धर्मप्रांतांत लोकांशी जवळीक साधणारे 'मेंढपाळ.'

* जिद्दी आणि चिकाटीने कार्य करणारे जगभरातील असंख्य धर्मगुरू, व्रतस्थ बंधू-भगिनी, श्रद्धावंत आणि इतर धर्मीयांना प्रोत्साहन देणारे दीपस्तंभ.

ह्या प्रत्येक अनुभवातून आर्चबिशप मच्याडो ह्यांच्या याजकीय जीवनाला नवी अभिव्यक्ती मिळाली. त्यांच्या पाच दशकांच्या प्रवासात असंख्य मिस्सा-बलिदाने, प्रवचने, प्रार्थना, संवाद, प्रेषितीय यात्रा (Apostolic journey), महत्त्वपूर्ण निर्णय, आनंदाचे उत्सव तसेच संघर्ष आणि दुःखाचे क्षण ह्यांचा समावेश आहे. ह्या प्रवासात सार्वजनिक जबाबदाऱ्यांबरोबरच पडद्यामागे घडलेल्या असंख्य निःशब्द सेवाकार्यांचाही वाटा आहे.

धर्मगुरू, प्राध्यापक, व्हॅटिकनचे अधिकारी आणि महागुरू ह्या सर्व पदनामांच्या पलीकडे जाऊन पाहिले, तर आर्चबिशप मच्याडो ह्यांच्या जीवनात एकच मूलभूत हाक सातत्याने दिसून येते - सुवार्तेचे सेवक होण्याची हाक. त्यांचा प्रवास आपल्याला आठवण करून देतो की याजकत्व हे एकाकी जीवन नाही. ते देवाशी, समाजाशी, अन्य धर्मांच्या अनुयायांशी आणि संपूर्ण मानवकुटुंबाशी असलेल्या नात्यांतून जगले जाते.

**प्रीती बंधात गुंफलेला सेवाप्रवास**

पन्नास वर्षांपूर्वी एका तरुण धर्मगुरूने देवाला 'होय' म्हटले. त्या एका होकाराने आर्चबिशप मच्याडो ह्यांना विविध देशात नेले आणि अशा जबाबदाऱ्यांपर्यंत पोहोचविले, ज्यांची कल्पनाही त्यांनी १९७६ मध्ये कदाचित केलीही नसेल. सेवेची ठिकाणे बदलली, सेवाकार्याचे स्वरूप बदलले आणि जबाबदाऱ्यांची व्याप्ती वाढली; परंतु त्यांच्या जीवनातील मूलभूत प्रतिसाद मात्र कायम राहिला - देवाला, चर्चला आणि सेवेला बिनशर्त होकार.

त्यांच्या ह्या प्रत्येक होकारामध्ये प्रेमाचा एक समान धागा दिसून येतो - देवावरील प्रेम, ख्रिस्तसभेप्रति निष्ठा, श्रद्धावंतांबद्दलची आत्मीयता आणि विविध धर्मांच्या लोकांशी संवाद साधण्याची तयारी. ह्या सर्वांतून, 'Love is the greatest' (प्रीती सर्वश्रेष्ठ आहे), ह्या त्यांच्या बोधवाक्याचा प्रत्यय येतो. प्रीती खऱ्या सेवाकार्याचे सार आहे, हे त्यांच्या जीवनप्रवासाने अधोरेखित केले आहे. पन्नास वर्षांपूर्वी प्रभूने त्यांच्या जीवनात सुरू केलेले हे सत्कार्य पुढेही विपुल कृपेने फुलत राहो.

आर्चबिशप डॉ. फेलिक्स मच्याडो ह्यांना उत्तम आरोग्य, आध्यात्मिक सामर्थ्य आणि प्रभूच्या प्रेमात अधिकाधिक समृद्ध होणाऱ्या सेवाजीवनासाठी प्रभूचा आशीर्वाद लाभो, हीच प्रार्थना.

**अनुवाद: डॉ. संगीता सेरेजो,** माणिकपूर

# संपादकांस पत्रे

### उत्कृष्ट मुखपृष्ठ

ऑक्टोबर २०२६च्या 'सुवार्ता' अंकाचे मुखपृष्ठ एवढे छान आहे की वर्णन करायला शब्दच नाही मला सापडत! २ ऑक्टोबरचं ताळमेळ - खूप छान जुळवणी केली आहे. मनाला स्पर्शून जाते. एका बाजूला अहिंसाचे मंत्र देणारे महात्मा गांधीजी व दुसऱ्या बाजूला 'जय जवान जय किसान'चे मंत्र देणारे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्रीजी व मध्ये महान पर्यावरणस्नेही संत असिसीकर फ्रान्सिस. खूपच उत्कृष्ट!

**- डेक्लान जोसेफ पेन,** गास
मोबाईल : 94 20 29 97 78

### कृतज्ञता

'सुवार्ता'मासिकाच्या जडणघडणीत खारीचा वाटा उचलल्याबद्दल आपण माझ्या इतर संबंधित सहकाऱ्यांबरोबर 'सुवार्ता' साहित्य मेळाव्यात अगत्याने जाहीर सन्मान केला, त्याबद्दल मी व्यक्तिशः आपला आभारी आहे.

**-झेवियर डिसोजा,** पानशेत, गिरीज
मोबाईल : 93 21 23 00 91

### ग्रंथसंग्रहाचे स्मरण

'सुवार्ता'मधील 'साहित्यप्रेमी रॉकी लोपीस' हा लेख वाचला. अभिनंदन! फार वर्षापूर्वी मी त्यांच्या घरी गेलो होतो, तेव्हा त्यांचा ग्रंथसंग्रह पाहिला होता, त्याचे स्मरण झाले

**-राजीव रकवी,** वसई

### विचारप्रवर्तक

'सुवार्ता'मधील जोसेफ डाबरे ह्यांचा 'कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) भविष्यातील फायदे आणि आव्हाने' ह्यावर लिहिलेला लेख वाचला. हा लेख अत्यंत माहितीपूर्ण, विचारप्रवर्तक आणि समाजासाठी उपयुक्त आहे. तसेच लुकस परेरा ह्यांचा 'आवे मारिया' हा लेख खूप आवडला. वेलंकनी येथील भक्ती आणि श्रद्धा ह्याविषयी सुंदर व माहितीपूर्ण लेखन केल्याबद्दल मन:पूर्वक आभार!

**- आनंद फिगेर,** गास

### नवीन सदर

'सुवार्ता' मासिकातून 'मला भावलेले पुस्तक' हे नवीन सदर सुरू केले तर इतरांना नवीन पुस्तकांची ओळख होईल. तसेच पुस्तकाचे आदान-प्रदान सुद्धा करता येईल.

**-अजित डिकोष्टा,** चुळणे

### आर्थिक जगताची माहिती

सामान्य वाचकांकडून 'सुवार्ता' च्या बदललेल्या स्वरूपाचे स्वागत होत आहे. त्याबद्दल संपादक मंडळ अभिनंदनास पात्र आहे. ज्याप्रमाणे आपण 'सुवार्ता'मध्ये धार्मिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि क्रीडा जगतातील बातम्यांना स्थान देतो, त्याचप्रमाणे आर्थिक जगतात देखील काय काय चालले आहे? किंवा आर्थिक जगतातील घटनांची माहिती जर आपल्याला एखादया अंकामध्ये देता आली तर त्यावर जरूर विचार व्हावा.

**- रॉबर्ट लोबो,** नंदाखाल
मोबाईल : 93 24 04 00 69

## साद-प्रतिसाद

**'सुवार्ता' डिसेंबर २०२६च्या अंकासाठी**

शब्दमर्यादा : १२५ शब्द

**विषय : भारतीय विद्यार्थी आणि युवा जगत**

आपला अभिप्राय/अनुभव १० नोव्हेंबर २०२६पर्यंत

**'सुवार्ता' ई-मेल : suvartavasai@gmail.com**

## वितरक आणि 'सुवार्ता' परिवार स्नेहमेळावा

'सुवार्ता' चे शब्द वाचकांपर्यंत पोहचविणारे हात म्हणजे सुवार्ता वितरक!
वर्षभर आपण करीत असलेल्या सेवामय हातास आमचा सलाम!
एकत्र भेटू या!

**मंगळ. दिनांक २४ नोव्हें. २०२६ रोजी संध्या. ४.३० वाजता,**

**स्थळ : पहिला मजला सभागृह, जीवन दर्शन केंद्र, गिरीज.**

हेच आमंत्रण समजून आपण स्नेहमेळाव्यास उपस्थित राहावे ही विनंती!

**- संपादक 'सुवार्ता'**

# NOVENA PROGRAM OF VEN. FR. AGNEL D'SOUZA

## FR. AGNEL ASHRAM, BANDSTAND, BANDRA

## 11th to 19th NOVEMBER

**DAILY**

**Morning 7:00 am & 9:30 am and Evening 6:00 pm**

**99th DEATH ANNIVERSARY**



**FRIDAY, 20th November 2026 Morning: 7am & 9:30am**

**HOLY MASSES & NOVENA PRAYER IN ENGLISH**

## FRIDAY 20th November at 6:00 pm
## SOLEMN EUCHARISTIC CELEBRATION BY

**Most. Rev. Bernard Lancy Pinto**
Bishop of Aurangabad

On Sunday 15th November, all Masses and Novena Services will be as on normal Sundays.
On Sunday 15th November, Novena Service will be in Gujarati at 3:00 pm

**THOUSANDS OF DEVOTEES HAVE RECEIVED MIRACULOUS CURES FROM CANCER, T.B., PARALYSIS, ETC., THROUGH THE POWERFUL INTERCESSION OF VEN .FR. AGNELO. FAVOURS OBTAINED AND PETITIONS TO BE PLACED AT THE SHRINE OF VEN. FR. AGNEL, CAN BE SENT TO THE FOLLOWING ADDRESS:**

REV. FR. SUPERIOR,
FR. AGNEL ASHRAM
P. B. No. 6656, Bandstand, Bandra (West)
Mumbai 400 050. Maharashtra, India
Tel: + 91 22 671 14000 Cell: + 91 77380 09137
fragnelashrambandra@gmail.com
www.agnelashram.org

BUS NO. 211, SPECIAL BUS SERVICE TO PLY
FROM BANDRA RAILWAY STATION (WEST)
TO FR. AGNEL GATE

# सण : इंद्रधनुष्यी अंतरंग

-वनिता पटवर्धन
एम.एड्., पीएच.डी. (मानसशास्त्र)

सर्व धर्मांमध्ये विविध प्रकारचे सण साजरे होतात. आता दिवाळी, नाताळ खुणावत आहेत! त्यावेळी आपण ठरावीक उपचार, विधी करणे; मिष्टान्न खाणे किंवा उपासच धरणे; खास पोशाख करणे; स्वच्छता, सजावट व आरास करणे; एकमेकांना भेटणे व शुभेच्छा देणे इत्यादी आवर्जून करतो. संस्कृती आणि आरोग्य ह्यांची नाळ सणांनी पक्की जोडलेली आहे. सणावारी प्रत्येक संस्कृतीतील आहार, विहार, विचार हे संपूर्ण समाजाच्या शारीरिक व मानसिक आरोग्याला अतिशय पोषकच नव्हे, तर उन्नत आयुष्य जगण्याचे परिपूर्ण मार्गदर्शन करतात; कारण धार्मिक सणांना विशिष्ट ऋतूंचे कोंदण असते. डिसेंबर महिन्यातील उत्तर-दक्षिणेच्या ध्रुवीय बर्फाने वेढलेल्या देशामध्ये नाताळमुळे सुहृदांच्या आवर्जून गाठी पडतात, भेटवस्तूंचा आणि गाढ आलिंगनांचा वर्षाव होतो. प्रेमाचा असा पूर वाहिल्यावर गोठणाऱ्या थंडीने येणारी उदासीनता कुठल्या कुठे पळून जाते! दिवाळीत शेतीचे कष्ट विसरून नवे धान्य, भाज्या, फळे ह्यांचा आनंद द्विगुणित होतो!

सण साजरे करताना आपल्या पंचेंद्रियांचे यथास्थित पोषण होते. ते म्हणजे डोळ्यांना उत्तम रंग, सजावट, दीप-प्रकाश, नव्या वस्त्रांतील देखणी रूपे दिसतात; कानांना सुरेल घंटानाद, प्रार्थना, स्तोत्रे, भजने ऐकू येतात; फुले, उदबत्ती, धूप ह्यांचा दरवळ नाकाला सुखावतो; जिभेला चविष्ट आणि पोषक असे अन्न मिळते आणि त्याचबरोबर मायेच्या स्पर्शाचेही सुख मिळते.

सणांमुळे आपली मानसिक गुंतवणूक सुद्धा होते. सण येण्यापूर्वी त्याचे वेध लागतात आणि मनाला उभारी येते. एक व्यवधान मिळाल्यामुळे निराशा, ताण, दुःख ह्या नकारात्मक भावनांचा निचरा होतो आणि आशा, उत्साह, आनंद ह्या सकारात्मक भावनांचे अधिक्य वाढते. पूजा-अर्चा, व्रते, प्रसादाचा नैवेद्य, सजावट हे सगळे श्रद्धेने ओसंडून वाहते. थोर व्यक्तींनी दिलेल्या पराक्रम, त्याग, सामंजस्य, शांतता आणि बंधुभाव ह्या संदेशाचे स्मरण जागे होते. मोठ्या सणांच्या निमित्ताने निघणाऱ्या अनेक मासिकांचे विशेषांक ही तर मोठी बौद्धिक मेजवानी असते!

सण साजरे करणे ही कुटुंबातील एक महत्त्वाची सामायिक कृती असते. कामांच्या वाटणीमुळे कुटुंबामध्ये एकोपा वाढतो. गप्पांमुळे मनाचा कोंडमारा संपतो. परस्परांमधील रुसवे-फुगवे गळून पडतात. किरकोळ दु:खभावाचा संदेश या हृदयीचे त्या हृदयी पोहचतो . रेशमी नात्यांची वीण घट्ट हाते. भक्ती, निष्ठा,

> **सण साजरे करताना सामाजिक भानही ठेवायला हवे.**

श्रद्धा, समर्पण, कृतज्ञता, संयम, उत्तमतेचा ध्यास, सौंदर्याची आराधना अशा उच्च दर्जाच्या भावना पोसल्या जातात. सजावट, आरास करतांना कलात्मकतेला वाव मिळतो. कधी कार्यक्रमांमध्ये गायन, वादन, नृत्य, पाककला, पाठांतर ह्यांची अभिव्यक्ती होते. आपले मनोरंजन होते. सेवा, त्याग, भक्ती ह्या मूल्यांची जोपासना होते. अशाप्रकारे सणांमुळे आयुष्याला सखोल अर्थ प्राप्त होतो.

सण-समारंभ साजरे करण्याचे एक कारण इसो-अहोला प्रेरणा सिद्धांत (Iso-Ahola Motivation Theory) ह्या नुसार नोंदवलेले आहे. माणसाला दैनंदिन धकाधकीमधून, एकसुरी दिनक्रमाच्या चक्रातून अंशत: सुटका मिळण्याची इच्छा असते आणि सण समारंभांमध्ये सामील झाल्यावर ती पूर्ण होते. आपल्याला विरंगुळा मिळतो, घटकाभर उसंत मिळते. सार्वजनिक सणांमध्ये अनेक लोक एकत्र येऊन विविध आघाड्या सांभाळतात. त्यावेळी सहकार्य, संयोजन, एकोपा, नेतृत्व, बंधुत्व, सेवाभाव, सन्मान अशा वृत्ती जोपासल्या जातात. परस्परांमधला वैरभाव कमी होऊन प्रेम रुजते. निरपेक्षतेने गटामध्ये काम करण्याचा अनुभव गाठीशी जमतो. सामाजिक दृढता येते. ह्या विस्तृत समाजाचा मी एक अंश आहे, एका पुरातन संस्कृतीचा मी पाईक आहे, असा अभिमान जागृत होतो; सुरक्षित वाटते!

कधी सार्वजनिक धार्मिक सणांना गालबोट लागते. वर्गणी व देणगी ह्यांचा बाजार होतो, विविध गटांत अवाजवी

आणि अवास्तव चुरस होते, रस्ते तुफान गर्दी आणि बेधुंद आवाजांनी भयग्रस्त होतात, नशिल्या वस्तूंचा प्रसार होतो, कधी गुन्हेगारीपर्यंत मजल जाते. मग हे सण पुरते काळवंडून जातात! ह्याबाबत आपण सावध रहायला हवे. काळानुरूप कुटुंबे छोटी होऊन आपले परस्पर संबंध कसाला लागले आहेत. अशावेळी आपल्या कुटुंबातील महत्त्वाच्या सणाला सर्वांनी एकमेकांचे आवर्जून कौतुक करणे, चुकांबद्दल क्षमा मागणे, समाजात दान देणे, हे करता येईल आणि मग कुटुंबाबरोबरच समाजातही अनेक भावरंग छटा विखुरतील.

vanita.patwardhan@gmail.com •

## जाहिरातदारांसाठी खुलासा

**'सुवार्ता'मध्ये जाहिराती व शोकसमाचार प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंतच स्वीकारल्या जातात** हे आपणास माहीतच आहे. मात्र एकूण पृष्ठसंख्या व जाहिरातींची पृष्ठसंख्या मर्यादित ठेवावी लागत असल्यामुळे रंगीत व कृष्णधवल जाहिरातींची पाने वरील तारखेच्या आत भरली गेल्यास नाईलाजास्तव आम्ही आपली जाहिरात स्वीकारू शकणार नाहीत. म्हणून कृपया शेवटच्या घटकेपर्यंत थांबणाऱ्यांना जाहिरातीसाठी जागा उपलब्ध होऊ शकेलच ह्याची शाश्वती आम्ही देऊ शकत नाही.

**- व्यवस्थापक**


## DOLPHIN INDIA TOURS

**९१५८८५३४९८, ९७६५८७५४७०, ७५०७५३२४४९**

**१) सापूतारा, नाशिक सहल :** दि. १० ते १२ नोव्हें.२०२६. ए. सी. पॅकेज, स्विमिंग पूल. खर्च प्रत्येकी रु. ९,५००/-मात्र.

**२) गोवा, सिंधुदुर्ग, तारकर्ली, देवबाग बीच सहल :** दि. १० ते १५ नोव्हें.२०२६. ए. सी. पॅकेज. खर्च रु. १८,०००/- मात्र.

**३) औरंगाबाद, नाशिक, एवला (शॉपिंग) सहल :** दि. १७ ते २० नोव्हें.२०२६. ए. सी. पॅकेज. खर्च रु. १३,०००/-मात्र.

**४) सिल्वासा, दुधनी, खानवेल सहल :** दि. ७ ते ८ नोव्हें. २०२६. ए. सी. पॅकेज. एकूण खर्च प्रत्येकी रु. ६,२५०/-मात्र.

**५) बडोदा (स्टॅच्यू ऑफ युनिटी) व सुरत सहल :** दि. १५ ते १७ जाने.२०२७. वंदे भारत व इंटरसिटी, ३ए.सी., थ्री स्टार हॉटेल सयाजी, ए.सी.पॅकेज. खर्च रु. १०,५००/-मात्र.

**६) केरळ-मुन्नार, कोचीन, टेकडी, अलॅप्पी, त्रिवेंद्रम, सेंट अल्फान्सो, कन्याकुमारी सहल :** दि. २२ जाने. ते १ फेब्रु. २०२७. रेल्वे प्रवास ए.सी. पॅकेज. खर्च प्रत्येकी रु. ३९,०००/

**७) राजस्थान-जयपूर, जोधपूर, उदयपूर, मा.अबू, बीकानेर, जैसेलमेर, चित्तोडगड सहल :** दि. ११ ते २२ फेब्रु. २०२७. ए. सी. पॅकेज. एकूण खर्च प्रत्येकी रु. ४१,०००/-मात्र.

**८) म्हैसूर, कुर्ग, उडीपी सहल :** दि. ०८ ते १६ फेब्रु. २०२७. ए. सी. पॅकेज. एकूण खर्च प्रत्येकी रु. ३०,०००/- मात्र.

## न्यू अॅन्जल टूर्स अॅन्ड कॅटरर्स

**आयोजक : श्री. मायकल वाझ, दारसेंग, गोम्स आळी, मो. : 9209803602**

**१) संपूर्ण केरळ दर्शन : कोचीन, मुन्नार, टेकडी, अलॅप्पी, कोवलम, त्रिवेंद्रम सहल :** दिनांक ६ ते १४ नोव्हें. २०२६. जाताना ३ AC. (वसई ते कोचीन) येताना राजधानी (त्रिवेंद्रम ते वसई) +AC रूम + घरगुती जेवण + साईटसीन (३ जणांस एक रूम), गेट टुगेदर पार्टीसहीत एकूण खर्च प्रत्येकी रु. ३५,०००/- प्रति व्यक्ती.

**२) ख्रिसमसच्या सुट्टीत धम्माल कोकण-मालवण-गोवा सहल :** दिनांक २६ डिसें. ते ३१ डिसें. २६. जाता-येताना ३Tier AC किंवा २×२ पुश बॅक AC बस + AC रूम + घरगुती जेवण + साइटसीन (४ जणांस एक रूम) गेट टुगेदर पार्टीसहीत एकूण खर्च रु. १८,५००/- प्रति व्यक्ती.

**३) बडोदा-स्टॅच्यू ऑफ युनिटी सहल :** दिनांक २८ डिसें. ते ३० डिसें. २०२६ व दि. २२ जाने. ते २४ जाने. २०२७. जाताना वंदे भारत, येताना सुरत SF, ३ स्टार हॉटेल + व्हेज-नॉनव्हेज बुफे जेवण + साईटसीन (३ जणांस एक रूम), एकूण खर्च रु. १२,०००/- प्रति व्यक्ती.

**४) बाळ येशूच्या सणासाठी नाशिक एक दिवसीय सहल :** दिनांक ०६ फेब्रुवारी २०२७. २×२ पुश बॅक AC बस, घरगुती जेवण. एकूण खर्च रु. २,२००/- प्रति व्यक्ती.
**दोन दिवसीय सहल :** दिनांक ६ ते ७ फेब्रुवारी २०२७. २×२ पुश बॅक AC बस + AC रूम + घरगुती जेवण + साईटसीन. गेट टुगेदर पार्टीसहीत (४ जणांस एक रूम), एकूण खर्च प्रत्येकी रु. ५,५००/- मात्र.
**वरील सर्व सहलीत स्पेशल रूमचा पर्याय उपलब्ध आहे.**

**एप्रिल-मे महिन्यातील आगामी कार्यक्रम**

**१) दिल्ली-सिमला-कुलू-मनाली २) काश्मिर ३) संपूर्ण केरळ दर्शन ४) ताडोबा व्याघ्र प्रकल्प**
**५) मे महिन्यातील वेलंकणी नोव्हेना**

**लग्न, कुमसार, बर्थडे पार्टीच्या ऑर्डस् स्वीकारल्या जातील.**

**संपर्क :**

प्रितम आल्मेडा, भुईगाव : 9271938211, क्लिफर्ड वाझ, दारसेंग : 8149208027, अॅलीयन डाबरे, वाघोली : 9987336830

# शुद्धीकरणाचे ठिकाण : परिशुद्धीस्थान

- फादर ग्लेन फर्नांडीस
OFM, Cap.

जेव्हा आपण स्वर्गात प्रवेश करू, तेव्हा अनेक आत्मे आपल्याकडे येऊन आभार मानतील. आपण विचारू, ''तुम्ही कोण?'' ते म्हणतील, ''मी तो गरीब आत्मा आहे, ज्याच्यासाठी तू मी शुद्धीकरणात असताना प्रार्थना केली.''

**- धन्यवादित फुल्टन शीन**

आपण मेल्यानंतर आपले काय होते? हा प्रश्न प्रत्येक ख्रिस्ती माणसाला पडतो. देऊळमाता स्पष्टपणे शिकवते की, ''मृत्यूनंतर लगेचच आपला आत्मा पृथ्वीवरील शरीरापासून वेगळा होतो आणि आपण देवासमोर न्यायासाठी उभे राहतो. त्या न्यायाच्या वेळी आपण एकतर स्वर्गात प्रवेश करतो किंवा शुद्धीस्थानात जातो किंवा नरकात जातो.'' स्वर्ग हा मानवी जीवनाचा अंतिम उद्देश आहे. तो सर्वोच्च आणि शाश्वत आनंदाची स्थिती आहे. जे सर्व पापांपासून पूर्णपणे मुक्त आहेत ते त्वरित स्वर्गात प्रवेश करतात. नरक मात्र त्यांच्यासाठी आहे ज्यांनी स्वेच्छेने देव आणि त्याचे प्रेम नाकारले आहे. जर आपण गंभीर पापाच्या अवस्थेत राहिलो तर आपण स्वतःला नरकात अडकवतो. ह्या दोन्ही अवस्थांमध्ये शुद्धीकरण हे एक मध्यवर्ती आणि दयाळू ठिकाण आहे. शुद्धीस्थान म्हणजे मृत्यूनंतरच्या न्यायात देवाने दिलेले शुद्धीस्थानाचे ठिकाण. जे लोक देवाच्या कृपेने आणि मैत्रीच्या स्थितीत मरण पावतात, पण अजून पूर्णपणे शुद्ध झालेल नाहीत, ते येथे जातात. त्यांना शुद्धीकरणानंतर स्वर्गात स्थान मिळेल ह्याची पूर्ण खात्री आहे. शुद्धीकरण शिक्षा देण्याचे ठिकाण नसून देवाच्या प्रेमाचे आणि दयाळूपणाचे ठिकाण आहे. येथे आत्म्यांचे अजून शिल्लक असलेले पापांचे परिणाम आणि आसक्ती शुद्ध



होतात, जेणेकरून ते स्वर्गात प्रवेश करण्यासाठी आवश्यक असलेल्या पवित्रतेत प्रवेश करू शकतील. कॅथलिक कॅटेकिझम सांगते की जे देवाच्या कृपेने मरण पावतात पण अजून पूर्णपणे शुद्ध झालेल नाहीत, ते मृत्यूनंतर शुद्धीकरणाच्या प्रक्रियेतून जातात. दुसऱ्या व्हॅटिकन परिषेदेने आणि नंतरच्या पोपनीही ही शिकवण वारंवार अधोरेखित केली आहे. पवित्र शास्त्रात 'शुद्धीकरण' हा शब्द थेट आढळत नसला तरी त्याची शिकवण स्पष्ट आहे. दुसऱ्या मकाबीच्या पुस्तकात यहुदा मकाबी याने मृतांसाठी प्रार्थना केली आणि अर्पण केले,

**आपण मेल्यानंतर आपले काय होते?**

जेणेकरून त्यांना पापांची क्षमा मिळावी. तो म्हणतो की मृतांसाठी प्रार्थना करणे पवित्र आणि चांगल आहे. येशू स्वत: म्हणतो की काही पापांची क्षमा ह्या जगात आणि येणाऱ्या जगातही मिळू शकते. संत पौल सांगतो की प्रत्येक व्यक्तीचे काम अग्नीने तपासले जाईल आणि काही जळून गेले तरी तो स्वत: वाचेल. प्रकटीकरणाच्या पुस्तकातही म्हटले आहे की स्वर्गात काहीही अशुद्ध प्रवेश करणार नाही. म्हणून पूर्ण शुद्धता आवश्यक आहे.

आपण शुद्धीकरणातील आत्म्यांसाठी का प्रार्थना करतो? कारण ते स्वतःसाठी प्रार्थना करू शकत नाहीत, पण आपण त्यांच्यासाठी करू शकतो. आपली प्रार्थना, अर्पण आणि विशेषत: पवित्र मिस्साबली त्यांना लवकर शुद्ध करून स्वर्गात नेण्यास मदत करते. त्याबदल्यात ते स्वर्गात गेल्यावर आपल्यासाठी अधिक शक्तिशाली मध्यस्थ बनतात. हे ख्रिस्ती एकतेचे सुंदर रूप आहे. काही भाविकांना असे जाणवते की त्यांचे मृत नातेवाईक त्यांना प्रार्थना करण्यास विनंती करीत आहे.

संत पाद्रे पिओ ह्यांच्याविषयी असा प्रसंग आहे. एक रात्री संत पाद्रे पिओ प्रार्थना करीत बसले होते. अचानक एक वृद्ध माणूस त्यांच्या समोर उभा राहिला. सर्व दारे बंद होती, म्हणून पाद्रे पिओला आश्चर्य वाटले. त्यांनी विचारले, 'तू कोण आहेस? तुला काय हवे आहे?' तो माणूस म्हणाला, ''पाद्रे पिओ, मी पिएत्रो दी माउरो आहे. मी याच मठात १८ सप्टेंबर १९०८ रोजी मेलो. तेव्हा हे मठ गरिबांचे आश्रयस्थान होते. एका रात्री मी सिगारेट पेटवून झोपलो. गादी पेटली आणि मी जळून, गुदमरून मेलो. मी अजून शुद्धीकरणात आहे. मला मुक्त होण्यासाठी एक पवित्र मिस्साबली हवी आहे. देवाने मला तुमच्याकडे मदतीसाठी पाठवले आहे.'' पाद्रे पिओ म्हणाले, 'निश्चिंत राहा. उद्या मी तुमच्यासाठी मिस्साबली अर्पण करीन.' तो माणूस निघून गेला. दुसऱ्या दिवशी संत पाद्रे

पिओ ह्यांनी चौकशी केली. नोंदीत खरोखरच पिएत्रो दी माउरो या नावाचा माणूस त्याच तारखेला आगीत मेल्याचे सापडले. संत पाद्रे पिओ यांनी त्याच्यासाठी मिस्साबली अर्पण केली.

ह्या संदर्भात 'वीरांचे दान' (Heroic act of charity) ही एक उदात्त प्रथा आहे. ह्या आपण आपल्या सर्व शुभकर्मांचे – प्रार्थना, मिस्साबली, तप आणि दान – संपूर्ण फळ शुद्धीकरणातील आत्म्यांना अर्पण करतो आणि स्वतःसाठी काहीही राखत नाही. हे पूर्ण प्रेमाचे आणि विश्वासाचे कृत्य आहे. ग्रेगोरियन मिस्साबली ही आणखी एक प्राचीन परंपरा आहे. मठाचे अधिकारी असताना, जस्टस नावाचा भिक्षूच्या मृत्यूनंतर काही दिवसांनी संत ग्रेगरी ह्यांच्या मनात त्याच्यासाठी दया आली. त्यांना वाटल की जस्टस अजून शुद्धीस्थानात (पुर्गेटरी) आहे आणि त्याला मदतीची गरज आहे. म्हणून त्यांनी मठाच्या प्रमुखाला सांगितले, ''आपल्या भावासाठी दया दाखवूया. त्याच्या आत्म्यासाठी सलग तीस दिवस मिस्साबली अर्पण करा. एकही दिवस चुकू देऊ नका.'' तीस दिवस नियमितपणे मिस्साबली अर्पण करण्यात आल्या. तिसाव्या दिवशी जस्टस, त्याच्या मित्र कोपिओसस ह्याला स्वप्नात दिसला आणि म्हणाला, ''आतापर्यंत मी दुःखात होतो, पण आज मी मुक्त झालो आहे. मी आता देवाच्या सहभागात प्रवेश केला आहे.'' त्यांनी दिवस मोजले तर नेमका तिसावा दिवस होता. ह्या घटनेनंतर 'तीस सलग मिस्साबली' ही परंपरा सुरू झाली. त्यालाच ग्रेगोरियन मिस्साबली म्हणतात. चर्चच्या परंपरेनुसार ह्या मिस्साबलींना विशेष प्रभावी मानले जाते. आजही अनेक मठ, सेमिनरी आणि मिशनरी संस्था ग्रेगोरियन मिस्साबली अर्पण करतात. सामान्य चर्चमध्ये तीस सलग दिवस एकाच व्यक्तीसाठी मिस्साबली ठेवणे कठीण असते, म्हणून विशेष व्यवस्था करावी लागते. आजकाल काही प्रथा चर्चच्या शिकवणीपासून दूर जातात आणि धोकादायक आहेत. हॅलोवीनसारखे उत्सव मृतांना घाबरवण्यासाठी किंवा त्यांच्याशी खेळण्यासाठी केले जातात. आत्म्यांना बोलावणे, सेन्स, ऑकल्ट किंवा डिव्हिनेशन ह्यांसारख्या गोष्टी पूर्णपणे निषिद्ध आहेत.

देवानेच आत्म्यांना न्यायाच्या मार्गावर नेले आहे. आपण त्यांच्याशी थेट संपर्क साधण्याचा प्रयत्न करू नये. असे करणे म्हणजे देवाच्या अधिकारात हस्तक्षेप करणे. खरा कॅथलिक मार्ग साधा आहे – प्रार्थना करा, मिस्साबली अर्पण करा, कुमसार करा आणि दान द्या. व्यावहारिक दृष्ट्या आपण दररोज शुद्धीकरणातील आत्म्यांसाठी एक छोटी प्रार्थना म्हणू शकतो. शक्य असेल तेव्हा त्यांच्यासाठी मिस्साबली अर्पण करू शकतो. 'शाश्वत जीवन मृतास दे, प्रभू...' ही प्रार्थना वारंवार म्हणू शकतो. नोव्हेंबर महिना मृतांच्या आत्म्यांचा महिना आहे. त्या महिन्यात विशेषतः त्यांच्यासाठी प्रार्थना आणि त्याग करणे फार उपयुक्त आहे. त्याचबरोबर स्वतः पूर्ण शुद्धतेसाठी प्रयत्न करणेही आवश्यक आहे, जेणेकरून मृत्यूनंतर थेट स्वर्गात जाण्याचा मार्ग मोकळा राहो. शुद्धीकरण हे देवाच्या असीम दयाळूपणाचे चिन्ह आहे. ते आपल्याला आठवण करून देते की देव आपल्या सर्वांना पूर्णपणे पवित्र बनवून स्वतःजवळ घेऊ इच्छितो. आपण त्यांच्यासाठी प्रार्थना करूया, जेणेकरून ते लवकरच देवाच्या दर्शनाने आनंदित होतील आणि तेही आपल्यासाठी प्रार्थना करतील. ●

## शोकसमाचार व इतर जाहिरातीविषयी पाळावयाची पथ्ये

'सुवार्ता' मासिकात शोकसमाचाराची माहिती दिली जाते. लांब-दूरच्या लोकांना मृत व्यक्तीविषयी व मरणोत्तर होणाऱ्या विधीविषयी माहिती मिळते. मृत व्यक्ती त्या कुटुंबाला आणि नातेवाईकांना फार मोलाची असते. त्या व्यक्तिविषयी स्मृती उजळविण्यासाठी चांगल्या शब्दांत कुटुंबातील मंडळी त्यांच्याविषयी काव्यात्मक गुंफण करून किंवा अन्य प्रकारे भावना व्यक्त करून मजकूर पाठवत असतात. आपल्या भावनांचा आम्ही आदर करतो. तथापि सारासार विचार करता व संपादक मंडळाचा अनुभव लक्षात घेता, अशा कविता किंवा मृत व्यक्तींना वाहिलेली स्तुतिसुमने 'सुवार्ता' मासिक छापू शकत नाही. त्याऐवजी आपण बायबलमधील सुवचने अंतर्भूत करावी, ही विनंती! **- संपादक**


## SARAH & SARAH TOURS

**Cont. : Prop. Charles : 9930871303**
**C/O - William : 9930832035**

**१. स्टॅच्यू ऑफ युनिटी - बडोदा - सुरत सहल :** दिनांक २८ डिसेंबर ते ३० डिसेंबर २०२६. एकूण खर्च प्रत्येकी रु. ११,०००/- (4 SHARING) वंदे भारत व इंटरसिटी, थ्री स्टार हॉटेल सयाजी इफोटेल.

**२. हैदराबाद-रामोजी फिल्मसिटी-स्नो वर्ल्ड ख्रिसमस सहल :** दिनांक २६ डिसेंबर ते ३१ डिसेंबर २०२६. एकूण खर्च प्रत्येकी रु. १८,५००/- (4 SHARING) 3 A.C. RAILWAY VASAI TO VASAI.

**३. DUBAI SHOPPING FESTIVAL** WITH ABU DHABI, DESERT SAFFARI, AL BURJ KHALIFA 124TH FLOOR, CRUISE, GOLD SUKH. DT. 09 TO 14 JAN. 2027. RS. 1,00,000/-

**४. निराधाराची माता सण – बरोडा, (स्टॅचू ऑफ युनिटी) सहल :** दिनांक २३ जानेवारी ते २५जानेवारी २०२७. एकूण खर्च प्रत्येकी रु. ११,०००/-. (4 SHARING)

**५. बाळ येशू नाशिक तीर्थयात्रा सहल :** दिनांक १३ फेब्रु. ते १४ फेब्रु. २०२७. ३ एकूण खर्च प्रत्येकी रु. ५,५००/- व रु. ६,०००/-. **रेल्वे बुकिंग ६१ दिवस आगाऊ.**

# ज्यांना आपण विसरलो नाहीत...

- फादर नितीन डिसोजा
संत जोसेफ चर्च, उमराळे

१ नोव्हेंबरला आपण सर्व संतांचा सण साजरा करतो आणि २ नोव्हेंबरला आपल्यामधून देवाघरी गेलेल्या आपल्या माणसांची आठवण काढतो. आपण जेव्हा त्यांच्यासाठी प्रार्थना करतो, तेव्हा त्यांच्यासोबत घालवलेला प्रत्येक क्षण आपल्या मनात पुन्हा जिवंत होतो.

माणूस गेल्यावर त्याचे महत्त्व अचानक अधिक जाणवते. आपण त्याच्या चांगल्या गोष्टी आठवतो आणि जपतो. पण कधी कधी वाटते, हेच शब्द, प्रेम, जाणीव त्याच्यापर्यंत ते जिवंत असताना पोहोचली असती तर?

एका कवितेत सुंदर ओळी आहेत -

"Do not stand at my grave
and weep,
I am not there. I am not asleep.
I am a thousand winds that blow,
I am the diamond glints on snow."

आपण आपल्या कामात, चिंतेत आणि कधी कधी स्वतःच्या जगण्यात इतके गुंतलेले असतो की समोरच्या माणसाचे असणे आपल्याला अगदी सहज मिळालेले वाटू लागते. त्याच्या डोळ्यांतील थकवा दिसत नाही. त्याच्या शांततेमागचे काहीतरी ऐकू येत नाही. त्याला आपली गरज आहे की नाही, हे विचारण्या इतकाही वेळ आपण काढत नाही. आपल्या संतांनीही ह्या मानवी स्वभावाकडे अगदी रोखठोकपणे पाहिले आहे. संत तुकाराम महाराजांच्या

*'जिवंत कढई घालिती तेल,*
*मेलिया रडती त्याचे गळ?'*

ह्या ओळी अस्वस्थ करतात. जिवंत माणसाला आपण शब्दांनी दुखावतो, दुर्लक्ष करतो, कधी त्याच्या प्रेमाची किंमत करत नाही आणि तो गेल्यावर मात्र त्यांच्यासाठी रडतो, त्याचे गुण गातो. माणूस गेल्यावर वाहिलेल्या फुलांपेक्षा, तो जिवंत असताना दिलेली एक प्रेमळ मिठी कदाचित त्याच्यासाठी अधिक मौल्यवान असते. 'मी आहे तुझ्यासोबत' हा एक साधा शब्द कदाचित एखाद्या कठीण दिवसाला हलका करून गेला असता.

कधीकधी माणूस अजून आपल्या-समोर श्वास घेत असतो, बोलत असतो; पण त्याच्या जाण्याची चाहूल लागताच आपल्या मनात वेगळेच हिशेब सुरू

**माणूस मेल्यानंतर त्यांचे महत्त्व आपणास अधिक जाणवते.**

होतात. ज्याला आपल्या हाताचा आधार व प्रेमाचे दोन शब्द हवे असतात, त्याच्या जिवंतपणीच आपण त्याच्या खोलीची, पैशांची आणि वस्तूंची वाटणी करू लागतो व त्याच्या मरणाचे नियोजन आधीच रचू लागतो.

मृत्यू जवळ आला की काही वेळा माणसापेक्षा त्याच्या मागे राहणाऱ्या गोष्टी महत्त्वाच्या वाटू लागतात आणि हेच कदाचित सगळ्यात जास्त विचार करायला लावणारे आहे.

असिसीकर संत फ्रान्सिस ह्यांची मृत्यूकडे पाहण्याची दृष्टी आपल्याला थांबवते. त्यांनी मृत्यूला 'Sister Death' (बहीण मृत्यू) म्हणून संबोधले. मृत्यूला शत्रू म्हणून न पाहता, देवाच्या सृष्टीचा आणि आपल्या प्रवासाचा एक भाग म्हणून त्यांनी त्याच्याकडे पाहिले.

संत फ्रान्सिसच्या जीवनात साधेपणा, नम्रता, सेवा आणि प्रत्येक जीवाबद्दलचे प्रेम हे केंद्रस्थानी होते. त्यामुळे 'बहीण मृत्यू' ही कल्पना केवळ मृत्यूबद्दलची भीती कमी करण्यासाठी नव्हती; ती जीवनाकडे अधिक खोलवर पाहण्याची एक दृष्टी होती. ती आपल्याला जीवनाकडे दुर्लक्ष करू नका, एवढेच हळूच सांगते.

थॉमस ग्रे ह्यांच्या प्रसिद्ध कवितेतील ओळी हीच जाणीव आणखी एका पद्धतीने करून देतात -

"The boast of heraldry,
the pomp of pow'r,
And all that beauty,
all that wealth e'er gave,
Awaits alike th' inevitable hour.
The paths of glory lead
but to the grave."

वैभव, सत्ता, सौंदर्य, संपत्ती कितीही असली तरी शेवट प्रत्येकाचा एकच आहे. पण त्या प्रवासात माणसाने माणसाला काय दिले, हे कदाचित अधिक महत्त्वाचे ठरते. आपण कोणाला विसरतो का? कदाचित नाही. आपण फक्त त्यांच्याकडे पाहायचे थांबवतो.

आपल्या अवतीभवती असलेल्या माणसांचे महत्त्व अचानक हरवून जाण्यापूर्वी, आजच त्यांचे बोलणे ऐकून त्यांना आपलेसे करणे गरजेचे आहे. कधी कधी आपण 'नंतर' म्हणत राहतो. पण जीवनाला प्रत्येक गोष्टीसाठी 'नंतर' मिळेलच असे नाही.

मृत्यू शेवट घेऊन येतो. पण त्याआधी जीवन आपल्याला असंख्य क्षण देत असते - पाहण्यासाठी, ऐकण्यासाठी, समजून घेण्यासाठी आणि प्रेम करण्यासाठी. थांबवा आता हे कोरडे सोहळे अन् जिवंत हृदयाचे आजच गाणे ऐका. उद्या उशीर होण्याआधी त्या थकलेल्या जिवाला मिठीत घ्या; कारण थडग्यावर अश्रू गाळण्यापेक्षा, जिवंतपणी दिलेले प्रेमाचे दोन शब्द जास्त पवित्र असतात. शेवटी, मृत्यू तर फक्त शरीर संपवतो, पण माणसाची खरी हत्या आपलेच लोक तो जिवंत असताना करतात.

मोबाईल : 94 83 24 19 82


# ॲरॉन टूर्स ॲन्ड ट्रॅव्हल्स

**आयोजक : श्री. मायकल बरबोज व सौ. आर्पिना बरबोज**

**मो. : 9850533214, 9284503961**

**१) कोकण-गोवा सहल:** दि. १७ नोव्हें. ते २२ नोव्हें. २६. दादर-रत्नागिरी वंदे भारत व थिवीस (गोवा) ते वसई राजधानी. बस प्रवास २x२ बुश बॅक एसी, एसी रूम (चार जणांस एक रूम). गेट टुगेदर पार्टीसहीत खर्च रु.१९,५००/-.

**२) केरळ सहल :** दि. १२ जाने. ते २२ जाने. २०२७. ११ दिवस. वसई ते अर्नाकुलम व त्रिवेंद्रम ते वसई राजधानी ३ ए. सी. बस २x२ ए.सी. (दोन जणांस रूम)एसी रूम, गेट टुगेदर पार्टीसहित एकूण खर्च रु. ४२,५००/-. प्रत्येकी.

**३) बडोदा (Statue of Unity) व सुरत सहल :** दि. २५ ते २७ जानेवारी २७. बोरीवली-बडोदा वंदे भारत व सुरत-विरार इंटरसिटी एसी ३ स्टार हॉटेल सयाजी इफोटेल. खर्च रु. ११,०००/- (४ जणांस एक रूम).

**४) राजस्थान सहल :** दि. २८ जानेवारी ते ८ फेब्रु. २०२७. (एकूण १२ दिवस). एकूण खर्च रु. ४२,५००/- (दोन जणांस एक रूम).

**५) नाशिक सहल :** दि. १३ ते १४ फेब्रु. २०२७.

**६) दुबई-अबुधाबी :** दि. ४ जाने. ते ९ जाने. २०२७.

# D'SILVA TOURS & CATROURS

**आयोजक : क्लेमेंट एलायस डिसिल्वा,** गास चर्चसमोर.

**९८६०५६८५५३,९५७९०२४६२०, ८४४६४३१९६९**

**१) स्टॅच्यू ऑफ युनिटी-बडोदा-सुरत सहल :** मनमोहक मौज मजेची , बरोडा, स्टॅचू ऑफ युनिटी, सुंदर सुरत सहल दिनांक २६ डिसें. ते २८. (नाताळ सणानिमित्ताने). २ रात्र व ३ दिवस हॉटेल वास्तव्य. प्रवास - वंदे भारत ट्रेन - बोरवली ते बडोदा व सुरत-विरार ए.सी इंटरसिटी. ए.सी. हॉटेल, सयाजी इफोटेल विथ अनलिमिटेड बुफे-व्हेज नॉनव्हेज जेवण. साईटसीन- ए सी बसने लक्ष्मी विलास पॅलेस (गायकवाड वाडा), सयाजी गार्डन, निराधार माता श्राईन, मदर ऑफ फॉरसेकन श्राईन. रोझरी चर्चस, स्टॅच्यू ऑफ युनिटी, सरदार वल्लभ भाई पटेल (Viewing Gallery (Chest Level access by lift) नर्मदा धरण, जंगल सफारी आणि येताना सुरत -टिग मोन चॉकलेट व खरेदी. रु. ११,०००/ प्रत्येकी (४ जणांस एक रूम), रु. १२,०००/- प्रत्येकी (३ जणांस एक रूम), रु. १३,०००/- प्रत्येकी (२ जणांस एक रूम).

**२. नाशिक एक दिवसीय सहल : १३ फेब्रुवारी. नाशिक दोन दिवसीय सहल १३ व १४ फेब्रुवारी २०२७.**

१) वेलंकनी भुजींग सेंटर, किरावली : 8552009748

२) सुनिता पोसा, उत्तन : 9833801263, 9222111269

३) स्वाधिना परेरा, मारीभाट, गिरीज : 9823614664

४) क्लेरा आल्मेडा, माणिकपूर : 9892252117

# अल्फान्सो टूर्स ॲण्ड कॅटरर्स

**१) हैद्राबाद सहल - धमाल व फुल एन्जॉय सहल :**

दिनांक २६ डिसेंबर ते ३१ डिसेंबर २०२६.

वसई ते हैद्राबाद आणि हैद्राबाद ते वसई असा संपूर्ण प्रवास 3 rd A.C. ट्रेनने असेल.

एकूण खर्च प्रत्येकी रु. १९,५००/-. मात्र.

**२) स्टॅचू ऑफ युनिट बडोदरा सहल :**

२८ डिसेंबर ते ३० डिसेंबर २०२६. जाताना बोरिवली वरून वंदे भारतने प्रवास. येताना सुरतवरून इंटरसिटी ट्रेनने प्रवास. एकूण खर्च प्रत्येकी रु. १३,०००/-मात्र.

**-: संपर्क :-**

| | |
|---|---|
| नेल्सन अल्फान्सो, गास | : 9970650770 |
| निलम कोरिया, आगाशी (पापडी) | : 9130541082 |
| हेलन डिमेलो, रमेदी | : 7559125435 |
| मॅलेट फर्नांडीस, सांडोर | : 9545329770 |

# सेंट जॉन लॅटरन आर्चबसिलिका : श्रद्धेचा मानबिंदू

- अनिल एल. गोन्सालवीस
रमेदी

जागतिक ख्रिस्तसभा दरवर्षी ९ नोव्हेंबर येशू ख्रिस्ताच्या महामंदिराच्या समर्पणाचा सोहळा साजरा करते. त्या वास्तूची ऐतिहासिक पार्श्वभूमी तितकीच आकर्षक आहे. प्रभू येशू ख्रिस्ताच्या मृत्यूनंतर निरो राजाच्या काळापासून सलग तीन शतके रोममध्ये ख्रिस्ती लोकांचा भयंकर छळ करण्यात आला. सम्राट कॉन्स्टन्टाईन ह्याने ख्रिस्ती धर्माची नीतिमूल्य अंगीकारून स्वत: ख्रिस्ती धर्म स्वीकारला. त्यामुळे रोम शहराचा अधिकृत धर्म ख्रिस्ती म्हणून मान्यता मिळाली. चौथ्या शतकात इ. स. ३१३ साली सम्राट कॉन्स्टन्टाईनच्या दुसऱ्या पत्नीने फॉस्टा (Fausta) हिने पोप संत मिल्टीयाडेस ह्यांना आपला रोम शहराच्या वेशीवरील राजमहल बक्षीस दाखल दिला. पुढे इ. स. ३२४ साली पोप संत सिल्व्हेस्टर ह्यांनी राजमहल मधील ठरावीक भाग अतिपवित्र तारणाच्या नावाने आशीर्वादित करून त्यास जागतिक चर्चचे सर्वोच्च असे लॅटरन महामंदिर (Arch Basilica) म्हणून मान्यता दिली.

हा राजमहल हजारो वर्षे पोपमहाशयांचे निवासस्थान म्हणून वापरला गेला. चौथ्या व सोळाव्या शतकामध्ये ५ धार्मिक पंथाच्या परिषदा व बिशपांच्या २० परिषदा इथेच भरविण्यात आल्या होत्या. त्यांच्या २१ वर्षीय कारकिर्दीत रोमन कॅथलिक ख्रिस्त-सभेसाठी उल्लेखनीय कार्य झाले. रोमन कॅथलिक उपासना गीतामध्ये 'किरिएएलेइझॉन' ('प्रभू दयाळा दया करा') हे गीत समाविष्ट करण्यात आले. पोप संत सिल्व्हेस्टर ह्यांच्या काळात सम्राट कॉन्स्टन्टाईनने संत लॉरेन्स महामंदिर, पवित्र क्रुसाचे महामंदिर व

व्हॅटिकनमधील अनेक वास्तुशिल्पाची उभारणी केली. लॅटरन हे महामंदिर भौगोलिक दृष्ट्या रोम शहराच्या व व्हॅटिकन सिटीच्या बाहेर आहे. आज पोपमहाशय जरी व्हॅटिकन येथे राहत असले तरी रोमचे बिशप म्हणून त्यांचे अधिकृत आसन ह्याच महामंदिरात असते.

ह्या महामंदिराच्या रचनेत आपल्याला रोमन ग्रीक स्थापत्य कला दिसून येते. प्रथम महामंदिराच्या जवळच 'पवित्र पायऱ्या' (Scala Sancta) म्हणून वास्तूचा भाग आहेत. असे मानले जाते की, येशू ख्रिस्तावर जेव्हा खटला चालविण्यास नेत होते, तेव्हा त्यास उंचवटयाची जागा म्हणून ह्या पायऱ्यावर चढविले होते. अनेक पर्यटक भाविक येथे गुडघ्यावर चालून प्रार्थना करतात. महामंदिराचा दर्शनी भाग भव्यदिव्य असून मुख्य छतावर येशू ख्रिस्त व इतर संतगण

**९ नोव्हेंबर हा दिवस जागतिक कॅथलिक चर्च 'लॅटरन महामंदिर समर्पण सोहळा' म्हणून साजरा करतात.**

ह्यांचे शुभ्र पुतळे उभे आहेत. महामंदिराचा अंतर्भाग विलोभनीय असून मुख्य प्रार्थना हॉलमध्ये १२ प्रेषितांचे भव्य जिवंत वाटणारे पुतळे कोरण्यात आले आहेत.

एकूणच संगमरवरी कलाकुसर व आतमधील छत हा कलेचा आविष्कार आहे. पुढे १२ व्या शतकात संत जॉन बॅप्टिस्टा ह्यांच्या नावाने ह्या राजमहलास 'संत जॉन लॅटरन महामंदिर' म्हणून गौरवाभिमान प्राप्त झाला.

पोप पायस ११वे ख्रिस्तसभेची धुरा (१९२२-१९३९) सांभाळत होते. त्यांच्या कारकिर्दीत इटलीचे पंतप्रधान बेनिटो मुसोलिनी व पोप पायस ११वे ह्यांच्यात सन १९२९ साली ऐतिहासिक 'लॅटरन करार' झाला. ह्या करारामुळे व्हॅटिकन सिटीच्या आजूबाजूतील गावे मिळून स्वतंत्र आणि सार्वभौम असा 'व्हॅटिकन सिटी' एक देश म्हणून अस्तित्वात आला. तसेच संत जॉन लॅटरन महामंदिर ह्या वास्तूला विशेष जागतिक दर्जा प्राप्त झाला.

ह्याच महामंदिरात ख्रिस्तसभेतील संत पीटर व संत पॉल ह्यांच्या कवटीचे अवशेष सुवर्ण पेटीत ठेवण्यात आले आहेत. संत पीटर जेवणासाठी इटालियन पलटण सुभेदार कर्नेल्यूस ह्याच्या घरी ज्या मेजावर जेवला होता ते मेज (वेदी) तसेच अखेरच्या भोजनासाठी माडीवरील मेज (वेदी) आणि ऐतिहासिक वस्तू ह्याच महामंदिरात संग्रही ठेवण्यात आल्या आहेत. जगभरातील सर्व ख्रिस्तमंदिराची माता व सर्वोच्च चर्च म्हणून ह्या महामंदिराकडे पाहिले जाते. त्यास संत पीटर बॅसलिकापेक्षा विशेषत: वरचे स्थान आहे.

(संदर्भ : 'रोम राज्य' - डॉ.मीना प्रभू
वेबसाईट : 'बायबल गेट वे', ब्रिटानिका)

मोबाईल : 90 49 91 93 14


FLORENCE TOURS & TRAVEL
FLORENCE
TOURS & TRAVELS
INTERNATIONAL
DUBAI FESTIVAL
January 2027
4N / 5D
EUROPE
MAY 2027
VIETNAM
26th January 2027
May 2027
7N / 8D
CHINA HONG KONG AND MACAO
April 2027
7N / 8D
ALMATY
April 2027
SOUTH KOREA
CHERRY BLOOSAM
April 2027
SRI LANKA
MAY 2027
5N / 6D
JAPAN
CHERRY BLOOSAM
April 2027
ONLY THAILAND
MAY 2027
BHUTAN
April and May 2027
6N / 7D
SINGAPORE MALAYSIA AND THAILAND
MAY 2027
DOMESTIC
ASSAM MEGHALAYA
10N / 11D
April and May 2027
DARJILING AND GANGTOK
05N / 06D
20th April 2027
KASHMIR
May 2027
INCLUSIONS
Pickup Drop
Flight
Visa
Hotels
Sightseeing
All Meals.
Brian Dabre
7710027271
Wilfred Pereira
9922638520

# बालहक्क संवर्धन व संरक्षण

- स्मिता लोपीस-डिकोष्टा
चुळणे

प्रत्येक बालकाला सुरक्षितपणे जगण्याचा, शिकण्याचा, विकसित होण्याचा आणि सन्मानाने जीवन जगण्याचा अधिकार आहे. ह्या अधिकारांचे संरक्षण करणे ही केवळ शासनाची नव्हे; तर आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे.

१४ ते २० नोव्हेंबर हा कालावधी बालहक्क संवर्धन व संरक्षण सप्ताह म्हणून साजरा करण्याचा उद्देश स्पष्ट आहे : बालकांचे हक्क समजून घेणे, त्यांच्या संरक्षणासाठी सजग राहणे आणि प्रत्येक बालकाला सुरक्षित वातावरण मिळवून देण्यासाठी ठोस कृती करणे, हा या सप्ताहाचा खरा हेतू आहे.

**बालहक्क म्हणजे सर्वांगीण संरक्षण**

बालसंरक्षण म्हणजे शिक्षणाचा अधिकार, बालमजुरीपासून संरक्षण, मानवी तस्करीला प्रतिबंध, बालविवाह रोखणे, हिंसा व दुर्लक्ष करण्यापासून रक्षण आणि संकटात सापडलेल्या बालकांचे पुनर्वसन ह्यांचाही समावेश होतो. ह्या सर्व बाबी एकमेकांशी जोडलेल्या आहेत. एका अधिकाराचे उल्लंघन झाले, तरी त्याचा परिणाम बालकाच्या संपूर्ण आयुष्यावर होऊ शकतो. भारतामध्ये बालकांच्या संरक्षणासाठी ठळक कायदे करण्यात आले आहेत.

**१. शिक्षणाचा अधिकार कायदा** (RTE Act, 2009) ६ ते १४ वर्षे वयोगटांतील बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार आहे.



शाळाबाह्य मुलांना पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणणे आवश्यक आहे.

**२. बालमजुरी प्रतिबंधक कायदा** (Child & Adolescent Labour Act) १४ वर्षांखालील मुलांच्या रोजगारावर कायद्यातील मर्यादित अपवाद वगळता बंदी आहे. १४ ते १८ वर्षे वयोगटातील किशोरांना धोकादायक व्यवसायांत काम करण्यास मनाई आहे.

> **‘बालहक्क संवर्धन व संरक्षण सप्ताह’ साजरा करण्यामागचा उद्देश कोणता?**

**३. मानवी तस्करीविरोधी कायदेशीर संरक्षण** : मानवी तस्करीमुळे बालकांना मजुरी, लैंगिक शोषण आणि अन्य प्रकारच्या शोषणाला सामोरे जावे लागते. संशयास्पद परिस्थिती आढळल्यास संबंधित यंत्रणांना त्वरित माहिती द्यावी.

**४. बालविवाह प्रतिबंधक कायदा, २००६** : हा कायदा बालविवाह रोखण्यासाठी कायदेशीर तरतुदी करतो. बालविवाहामुळे बालकांचे शिक्षण, आरोग्य आणि विकास बाधित होतो.

**५. बाल न्याय अधिनियम, २०१५** (JJ Act) : हा कायदा काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या तसेच कायद्याशी संघर्षात आलेल्या बालकांच्या संरक्षण, पुनर्वसन आणि पुनर्समा-वेशासाठी तरतुदी करतो.

**६. बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण कायदा** (POCSO Act, 2012) : हा कायदा १८ वर्षांखालील बालकांना लैंगिक अत्याचार व छळापासून संरक्षण देतो. अशा अपराधांची माहिती मिळाल्यास पोलिसांना कळविणे अनिवार्य असून बालकाची ओळख गोपनीय ठेवली पाहिजे.

**जबाबदारीने कृती**

कायदे महत्त्वाचे असले, तरी त्यांची प्रभावी अंमलबजावणी समाजाच्या सहभागाशिवाय शक्य नाही. पालकांनी मुलांशी विश्वासाचे नाते निर्माण करावे आणि त्यांना भीती न बाळगता आपल्या भावना व अडचणी व्यक्त करता येतील असे वातावरण द्यावे. शिक्षकांनी मुलांची अनुपस्थिती, वर्तनातील बदल किंवा अस्वस्थतेची चिन्हे गांभीर्याने घ्यावीत.

शाळा, वसतिगृहे, बालसंगोपन केंद्रे आणि धार्मिक-सामाजिक संस्था ह्यांनी स्पष्ट बालसंरक्षण धोरण तयार करून

# लिहिते व्हा : दक्षता सूत्र

* अन्य नियतकालिकात किंवा व्हॉट्सॲपवर आलेला मजकूर 'सुवार्ता' मासिकात छापला जात नाही.
* आपण पाठविलेल्या साहित्याची एक प्रत कृपया, आपल्या दप्तरी असावी.
* आपला लेख शक्यतो ५५० ते ६०० शब्दांपर्यंत असावा. कविता ६० ते ८० शब्दांपर्यंत असावी.
* आपले लेखन पुढील स्वरूपाचे असू शकते : लेख, कविता, संपादकास पत्र, विषयानुरूप प्रतिसाद, ललित, कथा, वैचारिक, प्रासंगिक, विनोद, इत्यादी.
* आपले लेखन संपादक मंडळापुढे ठेवले जाईल.
* 'सुवार्ता' मासिकाच्या ध्येय-धोरणाप्रमाणे लेखन असेल तर त्या त्या महिन्याच्या विषयांप्रमाणे यथावकाश प्रसिद्ध केले जाईल.
* मजकूर स्वीकारणे अगर नाकारणे आदींचा अधिकार संपादक मंडळाचा असेल.

**- संपादक मंडळ**


# जेरूसलेम टूर्स ॲन्ड कॅटरिंग सर्व्हिस, आगाशी

देवाला धन्यवाद देतो की आमच्या जुलै आणि ऑगस्ट/सप्टेंबर २०२६च्या वेलंकनी माता नोव्हेनाच्या सहली भरपूर भाविकांसोबत एकदम **सक्सेसफूल व फूलफिल** झाल्या. तसेच आमची ७ ते १४ नोव्हेंबरची मँगलोर-उडीप्पी, कुर्ग ही बुकींगदेखील आमच्या टार्गेटप्रमाणे **फूल** झाली, त्याबद्दल वेलंकनी माता व परमेश्वराचे शतशः आभार!

**१)कोकण-मालवण-तारकर्ली सहल :** दि.२१ ते २६ नोव्हें. २६. हिरव्यागार-थंडगार निसर्गाची मजा लुटण्यासाठी. फूल ए. सी. पॅकेज, सर्व एन्ट्री फी व शानदार पार्टीसहीत एकूण खर्च प्रत्येकी रु. १९,०००/-. ५ ते १० वर्षे मुलांस रु. १५,००० /-मात्र.

**२)दिल्ली-आग्रा-जयपूर सहल** : दि. १२ ते १९ डिसेंबर २६. ए.सी. ट्रेन, ए.सी.बस, ए.सी.रूम, सर्व काही बघण्यासारखे. सर्व एन्ट्री फी व शानदार पार्टीसहीत एकूण खर्च प्रत्येकी रु. ३०,०००/-मात्र. व ५ ते १० वर्षे मुलांस रु. २५,००० /-.

**टीप :** दोन्ही सहलींत चार जणांस एक रूम. तसेच स्पेशल रूमची (दोन जणांस) व्यवस्था केली जाईल.

**Good Service, Quality & Quantity No Compromise!**

**संपर्क :**संज्याव घोन्सालवीस, आगाशी : **9320888907**
पायस घोन्सालवीस, उमराळे : **9766092738**



# निसर्ग टूर्स आयोजित सहल

**आयोजक : ऑस्टीन : 9270080947 / 9422681516**
**विनय : 9225432233 / 9322046212**

१) **बडोदा स्टॅच्यू ऑफ युनिटी :- दिनांक १६नोव्हें. ते १८ नोव्हें. २०२६ (नोव्हेंबर मध्ये)** जाताना वंदेभारात ट्रेनला AC Chair Car साईटसीन ए सी बस व वास्तव्य ३ star हॉटेल भोजन, नास्ता ,जेवण,व्हेज -नॉन व्हेज लावेश बुफे सर्व साईट सीन एन्ट्री फी सहीत एकूण खर्च रु. १०,०००/- (चार जणांस एक रूम). रु. ११,०००/- (तीन जणांस एक रूम). रु.१२,०००/- (दोन जणांस एक रूम).

२) **बरोडा : स्टॅच्यू ऑफ युनिटी, सुरत सहल : दिनांक २८ डिसें. ते ३० डिसें. २०२६ व दि.२६ ते २८ जानेवारी २०२७.** जाताना वंदेभारात ट्रेनला AC Chair Car साईटसीन ए सी बस व वास्तव्य ३ star हॉटेल भोजन, नास्ता ,जेवण,व्हेज -नॉन व्हेज लावेश बुफे सर्व साईट सीन एन्ट्री फी सहीत एकूण खर्च रु. ११,५००/-. (चार जणांस एक रूम). रु. १२,५००/- (तीन जणांस एक रूम). रु .१३,५००/- (दोन जणांस एक रूम). (जंगल सफारी, लक्ष्मी पॅलेस, सयाजी गार्डन, निराधार माता चर्च, सुरत साडी मार्केटमध्ये खरेदी.)

३) **बाळ येशू सणानिमित्त नाशिक सहल : दिनांक ६ फेब्रुवारी ते ७ फेब्रुवारी २०२७.** एकूण खर्च रु. ५,५००/- मात्र. (चार जणांस एक रूम).

* **हनीमून पॅकेज, टूर्स पॅकेज, बस बुकिंग, फ्लाईट बुकिंग, रेल्वे बुकिंग आणि हॉटेल बुकिंग करून देतो.**



# GHM TRAVELS

GHM TRAVELS, Office. 8, Divine Residency,
Opp. Mulgaon Church, Mulgaon, Vasai West, Vasai – 401201
Ruth: 9730421602 / Gavin: 7709561700 / 9890214681
https://ghmtravels.my.canva.site

**** Customised Domestic Tours ****

* Goa - 3N/4D * Vadodara with Statue of Unity - 3D
* Kerala - 5N/6D * Velankanni / Pondicherry * Konkan - 5N/6D
* Hyderabad - 3N/4D * Mahableshwar / Panchgani * Kashmir
* Himachal with Shimla / Kullu Manali - 5N/6D * Andaman Island ...

**** International Tours ****

* Nepal * Sri Lanka * Maldives * UAE (Dubai) * Vietnam
* Singapore * Malaysia * Thailand (Bangkok / Phuket / Pattaya) ...

**** We Offer ****

Train Booking / Bus Booking / Airline Tickets / Hotel Booking
(Best Hotels with Good Deals)
Passport (New & Renewal) / Tourist Visa / Customized Tours
Car – Mini Bus Rental / Honeymoon Package

BOOK NOW

त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करावी. कर्मचाऱ्यांना नियमित प्रशिक्षण, तक्रार नोंदविण्यासाठी सुरक्षित व्यवस्था आणि तक्रारींवर वेळेवर कार्यवाही असणे आवश्यक आहे. संस्थेची प्रतिष्ठा जपण्यापेक्षा बालकाची सुरक्षितता आणि हित ह्यांना सर्वोच्च प्राधान्य दिले पाहिजे.

मुलांनाही त्यांच्या हक्कांची, वैयक्तिक मर्यादांची, ऑनलाइन सुरक्षिततेची आणि गरज पडल्यास मदत कशी मागायची ह्याची माहिती दिली पाहिजे. बालकाने अत्याचाराची किंवा अन्यायाची माहिती दिल्यास त्याला दोष देऊ नये, त्याच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करू नये किंवा प्रकरण दडपण्याचा प्रयत्न करू नये. त्याचे म्हणणे संवेदनशीलतेने ऐकून त्याच्या सुरक्षिततेसाठी योग्य कार्यवाही करणे ही आपली प्राथमिक जबाबदारी आहे.

**संकल्प**

१४ ते २० नोव्हेंबर ह्या बालहक्क संवर्धन व संरक्षण सप्ताहात प्रत्येक शाळेने / संस्थेने बालसुरक्षा व्यवस्थेचा आढावा घ्यावा, प्रत्येक संस्थेने बालसंरक्षण धोरण अधिक सक्षम करावे, प्रत्येक पालकाने मुलांशी संवाद वाढवावा आणि प्रत्येक समाजघटकाने असुरक्षित बालकांच्या मदतीसाठी पुढाकार घ्यावा. जनजागृती कार्यक्रमांचे रूपांतर प्रत्यक्ष कृतीत आणि सातत्यपूर्ण उत्तरदायित्वात झाले पाहिजे.

बालकांचे संरक्षण ही केवळ शासन, पोलीस किंवा एखाद्या संस्थेची जबाबदारी नाही. ती प्रत्येक पालकाची, शिक्षकाची, समाजसेवकाची, संस्था चालकाची, धार्मिक नेतृत्वाची आणि सजग नागरिकाची सामूहिक बांधिलकी आहे.

ह्या बालहक्क सप्ताहात आपण केवळ बालदिन साजरा करू नये, तर प्रत्येक बालकाला शिक्षण, सुरक्षितता, सन्मान आणि न्याय मिळवून देण्याचा संकल्प करूया. कारण समाजाची खरी प्रगती मुलांसाठी आयोजित केलेल्या उत्सवांतून नव्हे, तर वर्षातील प्रत्येक दिवशी त्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्याच्या आपल्या कृतींतून दिसून येते. प्रत्येक बालक महत्त्वाचे आहे, प्रत्येक हक्क महत्त्वाचा आहे आणि प्रत्येकाची भूमिका महत्त्वाची आहे.

मोबाईल : 99 70 81 53 89

●

**'सुवार्ता' साठी आपली जाहिरात, वर्गणी किंवा देणगी चेकद्वारा द्यायची असल्यास कृपया आपला चेक 'The Suwarta Trust' ह्या नावाने काढावा.**

**- व्यवस्थापक**

**ROYAL WORLD TOURS PVT. LTD.**

TRAVEL WITH THE MOST TRUSTED NAME FOR PILGRIMAGE & WORLDWIDE TOURS

*Japan Tour - 9 Days (4 Cities)*
*Travel date - 2nd April 2027*
*Tokyo / Hiroshima / Osaka / Kyoto*
*Tour Cost (INR) - ~~3,45,000/-~~ 3,25,000/- all inclusive*

*Grand Europe Tour - 17 Days*
*Travel date - 19th April & 17th April 2027*
*Italy / Vatican / Austria / Germany / Switzerland / Luxembourg / Belgium / Liechtenstein / France/ Spain / Portugal*
*Tour Cost (INR) - ~~4,30,000/-~~ 4,00,430/- all inclusive*

*Western Europe Tour - 12 Days (5 countries)*
*Travel date – 11th May 2027*
*Italy / Vatican/ France/ Spain/ Portugal*
*Tour Cost (INR) - ~~3,00,000/-~~ 2,80,000/-all inclusive*

*Glory of Europe Tour - 15 Days (7 countries)*
*Travel date - 3rd May 2027*
*Italy / Vatican / Switzerland / Germany / France / Spain / Portugal*
*Tour Cost (INR)~~- 379,800/-~~ 353,000/-all inclusive*

*Eastern Europe Tour - 15 Days (8 countries)*
*Travel date - 19th May 2027*
*Italy / Vatican / Croatia / Bosnia & Herzegovina / Austria / Hungary / Poland / Czech- Republic*
*Tour Cost (INR~~) 3,43,299/~~- 339,930/- all inclusive*

*Holy Land Tour - 12 Days*
*Travel dates - 6th, 23rd Nov, 20th Dec 2026*
*22nd Feb, 19th April, 3rd & 17th May 2027*
*Jordan / Israel / Palestine / Egypt*
*Tour Cost (INR) - ~~1,95,000~~ INR 192,000/- all inclusive*

Inclusions:- Air Fare / Visa / 4* Hotels / All 3 meals / Tips / City Tax / Travel Insurance up to 69 years / GST

*120 & 121, 1 st Floor, B Wing, Bhaveshwar Arcade, LBS Road, Ghatkopar (W), Mumbai - 86*
*Charles: +91-98338 32893 ; Vishakha: +91-99202 20022 ; Paul:+91-99670 14409*
*Email: charles@royalworldtours.in / Website: www.royalworldtours.in*
*Offices in INDIA, UK & USA*

*More than 31,500 satisfied passengers in last 15 years!*

# व्ही.एम्. टूर्स अॅन्ड ट्रॅव्हल्स

**आयोजक : टोनी डायस,** ओळंबवाडी–पापडी
**Contact : 8485890360 / 9320385977 / 9766398405**

## वेलंकनी ख्रिसमस वीक टूर : २६ ते ३० डिसेंबर २०२६

**रु. १०,००० :** जेवण आणि एसी रुममध्ये राहण्याची व्यवस्था (४ जणांसाठी १ रूम), **रु. २९,५०० :** संपूर्ण पॅकेज. जेवण आणि एसी रुममध्ये राहण्याची व्यवस्था (४ जणांसाठी १ रूम) मुंबई ते चेन्नई विमानप्रवास व चेन्नई ते वेलंकनी (**3AC**) रेल्वेप्रवास. सर्व साईटसीन (१ दिवस पाँडेचेरी आणि १ दिवस पुंडीमाता तंजावर व परत वेलंकनी)

## हैदराबाद टूर : २६ डिसेंबर ते ३१ डिसेंबर २०२६

१८,०००– जाता–येता ३ टीयर एसी ट्रेन, हैदराबादमध्ये ३ रात्र/४ दिवस, ए.सी.रूम+ जेवण. निवासव्यवस्था– **सुपर डिलक्स हॉटेल** (घरगुती जेवण दिले जाईल. व्हेज/नॉनव्हेज. ब्रेकफास्ट+लंच+डिनर+गेट टुगेदर+चहा/नास्ता)

**साईटसीन–** सालारजंग म्युझियम, चारमिनार, गोळकोंडा, बिर्ला टेंपल, निजाम पॅलेस, लुंबिनी पार्क, लाइट अॅन्ड साऊंड, एनटीआर गार्डन, रामोजी फिल्मसिटी (संपूर्ण दिवस) शॉपिंग, कराची बेकरी व इतर साइटस् (वेळेनुसार)

## ख्रिसमस वीक धमाल गोवा टूर : २६ ते ३० डिसेंबर २०२६

**रु. १८,५०० :** जेवण आणि एसी रुममध्ये राहण्याची व्यवस्था (४ जणांसाठी १ रूम), मुंबई ते गोवा व गोवा ते मुंबई (**3AC**) रेल्वेप्रवास. सर्व साईटसीन. दररोज सायंकाळी गेट टुगेदर. ख्रिसमस वीक पूर्ण धमाल! गोवा येथे राहण्यासाठी रिसॉर्ट विथ स्वीमिंग पूलची व्यवस्था. **खा..प्या... आणि धमाल एन्जॉय करा!!**

## बाळ येशू नाशिक सहल (६ व ७ फेब्रुवारी २०२७)

खर्च रु. ६,०००/- AC बस प्रवास + हॉटेल नाशिक इन + साईटसीन (कपलसाठी स्पेशल रूम)
एक दिवसाची सहल : खर्च रु. २००० (दि. ६ फेब्रुवारी २०२७) जेवण, नाश्ता, एसी बसप्रवास

## शालेय विद्यार्थी–शिक्षकांसाठी मे महिन्यातील नोव्हेना : ८ ते १३ मे २०२७

**मुंबईहून जाण्याची तारीख ६ मे व परत येण्याची तारीख १५ मे**
**रु. ३२,०००/– विमानप्रवास + ए.सी. रूम + जेवण**
**रु. २०,०००/– ए.सी. रूम, ए.सी. रेल्वे प्रवास + जेवण**
**रु. १५,५००/– नॉन.ए.सी. रूम, नॉन.ए.सी. रेल्वे प्रवास + जेवण**
**रु. १३,५००/– ए.सी. रूम + जेवण** *(रुममध्ये चार जण शेअरिंग)*

## श्रीलंका : ५ ते १० मे २०२७ (५ रात्री/६ दिवस)

एकूण : रु. 73,000/- (कोलंबो– कँडी– नुवारा एलिया– एला– गॅले– बेन्टोटा)
**वास्तव्य–** सुंदर ठिकाणी वसलेल्या ४ स्टार हॉटेलमध्ये सुपर डिलक्स रुम्स, **ब्रेकफास्ट/लंच/डिनर–** श्रीलंकन/भारतीय पद्धतीचे, **एसी लक्झरी बसने सर्वत्र प्रवास, सर्व साईटसीन** प्रवेश फी समाविष्ट, इन्शुरन्ससह फ्लाईट खर्च समाविष्ट.
**Contact : Allister Dias - 9011890360 / 8459263384**

# केरळ पोट्टा रिट्रिट

*तू विश्वास ठेवशील तर देवाचे गौरव पाहशील. - योहान ११:४०*

केरळ पोट्टा रिट्रिट– तीन दिवस केरळ सौंदर्य दर्शन, संत आल्फान्सो दफनस्थळ, संत अगस्तीन रामापुरम चर्च, संत चावरा दफनस्थळ, संत जॉर्ज चर्च (४० करोडचे चर्च), होली लँड (चालाकुडी), अवर लेडी ऑफ वल्लर पदम तीर्थक्षेत्र, रोझरी व्हिलेज, कोचीन येथे बोटींग व शॉपिंग.

कार्यक्रम :- **१७ मार्च २०२७ ते २७ मार्च २०२७**
खर्च प्रत्येकी : रु. १०५००/– मात्र (एसी थ्री टियर ट्रेन)

फक्त ट्रेनने जाताना–येतानाचे जेवण स्वत:च्या खर्चातून असणार आहे.

| | | |
|---|---|---|
| आल्फ्रेड मुर्झेलो (आगाशी) | बंडू डिमेलो (नंदाखाल) | टोनी डायस (वसई) |
| ९८२२४७४१८९ | ८००७४०२९७२ | ८४८५८९०३६० |

# पक्षीरोधक पेत्रस जाळे

आपल्या विश्वासाबद्दल धन्यवाद!

**होय! आम्हीच देतो कबुतरांपासून कायमची मुक्ती.**



* पक्ष्यांच्या त्रासांपासून मुक्त होण्यासाठी संपर्क करा.
* प्रोफेशनल व टेक्नीकल पद्धतीने हुशार कारागिरांकडून जाळी फिटींग करून मिळतील.
* घराच्या पॅरेपीटमध्ये, गॅलरीत, बिल्डिंग, शाळा, महाविद्यालये व इतर सर्व ठिकाणी नायलॉनची मजबूत जाळी फिटींग करून मिळतील.
* कुत्रा, मांजर, साप व लहान मुलांच्या संरक्षणासाठी जाळी फिटींग करून मिळतील.
* लोखंडी (स्टील) जाळी फिटींग करून मिळेल.

**प्रो. आग्नेल पिटर पांबुज्या**
किल्लाबंदर, कोळीवाडा, वसई.

**Mob. : 9209804821, 7498826366**
**9923153671**

# भारत पेस्ट कंट्रोल

*** सरकारमान्य ***

* नवीन व जुन्या घराला लागणारी वाळवी प्रतिबंधक योजना.
* घरावर आक्रमण करणारे कीटक, झुरळ, मुंग्या, पाली, ढेकूण, डास, माश्या व उंदीर इत्यादींच्या त्रासांपासून मुक्त होण्यासाठी जनरल पद्धतीने पेस्ट कंट्रोल केले जाईल.

**-: आमची वैशिष्ट्ये :-**

१) पेस्ट कंट्रोल योग्य व टेक्निकल पद्धतीने केले जाईल.
२) विश्वासात काम करणारे व कामाचा अनुभव असलेले टेक्निशियन.
३) आधुनिक पद्धतीने वासाचे व विनावासाचे केमिकल व जेल वापरून तसेच आयुर्वेदिक हर्बल वापरून पेस्ट कंट्रोल केले जाईल.
४) बंगलोज, फ्लॅट, शाळा, हौसिंग सोसायटी, ऑफिसेस इत्यादीं सर्वांचे पेस्ट कंट्रोल केले जाईल.

**प्लंबिंगची कामे करून मिळतील. संपर्क : 7498033211**

**प्रो. आग्नेल पिटर पांबुज्या**
किल्लाबंदर, कोळीवाडा, वसई

**मो. : 9209804821, 9923153671**

संतपरिचय

# विश्वबंधू : संत चार्लस दि फुको

**फादर ॲण्ड्र्यू रॉड्रीक्स**
सेंट थॉमस चर्च, सांडोर

चार्लस दि फुको ह्यांचा जन्म १५ मे १८५८ रोजी फ्रान्समध्ये स्ट्रासबर्ग येथे झाला. तो सहा वर्षांचा असताना अनाथ झाला. त्याच्या धनवान आजोबाने त्याला मोठ्या मायेने वाढवले. मात्र त्याच्यावर सुसंस्कार केले नाहीत. कालांतराने तो ख्रिस्ती श्रद्धेतून भरकटत गेला. त्याने फ्रेंच आर्मीत प्रवेश केला. सेनापती झाला. भोगवादी झाला. एका रखेलीसह तो राहू लागला. पुढे तो विवेकभ्रष्ट झाला.

तो आल्जेरियाच्या धोकादायक मोहिमेवर होता. तिथे श्रद्धावंत मुसलमानांच्या संपर्कात आला. मॉरोक्कोच्या मोहिमेत तेथील मुसलमानांच्या एकेश्वरी श्रद्धेचा व दैनिक भावपूर्ण नमाज प्रार्थनेचा परिस्पर्श त्याला झाला. ''हे देवा, तू जर खरोखर अस्तित्वात असशील तर मला तुझी ओळख दे'', ही त्याची आत्यंतिक प्रार्थना होती.

ह्या अवस्थेत तो मायभूमीत आला. मारी बॉडी, त्याची चुलत बहीण हिच्या सेवामय प्रीतीचा परिस्पर्श त्याला झाला. तिने त्याला फा. हुबलीकडे पापस्वीकारासाठी पाठवले. तद्‍नंतर त्याचे संपूर्ण परिवर्तन झाले. त्याने पवित्र भूमीची यात्रा केली. नाझरेथमधील तीस वर्षे प्रभूच्या अज्ञात जीवनाने तो प्रभावित झाला. त्याने ट्रावीस्ट मठात प्रवेश घेतला. येशूप्रमाणे आपण गरीब मुळीच नाही, ह्या विचाराने तो झपाटला गेला. त्याने नाझरेथमध्ये प्रदीर्घ काळ एक मजूर म्हणून अज्ञातवासात व्यतीत केला. तिथे तो बराच वेळ पवित्र साक्रामेंतासमोर बसून प्रार्थनेत घालवित असे. येशूचा बंधू म्हणून तो ओळखला जाऊ लागला.

आपल्याला धर्मगुरूचे पाचारण आहे असे त्याला जाणवायला लागले. पुअर क्लेरच्या ज्येष्ठ मठवासिनीने त्याला उत्तेजन दिले. त्याच्या कॉन्फरसने सुद्धा त्याला प्रोत्साहन दिले. १९०१मध्ये त्याने गुरुदीक्षा स्वीकारली व सहाराच्या दुष्काळग्रस्त भागात प्रवेश केला. 'बंधुत्व' असे आपल्या आश्रमाचे त्याने नामकरण केले. 'चार्लस बंधू' ह्या नावाने आपल्याला संबोधावे असे त्याने जाहीर केले. तो सकलांचा बंधू झाला. 'येशूचा लहान बंधू' अशी धार्मिक संस्था स्थापायचे स्वप्न तो पाहत होता.

**संत चार्लस दि फुको 'येशूचा बंधू' म्हणून ओळखला जातो**

माझे अनुयायी ख्रिस्ताच्या बिनशर्त प्रेमाने सर्वांवर माया करतील व शुभवर्तमान जगतील. ही संस्था तीन आध्यात्मिक सत्यावर आधारलेली असेल:

१) सर्वांना देवाने आपल्या प्रतिमेप्रमाणे घडवले आहे.

२) सर्व देवाची लेकरे आहेत.

३) करशील जे गरिबांसाठी होईल ते ख्रिस्तासाठी.

### जीवनाने मिशनरी

१९०१ ला वयाच्या ४३व्या वर्षी तो सहाराच्या खोल विभागात तुआरेग लोकांमध्ये राहू लागला. त्याच्या संस्कृतीचा अभ्यास केला. भाषा शिकला. त्याने तुआरेग, फ्रेंच शब्दकोश तयार केला. व्याकरण लिहिले. त्या भाषेत शुभवर्तमान भाषांतरित केले. सर्वार्थाने तो तुआरेग जमातीचा बंधू झाला. त्यांच्याशी संपूर्ण एकरूप झाला.

ख्रिस्ताबद्दल तो लिहितो : ''तू गुहेत जन्मला, जी गुरांची गव्हाण होती. ३० वर्षे मजूर म्हणून जगलास. कालवारीवर तुला संपूर्ण नग्न करण्यात आले. तुला प्रेतवस्त्र व कबर उसनी घ्यावी लागली.''

१९०१पासून मरेपर्यंत नम्र व त्यागी जीवन तो जगला. १ डिसें. १९१६ सूर्यास्तावेळी अल्जेरियाच्या वाळवंटात पिस्तोलाच्या गोळीने तो हुतात्मा झाला. ज्या लोकांना त्याने बंधू म्हणून स्वीकारले होते, त्यांच्यासाठी त्याने रक्त सांडले.

१५ मे २०२२ रोजी पोप फ्रान्सिस ह्यांनी चार्लस दे फुको ह्यांना 'संत' म्हणून घोषित केले व 'वैश्विक बंधू' म्हणून घोषित केले. ज्या अगणित व्यक्ती, शांती व संस्कृतिकरणासाठी प्रयत्नशील आहेत त्यांना संत चार्लस दे फुको प्रेरणा देत राहतील.

मोबाईल : 73 87 19 04 86

संतपरिचय

# संत सिसिलिया

- ॲन्थनी मनवेल डाबरे
गिरीज

संत सिसिलिया ह्या कुमारी हुतात्मा हिचा सण जगभरात २२ नोव्हेंबरला साजरा केला जातो.

संत सिसिलियाचा जन्म इटाली (रोम) येथे इ. स. १८०च्या सुमारास श्रीमंत रोमन कुटुंबात झाला होता .

इ. स. २२२ ते २३५ च्या दरम्यान तिचे हौतात्म्य झाले. लहानपणापासून तिने लग्न न करण्याचा निर्णय घेऊन आपले जीवन व अखंड कुमारीत्व देवाजवळ समर्पित केले होते. तत्कालीन प्रथेनुसार वडिलांनी तिचा विवाह व्हॅलेरियन ह्या तरुणाशी निश्चित केला. लग्नाच्या दिवशी घराच्या आसपास वाद्ये वाजत असतानाच तिने परमेश्वरासाठी भक्तिगीत गायले आणि विवाहाच्या रात्री आपल्या पतीला सांगितले की देवदूताने तिच्या पवित्रतेचे रक्षण करण्याचे वचन दिले आहे आणि जर, व्हॅलेरियनने बाप्तिस्मा घेतला तर त्यालाही रक्षक देवदूत दर्शन देईल.

त्याने तिचे ऐकून रोमचे पोप अर्बन ह्यांच्याकडून स्नानसंस्कार करून घेतले. जेव्हा, तो घरी आला, तेव्हा साक्षात देवाचा दूत आपली पत्नी सिसिलिया हिच्याजवळ उभा असलेला त्याला दिसला.

ह्या अद्‌भुत चमत्काराची माहिती त्याचा भाऊ तिबुर्तियस ह्यास कळताच त्यानेही ख्रिस्ती धर्म स्वीकारला. त्यानंतर ते दोघे भाऊ त्या काळात धर्मासाठी शहीद झालेल्या ख्रिस्ती बांधवांचे दफन करण्याचे पवित्र काम करू लागले.

त्या काळात रोमन साम्राज्यात ख्रिस्ती धर्मावर बंदी होती. ख्रिस्ती लोकांवर भयंकर अत्याचार सुरू होते.

व्हॅलेरियन व तिबुर्तीयस ह्यांनी रात्रीच्या अंधारात ख्रिस्तासाठी मरण

स्वीकारणाऱ्यांचे शव पुरण्याचे काम चालू ठेवले. हे काम रोमन धर्माच्या विरुद्ध होते म्हणून त्यांना अटक केली. त्यांना रोमन अधिकारी ह्याने रोमन देवाची पूजा करण्यास सांगितले, पण दोघांनी नकार दिल्यावर त्यांचा शिरच्छेद केला . पत्नी सिसिलिया हिला देखील अटक झाली. तिने आपली सगळी स्थावरजंगम संपत्ती गरिबांना वाटली. तिला अंधार खोलीत कोंडून जिवे मारण्याचा प्रयत्न केला; पण रोमन अधिकाऱ्यांना यश आले नाही म्हणून तिचा शिरच्छेद करण्याचा आदेश देण्यात आला. तिच्या मानेवर तलवारीने तीन वेळा वार केले, तेही असफल झाले. जखमी अवस्थेत ती तीन दिवस जिवंत

**संगीत कलेच्या संरक्षक संत म्हणजे संत सिसिलिया.**

राहिली. ह्या स्थितीत देखील ती ख्रिश्चन बांधवांना ख्रिस्ताची सुवार्ता सांगत राहिली. शेवटी तिने ख्रिस्ताचरणी लीन होऊन प्राण सोडला. मरताना तिच्या हाताची बोटे चमत्कारिक मुद्रेत होती. एका हाताची तीन बोटे व दुसऱ्या हाताचे एक बोट, जे पिता, पुत्र, पवित्र आत्मा आणि एकच परमेश्वर दर्शवत होते. व्हॅलेरियन, तिबुर्तियस आणि सिसिलिया हे संत म्हणून संबोधिले जाऊ लागले.

इ. स. ८२१ मध्ये पोप पास्कल ह्यांनी तिचा मृतदेह मूळ कॅटाकॉम्ब्स म्हणजेच रोमच्या अप्पियन वे येथील जमिनीखाली खोदलेल्या प्राचीन भुयारी कबरेतून काढून रोम कडील TRASTEVERE येथील Saint CECILIA BASILICA मध्ये नेले. पुढे इ. स. १५९९ साली तिची कबर पुन्हा उघडण्यात आली, तेव्हा तिची कुड जशीच्या तशी अक्षय आढळून आली. ख्रिस्ती धर्मीयांच्या इतिहासातील ही पहिलीच सर्वांत मोठी INCORRUPT BODY आहे असे मानले जाते.

संत सिसिलिया 'संगीत क्षेत्राच्या संरक्षक संत' असल्यामुळे जगातील अनेक मोठ्या संगीत संस्थांना तिचे नाव दिले गेले आहे. रोम, ऑस्ट्रेलिया, यु. के., कॅनडा येथे तिच्या नावाने संगीत शाळा व परीक्षा बोर्ड आहेत.

तिचे जीवन ख्रिस्ती विश्वासाची साक्ष देणारे आहे. तिच्या नावाने चालणाऱ्या संस्थांच्या माध्यमातून शिक्षण व संगीत कलेची सेवा जगभरात अविरतपणे केली जात आहे.

तिचे फोटो / प्रतिमा भाविकांसाठी पवित्र आणि चमत्कार करणारे मानले जातात. मनातील इच्छा पूर्ण होतात आणि संकटातून मार्ग मिळतो अशी जगभरातील बांधवांची गाढ श्रद्धा व अनुभव आहे.

मोबाईल : 98 22 89 31 78

# देवाच्या सामर्थ्याचे प्रकटीकरण

**- कॅलेश जे. घोन्सालविस**
वळबांव, उमराळे

चमत्कार म्हणजे देवाच्या सामर्थ्याचे एक अनपेक्षित प्रकटीकरण. सामान्य मानवी बुद्धीच्या पलीकडचे असते आणि निसर्गाच्या नियमांचे उल्लंघन करून घडते. बायबलमधील चमत्कार हे मानवाच्या जीवनातील देवाचा सक्रिय सहभाग स्पष्ट करतात. ह्या चमत्कारांचा एकमेव आणि अंतिम उद्देश नेहमी कोणत्या ना कोणत्या प्रकारे देवाच्या राज्याचा विस्तार करणे हाच असतो. येशू ख्रिस्ताच्या देहधारणाचा (अवतार घेण्याचा) चमत्कारही नेमका ह्याच हेतूने घडला होता. येशू ख्रिस्ताने आपल्या पृथ्वीवरील सेवाकार्यात केलेली कोणतीही गोष्ट योगायोगाने किंवा हेतूहीन नव्हती. त्यांनी उच्चारलेला प्रत्येक शब्द आणि केलेली प्रत्येक कृती ही देवाच्या इच्छेनुसारच होती (योहान ४:३४; ५:३०; ६:३८; १२:४९; १४:३१; लूक २२:४२; इब्री १०:५-९; संदर्भ : स्तोत्रसंहिता ४०:६–८). म्हणूनच, येशूच्या चमत्कारांचा मुख्य उद्देश आपल्या स्वर्गीय पित्याचे राज्य प्रकट करणे आणि त्याचा विस्तार करणे हाच होता. शुभवर्तमानात नोंदवलेल्या येशूच्या सुमारे ३७ चमत्कारांमध्ये शारीरिक व्याधींचे निवारण, अशुद्धात्मे (दुरात्मे) काढणे, अन्नाची तरतूद करणे, जल, वारा व पाऊस ह्यांसारख्या नैसर्गिक घटकांवर नियंत्रण मिळवणे किंवा त्यांत बदल करणे आणि मृतांना जिवंत करणे ह्यांसारख्या गोष्टींचा समावेश आहे.

ह्या सर्व अलौकिक घटनांनी मानवजातीसाठी असलेल्या देवाच्या तारण योजनेत एक विशिष्ट उद्देश पूर्ण केला. देवाचे राज्य प्रकट करणे आणि त्याचा विस्तार करणे हा जरी येशूच्या चमत्कारांचा मुख्य हेतू होता (मत्तय १२:२८ पाहा), तरी ह्या चमत्कारांनी इतरही अनेक पूरक उद्देश साध्य केले. काना गावातील लग्नसमारंभात पाण्याचे रूपांतर द्राक्षारसात करणे हा येशूचा पहिला नोंदवलेला चमत्कार होता (योहान २:१–१२). योहनाने ह्या चमत्काराला 'पहिले चिन्ह' म्हटले आहे. ह्या चमत्काराने दोन महत्त्वपूर्ण हेतू साध्य झाले : ख्रिस्ताचे सामर्थ्य सिद्ध झाले आणि त्याचे गौरव प्रकट झाले. परिणामी, त्याच्या शिष्यांनी येशूवर विश्वास ठेवला.

> **येशू ख्रिस्ताने केलेली प्रत्येक कृती ही देवाच्या इच्छेनुसारच होती.**

येशूच्या चमत्कारांचा आणखी एक उद्देश म्हणजे मसिहा आणि देवाचा पुत्र म्हणून त्यांचे दैवी रूप आणि अधिकार सिद्ध करणे हा होता (योहान ११:४१-४२). येशू म्हणाला, ''पित्याने मला पूर्ण करण्यासाठी जी कामे सोपवली आहेत - म्हणजे मी जी कामे करत आहे - तीच माझ्याविषयी साक्ष देतात की पित्याने मला पाठवले आहे'' (योहान ५:३६). येशूने विविध चिन्हे आणि अद्‌भुत कृत्ये करून हे सिद्ध केले की भौतिक घटकांवर (मत्तय ८:२७), आत्मिक शक्तींवर (मत्तय १२:२८; मार्क १:३४), अगदी जीवन आणि मृत्यूवरही (लूक ७:१४-१५; मत्तय ९:२५) अधिकार गाजवण्याचे दैवी सामर्थ्य त्याच्या ठायी होते.

कधी कधी येशूने पित्याच्या अधिकारात चमत्कार केले (योहान १०:३७-३८), तर इतर वेळी त्यांनी स्वतःच्या अधिकारात ते केले (मत्तय १२:९–१४). ह्यावरून त्याचा ईश्वरी स्वभाव आणि त्रैक्यामधील त्याचा सहभाग दिसून येतो (योहान ५:१७, १९-३०).

जेव्हा बाप्तिस्मा करणाऱ्या योहानने येशूची ओळख निश्चित करण्यासाठी आपल्या शिष्यांना पाठवले, तेव्हा येशूने त्यांना उत्तर दिले, ''तुम्ही जे ऐकत आहात आणि पाहत आहात, ते जाऊन योहानाला सांगा - आंधळ्यांना दृष्टी मिळत आहे, लंगडे चालत आहेत, कुष्ठरोगी शुद्ध होत आहेत, बहिरे ऐकत आहेत, मेलेले जिवंत केले जात आहेत आणि गरिबांना

शुभवर्तमान सांगितली जात आहे'' (मत्तय ११:४-५). येथे येशूने यशया ६१:१-२ मधील भविष्यवाणी पूर्ण होत असल्याचे स्पष्ट केले.

येशू खरोखर कोण आहे, ह्याचे प्रमाण देणे हादेखील त्याच्या चमत्कारांमागील एक उद्देश होता. येशूने आपल्या विरोधकांना सांगितले, ''माझ्यावर विश्वास ठेवत नसला, तरी माझ्या कामांवर तरी विश्वास ठेवा; म्हणजे पिता माझ्यात आहे आणि मी पित्यात आहे, हे तुम्हाला कळावे व समजावे'' (योहान १०:३८). एका पक्षाघाती माणसाला बरे करताना येशूने पापक्षमा करण्याचे आपले ईश्वरी सामर्थ्य दाखवून दिले; म्हणजेच तो स्वत: देव आहे हे स्पष्ट झाले. हा चमत्कार पाहणाऱ्या बहुतेकांनी आश्चर्यचकित होऊन देवाची स्तुती केली (मार्क २:१-१२), तरीही काहींचा येशूला विरोध कायम राहिला.

लोकांची मने ख्रिस्ताचा संदेश स्वीकारण्यासाठी खुला करणे आणि त्यांना 'तारणहार' म्हणून त्यांच्यावर विश्वास ठेवण्यास प्रवृत्त करणे, हाही ह्या चमत्कारांचा एक उद्देश होता (योहान २:२३-२५; ११:४५). शुभवर्तमान लिहिण्यामागील आपल्या उद्देशांविषयी सांगताना योहान ह्या हेतूवर भर देतो : ''ह्या पुस्तकात नोंदवलेली नाहीत अशी इतरही अनेक चमत्कारिक चिन्हे येशूने शिष्यांसमोर केली. परंतु ही चिन्हे ह्यासाठी लिहिली गेली आहेत, की येशू हाच मसिहा, देवाचा पुत्र आहे ह्यावर तुम्ही विश्वास ठेवावा आणि विश्वास ठेवून त्याच्या नावाने तुम्हाला सार्वकालिक जीवन मिळावे'' (योहान २०:३०-३१).

येशूच्या चमत्कारांचा आणखी एक प्रमुख उद्देश म्हणजे देवाचे प्रेम प्रकट करणे हा होता. येशूमध्ये लोकांना साहाय्य करण्याचे सामर्थ्य होते आणि त्यांनी ते केले. प्रेषित योहान सांगतो की येशूने इतके चमत्कार केले की त्यांपैकी बहुतांश तर बायबलमध्ये नोंदवलेही गेलेले नाहीत (योहान २१:२५). देवाच्या प्रेमाची आणि सामर्थ्याची ही अगणित प्रकटीकरणे पाहून लोक मोठ्या संख्येने येशूकडे आकर्षित झाले (मार्क १:३२, ३७, ४५); त्यामुळे त्यांना त्याचा संदेश ऐकता यावा, विश्वासाने त्याचा स्वीकार करता यावा, देवाच्या तारणाची देणगी प्राप्त व्हावी आणि त्यांच्या चिरंतन राज्यात प्रवेश करता यावा असा बृहत् संकल्प होता.

मोबाईल : 80 07 83 34 85

अलबत्या गलबत्या नाटकाने शेवटी

## 'विश्वविक्रम'

रचलाच. एकाच दिवशी सात हजार विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत सात प्रयोग करण्याचा विश्वविक्रम गुरुवार दि. १५ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री ११ वाजता पुण्यातील बालगंधर्व नाट्यगृहात नोंदवला गेला. नाट्यगृह विश्वविक्रमाच्या आनंदाने भरून गेलं. विजयाचा जल्लोष पाहायला मिळाला.

# अक्षय बरबोज

ह्या वसईतील नाट्यकलावंताचा नाटकांमध्ये कलाकार म्हणून प्रवेश झाल्यानंतर त्यांनी १५० पेक्षा जास्त प्रयोगात काम केल आहे. आणि ह्या विश्वविक्रमामध्ये त्यांचाही सहभाग होता. वसईतील नाट्यकर्मी पैकी असा विश्व विक्रम करणाऱ्या नाटकात सहभाग असलेला अक्षय बरबोज हा वसईतील पहिला ख्रिस्ती कलावंत असावा. घरातील संस्कार कलावंत घडवतात. ह्याचं एक उत्तम उदाहरण आहे. खुप खुप हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी सर्वांतर्फे हार्दिक शुभेच्छा.

**– रिसल अक्षय बरबोज, झिडॅन अक्षय बरबोज**
**बरबोज कुटुंबीय व मित्र परिवार**

---

## ६० व्या वाढदिवसानिमित्त व यशस्वी सेवानिवृत्तीबद्दल हार्दिक अभिनंदन

**१५/११/१९६६ ते १५/११/२०२६**

**श्री. पिटर शिलू डाबरे,** भुईगाव, सामणी

परमेश्वराच्या कृपेने तुम्ही दिनांक १५ नोव्हें.२०२६ रोजी वयाची ६० वर्षे पूर्ण करीत आहात. तसेच दि. ३० नोव्हें. २०२६ रोजी स्टेट बँक ऑफ इंडिया मधून सेवानिवृत्त होत आहात, त्याबद्दल देवाला धन्यवाद व तुमचे हार्दिक अभिनंदन! तुमचे पुढील आयुष्य निरोगी, सुखा-समाधानाचे व आनंदाचे जावो हीच ईश्वरचरणी प्रार्थना!

**शुभेच्छुक :- पत्नी : जेसिंता; मुलगी : प्रियंका; जावई : बॅनेट घोन्साल्वीस; नातू : बिनॉय**

## ८० व्या वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा

**०५/११/१९४६ ते ०५/११/२०२६**

**श्री. आल्बर्ट ब्राझ परेरा**

रुनपाळ, शिर्लय (9284137093)

परमेश्वराच्या कृपेने आपण दिनांक ०५ नोव्हेंबर २०२६ रोजी वयाची ८० वर्षे पूर्ण करीत आहात, त्याबद्दल देवाचे आभार आणि तुमचे अभिनंदन! तुमचे पुढील आयुष्य निरोगी, सुखा-समाधानाचे व आनंदाचे जावो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना !

**पत्नी : जोस्पिन; मुले : अजित व स्टीव्हन; मुलगी : स्मिता; जावई : जॉर्ज मर्सेलिन मुर्झेलो; सुना : जेमिला व स्विडल; नातवंडे :सेल्विन, ॲनिसा, ॲलरॉय, क्लेटॉन, ॲरॉन, फ्लेचर**

— A PROJECT BY —
RUBY LIFESPACES
ALTURA UMELE
Strategic Selling Partner
NAAUV
YOUR NEXT BEGINS NOW
A Home Beyond Expectations
Residences crafted for comfort, elegance, and family living.
1 & 2 BHK Homes
Avaliable At
₹39.99 LACS*
ONWARDS
NAIGAON WEST
9920 305 655 | 9702 500 555
MAHA RERA NO.: P99000048381

## ६० व्या वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा

**२८/११/१९६६ ते २८/११/२०२६**

**श्रीमती सुनीता रेनॉल्ड डिमेलो**

घोगाळेवाडी, रमेदी

अतिप्रिय मम्मी,

ईश्वर कृपेने व आशीर्वादाने तू दिनांक २८ नोव्हें.२०२६ रोजी वयाची ६० वर्षे पूर्ण करीत आहेस, त्याबद्दल देवाला धन्यवाद व तुझे हार्दिक अभिनंदन! उर्वरित आयुष्यात तुला शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक आरोग्य व दीर्घायुष्य लाभो, हीच विधात्याचरणी प्रार्थना!

**शुभेच्छुक :- मुलगा-सून : रेमसन व वेनिसा डिमेलो;**
**मुलगी-जावई : शर्मिला व उल्हास डिसिल्वा;**
**नातवंडे : रायझेल, ॲन्सलेम व वेलोरा**

# पिटरमेरी इंडिया निधी लि. (वित्तसंस्था)

PETERMARY

**मुख्य कार्यालय व शाखाः बंगली वसई**

पहिला माळा, बिल्डींग नं. १, न्यु श्रीजी कृपा कॉम्प्लेक्स, बंगली हॉस्पीटल समोर, बंगली, वसई (प), पालघर - ४०१ २०१.

Registration No -: U65999MH2019PLC323412 Establishment -: 2019

Contact Details : 8669955317 / 18 | email: petermary.nidhi@gmail.com | web: www.petermary.com

**वसईत प्रथमच !!! कंपनी कायदा २०१३ व कंपनी (स्थापना) नियम २०१४ अन्वये नोंदणी झालेली निधी कंपनी**

आमची वैशिष्ट्ये:
- आकर्षक व्याजदराच्या बचत ठेव
- ज्येष्ठ नागरिकांसाठी ठेवीवर अधिक व्याजदर.
- वसईच्या भुमीपुत्राकडून संचलित वित्त संस्था

**Enjoy Higher Returns in FIXED DEPOSIT Scheme**

| Sr. No. | Deposit Period | Interest % General | Interest % Sr. Citizen |
|---|---|---|---|
| 1. | Deposit for 12 Months | 9.00% | 9.30% |
| 2. | Deposit for 60 Months | 11.00% | 11.50% |
| 3. | Dam Duppat in | 72 Months | |

ALOYSIUS PEREIRA
Managing Director

कार्यालयीन वेळः सकाळी ९:३० ते संध्याकाळी ७:०० पर्यंत

OPEN THE DOOR
TO HAPPINESS
TOWNE VISTA
#GoodLifeBeginsHere
NEAR T.B. JR. COLLEGE, PAPDY
PREMIUM 1 & 2 BHK HOMES
24 X 7
WATER SUPPLY
14+ PREMIUM
AMENITIES
NO
STAMP DUTY
&
REGISTRATION
CHARGES
+91 80071 09990

Almighty Homes
A Higher Form of Realty
NO STAMP DUTY & REGISTRATION CHARGES
A smart move connects you to the
Perfect Location
2 BHK HOMES
COMMERCIAL SPACES
BELONG TO THE BEST, BELONG TO
Astoria
(Anudham Co-operative Housing Society Pvt. Ltd)
TAMTALAO, VASAI WEST
+91 80071 09990
PRIME LOCATION
MODERN AMENITIES
24/7 WATER SUPPLY
AMPLE PARKING
MAHARERA NO. PM1240002600834
VVCMC APPROVED
MEMBER OF CREDAI
The developer / realtor reserves the right to change any or all of these in the interest of the development without prior notice or obligation. The printed material does not constitute an offer and / or contract of any type between the developer / realtors & the recipient. Any purchase of premises shall be governed by the terms and conditions of the agreement for the sale entered between the parties, and no details mentioned in the brochure shall in any way govern such transactions.

## ७५ व्या वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा
०९/११/२०२६

**श्री. इनास लुईस मेन**
भुईगाव, संत मदर तेरेजा गाव परिवार

प्रिय पप्पा,
परमेश्वराच्या कृपेने आपण दिनांक ०९ नोव्हें.२०२६ रोजी वयाची ७५ वर्षे पूर्ण करीत आहात, त्याबद्दल देवाला धन्यवाद आणि तुमचे हार्दिक अभिनंदन!

**पत्नी : लिंदा; सुन व मुलगे : श्री व सौ. रसिका रोशल मेन व फा. नोबेल मेन; नातवंडे : एरॉन व रायसन; मेन कुटुंबीय, भुईगाव**

## हार्दिक अभिनंदन

**मिरल मनोज डायस**
मुळगाव

प्रिय मिरल,
**The Months Mind Mass will be offered on 8th November 2026 at Our Lady of Grace Cathedral, Papdy at 7.15 am**

*"If we live, we live for the Lord; and if we die, we die for the Lord. So, whether we live or die, we belong to the Lord."*

(Romans 14:8)

**Deeply Grieved and Remembered By Family Members**

स्थापना १५ ऑगस्ट १९५५
सुवार्ता साहित्य मेळावा
शुक्रवार, २ ऑक्टोबर २०२६, सकाळी ८.३० ते दुपारी १२.३०, स्थळ : कृपामाता सभागृह, पापडी, वसई

# 'सुवार्ता' साहित्य मेळावा : २०२६

## ''लोकशाही म्हणजे अल्पमतांचा आदर करणारे बहुमत''- ॲड.जयंत जायभावे

**पापडी :** शुक्रवार दिनांक २ ऑक्टो. २०२६ रोजी कृपामाता सभागृह, पापडी येथे सुवार्ता साहित्य मेळावा (वर्ष ४५) संपन्न झाला. ह्या प्रसंगी बोलताना मुख्य वक्ते म्हणून महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सिलचे अध्यक्ष, कायदेतज्ज्ञ ॲड. जयंत जायभावे म्हणाले, ''आपणा सर्वांचे सगळ्यात मोठे राष्ट्रीय कर्तव्य म्हणजे सर्वश्रेष्ठ असलेल्या भारतीय संविधानाची माहिती प्रत्येक भारतीय नागरिकाला पाहिजे. लोकांची संविधानाविषयाची असाक्षरता म्हणजे लोकशाहीचा पराभव आहे. ऐतिहासिक परंपरेतून आपल्या भारत देशाची निर्मिती झाली आहे. ह्या देशातील निर्माण झालेली सत्ताकेंद्रे वरून निर्माण झालेली नसून लोकांच्या अधिकारातून निर्माण झालेली आहेत. कुठल्याही प्रकारची राजेशाही येऊ नये, कुठल्याही प्रकारच्या सत्तेची केंद्र येऊ नयेत तर लोकांच्या मताने, इच्छेने केंद्र निर्माण झाली पाहिजे. भारत देशातील संविधानाच्या प्रास्ताविकातून न्याय, स्वातंत्र्य, समता ह्या तीन तत्त्वांनी हातात हात घालून आपण सर्वांनी हे राष्ट्र घडवायचे आहे.''

आपल्या विचारांना पुष्टी देत ते पुढे म्हणाले की, घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांना **संविधानाच्या उद्देशिकेतील** तुमच्या हृदयाचा जवळ असणारा शब्द कोणता? असे विचारण्यात आले असता त्यांना **बंधुता हा सर्वांत माझ्या हृदयाजवळचा शब्द आणि तोच ह्या लोकशाहीचा 'सार' आहे** असे कथन केले. एका नागरिकाची दुसऱ्या नागरिकाप्रति बंधुता निर्माण झाली पाहिजे.

ते पुढे म्हणाले की नागरिक ह्या नात्याने न्यायव्यवस्थेची सक्षमता ह्याकडे आपण बघतो का? देशाच्या बजेटमध्ये न्यायव्यवस्थेच्या सक्षमीकरणासाठी अर्धा टक्का सुद्धा तरतूद नाही. राज्यकर्त्यांना प्रश्न विचारण्याची जबाबदारी नागरिकांची आहे. संविधानाचा विचार घराघरांत जायला हवा. आपल्या हक्काच्या पलीकडे जाऊन आपली जबाबदारी म्हणून काय आहे, ह्याकडे नागरिक म्हणून आपण बघायला हवे.

इंग्लंडची लोकशाही ७०० वर्षांपूर्वीची आहे. मात्र इंग्लंडची लोकशाही सार्वभौम नाही. भारतीय लोकशाही सार्वभौम आहे. लोकांनी निर्माण केलेली सत्ता म्हणजे सार्वभौम. तसेच इंग्लंडची लोकशाही लिखित घटनेवर आधारित लोकशाही नाही.

आपल्या भाषणाच्या ओघात त्यांनी संविधानाच्या उद्देशिकेतील सार्वभौम, समाजवादी, लोकशाही, धर्मनिरपेक्ष, बंधुता ह्या संकल्पनांचे स्पष्टीकरण केले.

जगातील सर्वश्रेष्ठ संविधान भारताचे आहे. संविधान १४ डिसेंबर १९४६ रोजी सभेच्या पहिल्या बैठकीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते, **'लोकशाही म्हणजे बहुमत नाही. लोकशाही म्हणजे अल्पमताचा आदर करणारे बहुमत'** हाच धागा पकडून पंडित जवाहरलाल नेहरू ह्यांच्या केंद्रिय मंत्रिमंडळात तीन विरोधी पक्षांतील नेत्यांना मंत्रीपद देण्यात आले होते. **लोकशाहीमधला विरोधक म्हणजे देशाचा शत्रू,** ही सत्ताधाऱ्यांची आजची भूमिका बनत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

छत्रपती शिवाजी महाराजांचे घटनेमधील योगदान काय? ह्याविषयी बोलताना ते म्हणाले की मूळ दस्तऐवजावर शिवाजी महाराजांचा फोटो आहे. देशाच्या पाच हजार वर्षांच्या इतिहासात **राजेशाही असताना लोकशाही पद्धतीने राज्य केलेला एकमेव राजा शिवाजी महाराज होते.** रयतेचा राजा म्हणून त्यांचा संबोध करण्यात आला म्हणून राजा छत्रपती शिवाजी महाराजांचे चित्र राज्यघटनेत समाविष्ट करण्यात आलेले आहे. शिवाजी महाराज ह्यांचे सर्वांत मोठे स्मारक राज्यघटनेमधील फोटो होय.

आज सुरुवातीला पर्यावरण विषयक परिसंवाद झाला. राज्यघटनेत कलम ५१/१/जी पर्यावरण विषयी आहे. ह्या दृष्टीने विचार करता मानवतेला पराभव करणारा कोणताही विकास हा विकास होऊ शकत नाही असे त्यांनी निक्षून सांगितले.

# भारतीय विविधतेला एकत्र बांधून ठेवणारा दस्तऐवज म्हणजे भारतीय संविधान - बिशप थॉमस डिसोजा

सुवार्ता साहित्य मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी वसई धर्मप्रांताचे बिशप थॉमस डिसोजा होते. ते म्हणाले, भारत हा केवळ भौगोलिक प्रदेश नाही. भारत म्हणजे विविध भाषा, धर्म, जाती, संस्कृती, परंपरा, विचारधारा आणि जीवनपद्धती ह्यांना आपल्या कुशीत सामावून घेणारी एक विशाल मानवी सभ्यता आहे. ह्या विविधतेला लोकशाही चौकटीत एकत्र बांधून ठेवणारा सर्वात महत्त्वाचा दस्तऐवज म्हणजे भारतीय संविधान. संविधान हे केवळ कायद्यांचे पुस्तक नाही. ते भारताच्या सामूहिक स्वप्नांचे, संघर्षांचे आणि आशा-आकांक्षांचे प्रतिबिंब आहे. ते आपल्याला केवळ शासन कसे चालवायचे हे सांगत नाही; तर माणसाचे स्वातंत्र्य, प्रतिष्ठा, समानता आणि न्याय ह्यांचे संरक्षण कसे करायचे, ह्याची दिशा देते. भारतीय संविधानाच्या उद्देशिकेत आपण 'सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य' ह्या चार मूल्यांकडे आपण केवळ पाठ्यपुस्तकातील शब्द म्हणून पाहता कामा नये. लोकशाही केवळ मतदानाने मजबूत होत नाही; ती परस्पर सन्मानाने, संवादाने आणि सहअस्तित्वाच्या भावनेने मजबूत होते. एकत्र चालणे, एकत्र संवाद साधणे आणि एकमेकांची मने समजून घेणे हीच तर लोकशाहीची खरी शक्ती आहे.

अभिव्यक्तिस्वातंत्र्य हे लोकशाहीचे प्राण आहे. परंतु त्या स्वातंत्र्याचा उपयोग करताना दुसऱ्याच्या प्रतिष्ठेचा आणि अधिकारांचा आदर करणे हीदेखील लोकशाही संस्कृतीचीच अपेक्षा आहे. आपण मतभेद करू शकतो; परंतु मतभेदांचे रूपांतर वैरात होऊ नये. आपण प्रश्न विचारू शकतो; पण प्रश्न विचारण्याचा अधिकार इतरांचाही आहे. आपण आपल्या श्रद्धेवर प्रेम करू शकतो; परंतु त्याच वेळी दुसऱ्याच्या श्रद्धेच्या अधिकाराचाही आदर केला पाहिजे.

भारतीय संविधान प्रत्येक नागरिकाच्या धार्मिक स्वातंत्र्याचा आणि विवेकस्वातंत्र्याचा सन्मान करते. त्यामुळे आपल्या श्रद्धेचे जतन करताना इतरांच्या श्रद्धेचा आदर करणे ही आपल्या लोकशाहीची सुंदर परंपरा आहे. धर्माचे खरे सामर्थ्य दुसऱ्याला कमी लेखण्यात नाही, तर माणसाला अधिक मानवी बनवण्यात आहे. धर्म जर करुणा, सेवा, क्षमा, सत्य आणि प्रेम शिकवत असेल, तर तो संविधानातील मानवी प्रतिष्ठा आणि बंधुतेच्या मूल्यांना बळ देतो.

लेखक समाजाचा आरसा असतो; कवी समाजाच्या अंतःकरणाचा आवाज असतो; आणि विचारवंत समाजाचा विवेक व समाजाला प्रश्न विचारण्याची ताकद देतो. साहित्याने नेहमीच अन्यायाला प्रश्न विचारले आहेत. काव्याने आक्रोश व दुःखाला आवाज दिला आहे. विचारांनी रूढ चौकटींना आव्हान दिले आहे. आजही साहित्याची गरज आहे. द्वेषाच्या काळात प्रेमाची भाषा बोलण्यासाठी, विभाजनाच्या काळात बंधुतेची आठवण करून देण्यासाठी, भीतीच्या वातावरणात सत्याचा शोध घेण्यासाठी आणि निराशेच्या क्षणी आशेचा दीप प्रज्वलित करण्यासाठी. साहित्यिकांनी (लेखकाने) कोणत्याही एका गटाचा प्रवक्ता होण्यापेक्षा मानवी विवेकाचा जागरूक प्रहरी असणे अधिक महत्त्वाचे आहे.

आपल्या देशाची तरुण पिढी ही भारताची मोठी शक्ती आहे. त्यांना संविधान समजावून सांगणे ही केवळ शैक्षणिक संस्थांची जबाबदारी नाही; ती संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे. तरुणांना केवळ अधिकारांची माहिती असणे पुरेसे नाही. त्यांना कर्तव्यांची, सहिष्णुतेची, विवेकाची आणि लोकशाही संवादाची संस्कृतीही समजली पाहिजे. आपण तरुणांना असे भारताचे स्वप्न दाखवले पाहिजे, जिथे कोणत्याही व्यक्तीची ओळख तिच्या धर्मामुळे, जातीमुळे, भाषेमुळे किंवा आर्थिक स्थितीमुळे तिच्या मानवी प्रतिष्ठेपेक्षा मोठी ठरत नाही.

आज आपल्या समाजाला सर्वाधिक गरज आहे ती संवादाची. संवाद म्हणजे सर्वांनी एकमत होणे नव्हे. संवाद म्हणजे मतभेद असूनही एकमेकांना ऐकण्याची तयारी. लोकशाहीत विरोधक हा शत्रू नसतो. वेगळे मत असणारा नागरिक हा लोकशाहीचा भाग असतो. आपण असहमत होऊ शकतो; परंतु अमानुष होऊ नये. आपण कठोर प्रश्न विचारू शकतो; परंतु माणुसकीची भाषा सोडू नये. आपण आपल्या भूमिकेवर ठाम राहू शकतो; परंतु दुसऱ्याला ऐकण्याची दारे बंद करू नयेत.

आपल्या लेखणीने समाजातील दुर्बलांचा आवाज ऐकू द्या. आपल्या कवितेतून माणुसकीचे सौंदर्य प्रकट होऊ द्या. आपल्या विचारांतून प्रश्न निर्माण होऊ द्या आणि आपल्या सार्वजनिक संवादातून लोकशाहीतील सभ्यता जिवंत ठेवू द्या. संविधानाचे रक्षण केवळ संस्थांनी करायचे नसते. संविधानाची संस्कृती नागरिकांनी आपल्या आचारणातून निर्माण करायची असते. •

## संवादात्मक परिसंवाद

सुवार्ता साहित्य मेळाव्याप्रसंगी ‘पर्यावरण : जबाबदारी कुणाची?’ ह्याविषयी संभाषणात्मक परिसंवाद (टॉक शो) चे आयोजन करण्यात आले होते. त्यात ‘ध्यास’ फाऊंडेशनच्या कीर्ती शेंडे, व्हिस्परिंग ग्रीन फाऊंडेशनच्या जेनिफर डिसिल्वा, पर्यावरणतज्ज्ञ मॅकेन्झी डाबरे ह्यांनी आपले विचार मांडले. कार्यक्रमाचे संयोजन लॉना वाझ ह्यांनी केले.

**कीर्ती शेंडे :** निसर्गासाठी, समाजासाठी आपले काही योगदान असावे, ह्या उद्देशाने २०१७पासून ‘ध्यास फाऊंडेशन’मार्फत प्लास्टिक मुक्त वसईचा ध्यास घेतला आहे. प्रत्येक महिन्याच्या चौथ्या रविवारी वसई, नालासोपारा, विरार येथे ८२ केंद्रावर प्लास्टिक, इलेक्ट्रॉनिक, इलेक्ट्रिकल, थर्माकोल गाळा केले जाते. त्यासाठी जवळजवळ १८० सेवाभावी कार्यकर्ते मदत करतात. तीन महिन्यांतून Mega Drive (मेघा ड्राईव्ह) ह्यामध्ये नको असलेले कपडे, चप्पल, बूट, बॅग्ज गोळा करून त्यांचे रिसायकलिंग करतो. चांगल्या कॉटन कपड्याच्या पिशव्या, डोअरमॅट बनवतो. वृक्षसंवर्धन करायला हवे. कंपोस्ट खत बनवणे, फळांच्या सालीपासून बायो एनसाइम तयार करतो. वर्तमानपत्रांपासून कागदी पिशव्या बनवणे, कापडापासून कापडी पिशव्या बनवणे, तसेच स्टील बॅंक चाही उपयोग आपण घेऊ शकतो. ओला व सुका कचरा अलग करून ओल्या कचऱ्यापासून कंपोस्ट खत तयार करतो. ‘माझा कचरा माझी जबाबदारी’ आहे. मी जी कृती करीन ती पर्यावरणपूरक आहे का? ह्याचा विचार करावा. आपले घर केराचा डबा विरहित करा.

**मॅकेन्झी डाबरे** : निर्भीड चळवळी व्यक्तिमत्त्व पर्यावरणस्नेही मॅकेन्झी डाबरे म्हणाले, सजगात मोठ्या प्रमाणात

चर्चीला जाणारा विषय हा हवामान बदल आहे. त्याचे मोठे परिणाम आपल्या दाराशी आलेले आहे. विकासाच्या नावाखाली आपला माणूस आणि माणूसपण टिकेल की नाही, तसेच ह्या कॉंक्रिटच्या वसईत आपली हरित वसई टिकेल की नाही, हा मोठा प्रश्न आहे. आज वसईची लोकसंख्या ३० लाखांच्या घरात आहे. ४५ लाखांपर्यंत जाण्याची शक्यता आहे. भारताच्या ५८टॉप लोकसंख्येत वसईचा समावेश होणार आहे. टॉवरच्या जंगलात वसईची पाणथळ जागा, वनराई, बावखाले, तलावे टिकतील की नाही हा मोठा प्रश्न आहे. आपली ओळख ‘हिरवी वसई’ आहे. ती ‘बुडणारी वसई’, ‘पर्यावरण प्रदूषित वसई’ होता कामा नये. विकासाच्या नावाखाली असलेले मॅनरोज पुरण्याचा सपाटा सुरू आहे. वसईत ११४ अधिकृत तलावे आहेत ती वाचवून त्यांचे संवर्धन झाले पाहिजे. आपल्या आयुष्यात प्रत्येकाने निदान एकतरी झाड लावले तर ४०० कोटी झाडे लागू शकतात.

**जेनिफर डिसिल्वा :** मूळच्या मुंबई, बॅण्ड्रावासीय. नंतर त्या

वसईतील युवकांच्या प्रेमात पडल्या आणि वसईकर झाल्या. नंतर त्या वसईची संस्कृती, माती, निसर्ग ह्यांच्या प्रेमात पडल्या. त्यांनी ‘व्हिस्परिंग ग्रीन फाऊंडेशन’ची स्थापना केली. त्या म्हणाल्या, प्लास्टिक ही आपली लाईफस्टाईल बनली आहे. प्रत्येक गोष्ट आपण प्लॅस्टिकची वापरतो. प्लास्टिक म्हणजे आपले जीवन बनले आहे. प्लास्टिक आपणास गुणवंती पदार्थ वाटतो. त्यामुळे त्यातून ‘युज अ‍ॅण्ड थ्रो’ची विचारसरणी रुजली. प्लास्टिक अविघटनशील पदार्थ आहे. प्लास्टिक मातीचा पोत खराप करतो. त्यामुळे पर्यावरण प्रदूषणात प्लास्टिक हानिकारक आहे. म्हणून प्लास्टिक गोळा करून त्याने रिसायकलिंग करण्यास सुरुवात केली. त्यामुळे वसईची सुंदरता जपण्याचा आमचा प्रयत्न आहे. आज ‘प्लास्टिक फ्री वसई’ योजना आम्ही राबवीत आहोत. त्यासाठी रिसायकलिंग करणे आवश्यक ठरत आहे. ह्यासाठी लोकांचेही सहकार्य आता मिळत आहे.

**लॉना वाझ :** ‘थिंक ग्लोबली अ‍ॅक्ट लोकली’ ह्या दृष्टीने आजच्या परिसंवादात सहभागी व्यक्तींनी आपले विचार मांडलेले आहेत. अर्थात, हे त्यांचे केवळ विचार नाहीत, तर त्यांच्या विचारांना त्यांनी दिलेली कृतींची जोड आहे, जी आपल्यासाठी प्रेरणादायी ठरते.

आजच्या परिसंवादातून एक गोष्ट प्रकर्षाने समोर आली -

पर्यावरण रक्षण ही केवळ एखाद्या संस्थेची किंवा काही पर्यावरणप्रेमींची जबाबदारी नाही. ही आपल्या प्रत्येकाच्या जगण्याशी जोडलेली जबाबदारी आहे.

मान्यवरांचे तीन संदेश पण ध्येय एकच. ते म्हणजे निसर्गाचे रक्षण आणि पुढच्या पिढीचे भविष्य सुरक्षित करणे. साहित्य समाजाला प्रश्न विचारते; तर पर्यावरण चळवळ त्या प्रश्नांना कृतींची दिशा देते. पर्यावरण वाचविण्यासाठी मोठ्या घोषणांची नव्हे; तर छोट्या कृतींची गरज आहे. निसर्ग आपल्याकडे उद्याची हमी मागत नाही, तो फक्त आजची आपली जबाबदारी मागतो.

म्हणूनच 'सुवार्ता' साहित्य मेळाव्यातील हा परिसंवाद केवळ चर्चा न राहता, वसईच्या पर्यावरणासाठी नव्या सामाजिक संकल्पनाची सुरुवात ठरावी.

प्रास्ताविक करताना 'सुवार्ता' मासिकाचे संपादक फा. जोएल डिकुना म्हणाले, ''मराठी ही केवळ आपल्या चलनाच्या नोटीवरीलच १८ भाषांपैकी केवळ एक भाषा नव्हे, तर आपणा सर्वांना घडविणारी मायभाषा आहे. मराठीतील 'ळ' ही आपल्या मराठीची खरी ओळख आहे. आणि 'सह हित', 'समाजाचे हित' म्हणजे 'साहित्य' होय. ह्या उदात्त हेतूने हा ४५वा साहित्य मेळावा आहे.'' जल-जमीन-जंगल-जानवर व जीवसृष्टीचे रक्षण व संरक्षण करणे आवश्यक आहे. म्हणून 'पर्यावरण परिसंवाद' आणि आपल्या देशाच्या 'संविधानविषयक साक्षरता' ह्या दोन विषयांवर त्यांनी उपस्थितांचे लक्ष केंद्रित केले.

सुवार्ता साहित्य मेळाव्याची सुरुवात गायक संजीव गोन्सालविस आणि चुळणे गायकवृंद ह्यांच्या साथीने 'गगन सदन तेजोमय' ह्या प्रार्थनागीताने झाली. नंतर मान्यवरांच्या हस्ते वृक्षवाटिकांचे जलसिंचन करून साहित्य मेळाव्याचे उद्घाटन झाले. त्यावेळी 'बूँद बूँदसे' हे प्रार्थनागीत गायिले गेले.

ह्या प्रसंगी सुवार्ता मासिकाचे सहकारी (नाझरेथ अथाईत, सांडोर; बेंजामीन केदारकर, नंदाखाल; झेवियर डिसोजा, गिरीज; झेवियर डिमेलो, पापडी; रेमंड मच्याडो, रमेदी; सॅण्ड्रा अथाईत, सांडोर) ह्यांचा आणि सामाजिक योगदान कार्यकर्ते (दिव्यांग सेवेसाठी सिंथिया बाप्तिस्टा, पापडी; लोकगीतांसाठी विल्यम अथाईत, गिरीज; उपासना संगीतासाठी अँथनी हिलरी परेरा, पापडी; आदिवासींसाठी शैक्षणिक कार्याबद्दल फिलीप दादोडा, तलासरी मिशन; संत विन्सेन्ट डी पॉल सोसायटीमार्फत गरीब व गरजवंत लोकांच्या सेवेबद्दल लखु देवल्या कांटेला ऊर्फ लखु गुरुजी, गांगणगाव, तलासरी मिशन) ह्यांचा सन्मान करण्यात आला. मान्यवरांची ओळख ॲड. विल्यम फर्नांडीस आणि सन्मानमूर्तींचा परिचय जॉन गोन्सालविस व वेरोनिका रिबेलो ह्यांनी केले. फा. मॉर्गन फर्नांडीस व सौ. हेलन रॉबी डिसिल्वा ह्यांनी सूत्रसंचालन केले. लुकस परेरा ह्यांनी आभार मानले. फा. रॉबर्ट गोन्सालविस ह्यांनी गायिलेल्या पसायदानाने सुवार्ता साहित्य मेळाव्याची सांगता झाली.

## वर पाहिजे

**वधू :** जन्म : दिनांक ३ मार्च १९९४, उंची : ५'-५'', शिक्षण : M.Sc. Chemistry, B.Sc. Computer Science, B.Ed., D.Ed., इंग्लिश मिडियम, नोकरी : शिक्षिका.

**अपेक्षित वर :** रोमन कॅथलिक, अनुरूप.

**Contact : 82 61 02 58 65**

## जागा विकणे आहे

वसई अर्नाळा रोड, गास फाट्याजवळ फक्त दोन मिनिटे अंतरावर १८ गुंठे शेतजमीन विकणे आहे.

**संपर्क : डिकुना**

**94 22 09 35 43**

**75 58 20 38 29**

## ग्लोरिया मंडप डेकोरेटर

मुसारवाडी, गिरीज : **9822608898**

१) १नोव्हें. ते ३०नोव्हें.२०२६पर्यंत होणाऱ्या कार्यक्रमासाठी खास सूट. आपला कार्यक्रम नोव्हेंबर महिन्यात असेल तर आम्हाला फोन करायला विसरू नका.

२) कार्यक्रमासाठी जागा उपलब्ध आहे. पार्कींग-सह ७००/८०० लोकांची सोय. ठिकाण : बाळ येशू चर्च, मर्सेस.

३) गिरीज, भुईगाव, सांडोर, रमेदी, होळी ह्या ठिकाणी कार्यक्रमास जागा भाड्याने द्यायची असल्यास संपर्क साधा.

४) नवीन खुर्च्या विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

## वर पाहिजे

**Bride :** 29 years, Roman Catholic from a decent family.

Education Master's, well qualified, professional, working in a reputed Company in UAE.

**Expectted Groom** : Suitable to the Bride, Roman Catholic, working overseas or India with a stable job.

Contact : Suvarta

**Post Box No. : NOV 01**

## Wanted Groom

**Bride :** 31 years , 5'-3", Roman Catholic, Vadval, Resident of Vasai, Working in Mumbai. Job : Teacher. Edu. : MA, D.Ed , B.Ed.

**Expectations** : Suitable for the bride, Roman Catholic, good behaviour, age upto 35years, good family background, well educated, hardworking and responsible.

**silverbloom2000@gmail.com**

## वर पाहिजे

**वधू :** वय २८ वर्षे, उंची ५'-३'', शिक्षण : L. L. M., इंग्लिश मिडियम, मुंबईत चांगल्या कंपनीत कायम स्वरूपी नोकरी.

**अपेक्षित वर :** रोमन कॅथलिक, वय ३४ वर्षे, शिक्षण : वधूस अनुरूप.

**Contact : 78 75 60 63 03**

## Groom Wanted

**Bride :** Height 5.2 ft, Fair Complexion. Roman Catholic, Vasai Wadwal.

**Qualification :** Post Graduation +. Working in reputed Investment Company.

**Expectaion**: Suitable for Bride.

**Contact**

**gentleman.vasai@gmail.com**

## वर पाहिजे

**वधू :** वय ३० वर्षे, उच्चशिक्षित (Medical Side) USA मध्ये

**अपेक्षित वर :** उच्चशिक्षित USA मध्ये नोकरी करणारा.

**Contact : Suvarta**

**Post Box No. : NOV 02**

## Groom Wanted

**Bride :** 30 years , height 5'-5", R.C., Vasai, from educated decent family, B.Tech from National Inst., M.S.from America, worked in America's renowned company, very good looking.

**Expectted Groom** : Suitable , well educated, caring, working in America, Canada or Europe with P.R.

**Box No. Nov. 05**

## Groom Wanted

**Bride:** Age 30yrs. Height 5.4 ft, Fair Complexion.R.C from Wadaval, Vasai. Having good family background. **Edu.** B.E. in Computer Enginering & Working in reputed company (Europe).

**Expectaion :** Graduate or Post Graduate, working and setteld in abroad. **Age :** 30 yrs - 35 yrs.

**Cont. :-**

**9860448139/7666852791**

## वर पाहिजे

**वधू :** जन्म : ३० ऑगस्ट १९९७, **शिक्षण :** एम.बी.बी.एस., एम.डी. (भुलतज्ज्ञ) दुसरे वर्ष. गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेज, छत्रपती संभाजी नगर.

**अपेक्षित वर :** कॅथोलिक, एम.डी. डॉक्टर, सर्जन, भुलतज्ज्ञ. निर्व्यसनी.

**संपर्क : जॉन वाघमारे**

**98 22 44 24 03**

## वर पाहिजे

**वधू :** जन्म : १८ जानेवारी १९९९

**शिक्षण :** एम.ए. (क्लिनीकल सायकॉलॉजी) युजीसी नेट परिक्षा उत्तीर्ण.

**नोकरी :** सहा. प्राध्यापक, एस.पी. कॉलेज, पुणे.

**अपेक्षित वर :** कॅथोलिक, उच्चशिक्षित, सरकारी नोकरी असलेला, प्राध्यापक, निर्व्यसनी.

**संपर्क : जॉन वाघमारे**

**98 22 44 24 03**

## सन्मान

### ‘सुवार्ता’ मासिकासाठी सहकार्य

**श्री. नाझरेथ अथाईत, सांडोर**

ऑगस्ट २०१०पासून मॉन्सि, फ्रान्सिस कोरिया संपादक होते त्या वेळेपासून आजपर्यंत तब्बल १६ वर्षे मुद्रण शोधनाचे काम ते नित्यनेमाने करीत आहेत. वेळप्रसंगी ‘सुवार्ता’ मासिकातून लेखनही ते करतात.

**श्री. झेवियर डिसोजा, गिरीज**



‘सुवार्ता’ मासिकासाठी फा. फ्रान्सिस दिब्रिटो ह्यांच्या काळात जवळ-जवळ १५ वर्षे उपसंपादक म्हणून त्यांनी भूमिका निभावलेली आहे. वेगवेगळ्या नियतकालिकांत ते नियमितपणे कथा, वैचारिक लेख लिहीत असतात.

**श्री. बेंजामीन केदारकर, नंदाखाल**



‘सुवार्ता’चे उपसंपादक म्हणून १९९१पासून जानेवारी १९९८ पर्यंत जवळजवळ साडेसात-आठ वर्षे सहकार्य दिलेले आहे. सध्या त्यांची ‘महाराष्ट्र टाईम्स’ व ‘लोकसत्ता’ ह्या ख्यातनाम दैनिकांत जवळजवळ ३०० ‘संपादकास पत्रे’ प्रकाशित झालेली आहेत. ‘संपादकास पत्रे’ हे त्यांचे विशेष प्राविण्य आहे. **‘नंदादीप’** ह्या त्रैमासिकाचे त्यांनी दहा वर्षे संपादन केले आहे.

**श्री. झेवियर डिमेलो, पापडी**

‘सुवार्ता’ मासिकासाठी फा. फ्रान्सिस दिब्रिटो ह्यांच्या काळापासून जवळ-जवळ १५ वर्षे ते सहकार्य करीत आहेत. ‘विशाल विश्वात’ हे त्यांचे ‘सुवार्ता’मधील सदर लोकप्रिय आहे. त्यांनी **‘अभंग’** व **‘शब्दवेल’** ह्या अंकाचे संपादन केलेले आहे.

**श्री. रेमंड मच्याडो, रमेदी**

‘सुवार्ता’ मासिकासाठी त्यांनी फेब्रुवारी १९९९पासून २००३पर्यंत चार वर्षे योगदान दिलेले आहे. सध्या ते वसई मराठी ख्रिस्ती साहित्य मंडळाचे अध्यक्ष आहेत. त्यांची ‘कोपात’, ‘जॉना कुमारी’, ‘मेलबर्न मॅगपाय’ कादंबरी लेखन ह्याशिवाय वैचारिक लेखन, प्रवास वर्णन अशी मराठी व इंग्रजी पंधरा-सोळा पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. व्हॅटिकन सिटीच्या आकाशवाणीवर त्यांनी चार वर्षे कार्य केलेले आहे. **‘कोपात’** ह्या कादंबरीची मुंबई विद्यापीठाच्या बी.ए. द्वितीय वर्षाचे पाठ्यपुस्तक म्हणून निवड झालेली आहे.

**सौ. सॅण्ड्रा अथाईत, सांडोर**

जीवन दर्शन केंद्रात त्यांनी एकूण ३९ वर्षे सेवा दिलेली आहे. त्यापैकी ‘सुवार्ता’ मासिकाच्या कार्यालयात कार्यवाहक म्हणून त्यांनी २६ वर्षे योगदान दिलेले आहे.

## सामाजिक योगदान

**सिंथिया बाप्तिस्टा, पापडी**

दिव्यांगाचे स्वप्न आपल्या मुठीत घेऊन दिव्यांगांसाठी आभाळमाया निर्माण करणाऱ्या आणि मागील ४०वर्षे ते स्वप्न प्रत्यक्षात साकारणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे सिंथियाताई बाप्तिस्टा. नुकतेच त्यांचे ग्रंथाली प्रकाशनने 'अपंग नव्हे अभंग' आणि 'टेकडीवरील फुले' ही पुस्तके प्रकाशित केलेली आहेत.

**विल्यम अथाईत, गिरीज**

संगीत क्षेत्रातील विल्यम अथाईत ह्यांचे योगदान खूप मोलाचे आहे. विशेषत: 'गुलाबाच्या फुलाला...' इतका जरी उच्चार केला तरी समोर नाव येते ते विल्यम अथाईत ह्यांचे. वसईतील लोकगीताला मराठी प्रवाहात आणण्याचे महान कार्य त्यांनी केलेले आहे. त्यांचे कार्य म्हणजे वसईच्या बोली भाषेचा, वसईच्या संस्कृतीचा आणि वसईच्या मातीचा सन्मान आहे.

**अँथनी हिलरी परेरा, पापडी**



द्वितीय व्हॅटिकन परिषदेच्या प्रकाशात ग्रेगोरियन संगीत व प्रादेशिक मराठी भाषेचा संगम साधण्याची साधना मागील ५० वर्षे ते संगीत प्रशिक्षण व गायकवृंदाद्वारे करीत आहेत. विशेष म्हणजे ह्या क्षेत्रात नव्या पिढीला घडविण्याचा देखील संकल्प ते सिद्धीस नेत आहोत.

**फिलीप दादोडा, तलासरी**

सूत्रकार, तलासरी येथे राहणारे श्री. फिलीप दादोडा ह्यांनी ज्ञानमाता शिक्षण सोसायटीद्वारे २७ वर्षे सहशिक्षक व ४ वर्षे उपलाट येथील हायस्कूलचे मुख्याध्यापक म्हणून कार्य केले आहे. त्याचबरोबर तलासरी येथील सहकारी पतपेढीचे ते २०००साली संस्थापक अध्यक्ष होते व आता अध्यक्ष आहेत.

**लखु देवल्या कांटेला (लखु गुरुजी)**

गांगणगाव, तलासरी येथे राहणारे श्री. लखु देवल्या कांटेला ह्यांनी ३६ वर्षे त्यांनी ज्ञानदानाचे कार्य केलेले आहे. २०११पासून सेंट विन्सेंट डी पॉल संघटना, गांगणगावच्या स्थापनेपासून संस्थापक-अध्यक्ष म्हणून ही जबाबदारी २०१७पर्यंत पार पाडली. पुढे मिशन वसई एरिया कौन्सिलच्या स्थापनेपासून २०१७ ते २०२३ पर्यंत अध्यक्षाची धुरा वाहिली. बहारे व वरखंडा एरिया कौन्सिलचे मार्गदर्शक म्हणून ते भूमिका बजावत आहेत. तलासरी येथे त्यांनी १७ मिशन कॉन्फरन्स स्थापन करण्यात पुढाकार घेतलेला आहे.

बोलक्या प्रतिक्रिया

# सुवार्ता मेळावा वर्ष ४५!

## सामान्य माणसाच्या जीवनाला स्पर्श

यंदाचा सुवार्ता साहित्य मेळावा म्हणजे एक वेगळे, हरित वसईच्या दिशेने टाकलेले पाऊल वाटले. तशी अपेक्षा ॲड. जयंत जायभावे ह्यांच्या भाषणानंतर एका श्रोत्यांनी (श्री. संदेश घोलप) फादर फ्रान्सिस दिब्रिटो ह्यांची स्मृती जागृत करून व्यक्त केली देखील. यंदा मेळाव्याचे विषयच सामान्य माणसाच्या जीवनाला स्पर्श करणारे होते. 'पर्यावरण आणि संविधान' ऱ्हासाला जबाबदार असणाऱ्यांना जाब विचारणारे होते. पहिला विषय लोकल होता; तर दुसरा विषय नॅशनल होता.

पहिल्या सत्रात वसईच्या पर्यावरण ऱ्हासाला जबाबदार कोण? आणि त्यावर प्रत्येक नागरिक उपाययोजना कशी करू शकेल ह्याचा शोध घेतला गेला. ध्यास फाउंडेशनच्या संस्थापिका कीर्ती शेंडे, 'विस्परिंग ग्रीन' फाऊंडेशनच्या संस्थापिका जेनिफर डिसिल्वा आणि पर्यावरण कार्यकर्ते मॅकेन्झी डाबरे ह्या तिन्ही वक्त्यांनी स्वतःच्या अनुभवांतून फार सुंदर विचार मांडले. पण फक्त नागरिकांच्याच कर्तव्यांची जाणीव करून दिली. शासनाची जबाबदारी नाही का? वास्तविक शासनच कायदे करून व त्यांची नागरिकांकडून कडक अंमलबजावणी करून घेऊन पर्यावरण सुरक्षित ठेवू शकते. ह्याबाबतीत शासनाचे दुर्लक्ष सर्वश्रुत आहे.

उलट शासनच आज असे काही पर्यावरणाचे विनाशकारी राक्षस उभे करते की त्यांच्या सामान्य नागरिक हतबल होतो, प्राण कंठाशी आणतो! ही अगतिकता दर्शविण्यासाठी एकदा वसईत नागरी आघाडीने गळ्यात गळफास टांगून एक मोर्चा काढला होता! एकच वाढवण बंदराचे उदाहरण घेऊ या. त्या राक्षसाने सगळा समुद्र, खाड्या, इतकंच नव्हे; तर वसई ते पालघरपर्यंतची किनाऱ्यावरची गावेच्या गावे बुडतील, अशी अवस्था निर्माण केली आहे! त्यापुढे सामान्य नागरिक काय करणार? एकच करू शकेल की तो घर विकून शहरात एका फ्लॅटमध्ये जाऊन लपून बसेल! अशी वसईकरांची अगतिकता परिसंवादात कुठेच व्यक्त झाली नाही.

दुसऱ्या सत्राचा विषय होता : 'संविधान आणि आजची परिस्थिती.' ॲड. जयंत जायभावे ह्यांनी संविधानावर उत्तम माहिती दिली. 'लोकशाही म्हणजे अल्पमताचा आदर करणारे बहुमत!' सुंदर विचार! पण संविधानाची आजची नाजूक स्थिती दाखवली गेली नाही. संविधानाचे आज जागोजागी खून पडत आहेत. जंतर मंतरवर लाखोंत जेन-झेड युवक-युवती संविधान बचावासाठी गृहमंत्र्याच्या ताब्यातील पोलिसांचा लाठीमार सहन करीत रात्रंदिवस लढत आहेत. बीजेपी संविधान बदलेल, अशी भीती होती; पण मोदी सरकारने संविधान न बदलता आज मनुस्मृती प्रत्यक्षात आणली आहे! व्होट चोरीचा उल्लेख शेवटी झालाच!

**-फादर मायकल जी.,** क्लर्जी होम, सांडोर

## उत्तम नियोजन

एक चांगला कार्यक्रम. बऱ्याच वर्षानंतर मी 'सुवार्ता' मेळावा अटेंड केला. खूप चांगले नियोजन होते.

**- ॲड. विल्यम फर्नांडिस,** मर्देस

## प्रभावी परिसंवाद

'सुवार्ता' साहित्य मेळावा अत्यंत प्रभावी झाला. 'पर्यावरण परिसंवादा'त तिघेही छान बोलले. मॅकेन्झी तर अप्रतिम! सर्वांचे अभिनंदन!

**- स्टिफन एम. परेरा,** मर्सेस

## हृदयस्पर्शी

'सुवार्ता' साहित्य मेळावा कार्यक्रम सुरेख, हृदयस्पर्शी झाला. आपल्या टीमचे अभिनंदन!

**- संदेश घोलप,** कार्यकर्ता अनिस, विरार

## अभिनंदन

'सुवार्ता' साहित्य मेळावा अतिशय चांगला झाला. माझी प्रकृती ठीक नसतानाही मी संपूर्ण कार्यक्रम पाहिला-ऐकला. संपादक आणि त्यांचे सर्व सहकारी ह्यांचे अभिनंदन!

**- पीटर कर्नेल,** मुळगाव


"ख्रिस्मस स्टॉल : २०२६"

**जीवन दर्शन केंद्र, गिरीज**

**वेळ : सकाळी ९.०० ते संध्याकाळी ७.००**

**संपर्क : रॉयल डिसोजा**

**98 23 34 68 01 / 9702090232**

# आजची वसई : युवा संवाद

## ‘धीर धरा, मी जगावर विजय मिळविला आहे!’ (योहान १६:३३)

गिरीज : वसई धर्मप्रांतातील ‘युवदर्शन’तर्फे धर्मप्रांतीय युवादिन २०२६ हा कार्यक्रम जीवन दर्शन केंद्र, गिरीज येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. ह्या कार्यक्रमात विविध धर्मग्रामांतील युवा संचालक, ॲनिमेटर्स, कोअर कमिटीचे सदस्य आणि युवक-युवती मिळून एकूण २८० जण सहभागी झाले. कार्यक्रमाची सुरुवात प्रार्थना, कृतिगीते आणि परिचय सत्राने झाली. ‘युवदर्शन’चे संचालक, फा. ख्रिस्तोफर वाझ ह्यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. त्यानंतर ‘आजची वसई : युवकांशी संवाद’ ह्या परिसंवादातून वसईतील सामाजिक प्रश्न, नागरी जबाबदाऱ्या, शैक्षणिक ताण आणि युवकांसमोरील आव्हानांवर विचारमंथन करण्यात आले. परिसंवादात डॉमिनिका डाबरे, मिलिंद खानोलकर व सचिन मर्ती ह्यांनी आपले विचार मांडले.

डॉमिनिका डाबरे ह्यांनी हरित वसईचे काँक्रिट वसईत होत असलेले रूपांतर आणि वाढत्या बांधकामांचे पर्यावरणावर होणारे परिणाम ह्यांविषयी चिंता व्यक्त केली. वसईच्या बागायती पट्ट्यातील वाढता FSI आणि त्याचे भविष्यातील परिणाम अधोरेखित केले. वसईचा हरित पट्टा, निसर्गसंपदा आणि पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी योग्य उपाययोजना करण्याची गरज त्यांनी स्पष्ट केली. बदलत्या वसईच्या विकासामध्ये युवकांचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच, वसईचे नैसर्गिक सौंदर्य आणि पर्यावरण वाचविण्यासाठी युवकांनी जागरूक राहून जबाबदारीने पुढाकार घ्यावा, असा संदेश त्यांनी दिला.

मिलिंद खानोलकर ह्यांनी वसईतील प्रमुख नागरी समस्या आणि त्यांचा स्थानिक नागरिकांच्या जीवनावर होणारा परिणाम ह्यांविषयी आपल विचार मांडले. स्थानिकांच्या घरांचे नियमितीकरण आणि वाढत्या घरपट्टीच्या प्रश्नावर त्यांनी लक्ष वेधले. वसईतील भूमिपुत्रांचे अस्तित्व, हक्क आणि सांस्कृतिक ओळख जपण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. वसईचा नियोजनबद्ध विकास

करताना येथील हरित पट्टा आणि नैसर्गिक संपत्तीचे संरक्षण करण्याची गरज व्यक्त केली. वसईचा वारसा, पर्यावरण आणि स्थानिक नागरिकांचे हित जपण्यासाठी सामूहिक प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले.

सचिन मर्ती ह्यांनी वसईतील पाण्याची समस्या आणि भौगोलिक परिस्थिती लक्षात घेता जलसंधारणाचे महत्त्व अधोरेखित केले. पिण्याच्या पाण्यासाठी RO फिल्टर हा कायमस्वरूपी उपाय नसून केवळ तात्पुरता पर्याय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पाण्याची उपलब्धता वाढविण्यासाठी तलाव, बावखल आणि पारंपरिक जलस्रोतांचे संवर्धन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. भूजल पातळी वाढविण्यासाठी पावसाचे पाणी साठविणे आणि जलस्रोतांची नियमित स्वच्छता करणे गरजेचे असल्याचे नमूद केले. वसईचे जलवैभव जपण्यासाठी युवकांनी पुढाकार घेऊन जलसंवर्धनाच्या उपक्रमांत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

परिसंवादाचे संयोजन अध्यक्ष फ्लिन फरोज ह्यांनी केले. आठ गटांमध्ये कार्यशाळा घेण्यात आली. युवकांनी विविध सामाजिक समस्यांचे विश्लेषण करून त्यावरील व्यावहारिक उपाय आणि कृती योजनांची आखणी केली. ह्या योजनांचे सर्जनशील व्हिडिओंद्वारे सादरीकरण करण्यात आले. बिशप थॉमस डिसोजा ह्यांच्या मार्गदर्शनाने आणि व्हिकर जनरल फा. जोएल डिकुन्हा ह्यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

दुपारच्या सत्रात विविध धर्मग्रामांतील युवकांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. भुईगाव धर्मग्रामाच्या युवकांनी ‘आजची वसई’ ह्या विषयावर प्रभावी पथनाट्य सादर करून सामाजिक प्रश्नांबाबत जागृती निर्माण केली. ह्यासाठी जेरोम लोपीस व मॅक्सवेल रोज ह्यांनी विशेष सहकार्य केले. कार्यक्रमाच्या शेवटी आभार प्रदर्शन, बिशपांचा आशीर्वाद आणि सहभागी युवकांना वृक्षरोपांचे वितरण करण्यात आले.

ह्या युवादिनाने युवकांना केवळ समस्यांवर चर्चा करण्याची नव्हे, तर जबाबदारी स्वीकारून सकारात्मक परिवर्तन घडविण्याची प्रेरणा दिली. ‘श्रद्धेत दृढ, विचारांत जागरूक आणि कृतीत सक्रिय’ राहून समाजाचे परिवर्तन घडविणारे ख्रिस्ताचे साक्षीदार बनण्याचा संदेश ह्या कार्यक्रमातून देण्यात आला.

- **स्विनल कर्वाल,** उपाध्यक्ष, युवदर्शन

# मला भावणारा संत

## संत पॉल

संत पॉल हा मला भावणारा संत आहे. बायबलमध्ये एकूण ७३ पुस्तके आहेत. जुन्या करारामध्ये ४६ आणि नव्या करारामध्ये २७. नव्या करारातील २७ पुस्तकांमधील १३ पत्रे संत पॉलचीच आहेत. दमास्कसच्या रस्त्यावर प्रभू येशूचे दर्शन झाल्यानंतर संत पॉलच्या हृदयपरिवर्तनास शुभारंभ झाला आणि नंतर संत पॉलनी कधी मागे वळून पाहिलेच नाही. संत पॉलनी स्वतःच्या जीवनात प्रभू येशू ख्रिस्ताला संपूर्णपणे कसे परिधान केले आणि मानवीय जीवनात येशू ख्रिस्तामध्ये कसे संधान साधले आणि कशी प्रभू येशू ख्रिस्तामध्ये एकरूप झाला त्याची अतिसुंदर अभिव्यक्ती ते गलतीकरांस पत्रामध्ये (२:१९-२२) करतात.

''जगतो जीवन नव्हे मी माझे ।
ख्रिस्त जगतसे मम जीवनी ।।
एकरूप मी प्रभूत होई ।
देह रुधिर सेवन करुनी ।।

संत पॉलच्या पत्रामध्ये संत पॉल आपणास सांगतात, ''तुमचे मन आणि हृदय प्रभू येशू ख्रिस्तासारखे बनवा आणि प्रभू येशू ख्रिस्तासारखे जीवन जगा.'' कर्मकांडापेक्षा ते प्रभू येशू ख्रिस्तासारखे जीवन जगण्यास महत्त्व देतात आणि म्हणूनच आपण संत पॉलच्या पत्रामधील गोषवारा आणि मध्यवर्ती संदेशानुसार देवळांमध्ये दुसरे एक अतिसुंदर गीत मोठ्या आनंदाने गात असतो : ''किती आनंद हा, किती आनंद हा, प्रभू येशूने दिला आम्हा. अती भरपूर तो मती धुंद करितो, वर्णन करण्या न पुरे जिव्हा.''

- **फा ॲण्ड्र्यू जोसेफ डाबरे,** ये. सं. पिंपरी डांग, गुजरात
मोबाईल : 94 09 35 09 90

## संत अँथनी

महान चमत्कारकर्ता आणि हरवलेल्या वस्तूंचा शोधकर्ता संत अँथनी मला विशेष भावणारा असा संत!

पहिली घटना साधारणतः ५/६ वर्षांपूर्वीची! माझ्या मोठ्या मुलीचे सर्व दागिने मी कॅथलिक बँकेतील माझ्या लॉकरमध्ये ठेवले होते. कुठेतरी लग्नाला जाण्यासाठी तिला ते तातडीने हवे होते. मी हातचे काम सोडून कपाटातील विशिष्ट खण उघडला व चावी शोधू लागलो, पण काहीकेल्या चावी सापडेना! मग इतरही खण शोधले पण प्रयत्न व्यर्थ! शेवटी मी संत अँथोनीचा धावा केला व खण उघडून शोध घेतला, तर लॉकरची चावी सर्व चाव्यांच्या अगदी वरच मला सापडली.

दुसरी घटना गेल्या वर्षीची! आंघोळीनंतर हॉलमध्ये येताच पत्नीने माझ्या बोटाकडे पाहत विचारले, ''अंगठी काढून ठेवली का?'' मी माझ्या बोटाकडे पाहत ''नाही'' असे उत्तरलो आणि माझ्या तोंडचे पाणी पळाले. घाबराघुबरा होत संपूर्ण न्हाणीघरात व हॉलभर अंगठीचा कसून शोध घेतला, पण अंगठी काही केल्या सापडेचना! लगेच पत्नी संत अँथनीचा धावा करत मला म्हणाली, ''सोफा जरा बाजूला सरकवा पाहू!'' सोपा सरकवताच काय चमत्कार, अंग पुसता पुसता नकळत बोटातून लादीवर घरंगळून पडलेली व टुणकन् उडलेली अंगठी आमच्या उभयतांकडे एकटक आशेने बघत होती.

वरील दोन्ही सत्य प्रसंग आजही स्मरताच संत अँथनीच्या भव्य तसबिरीसमोर माझे हात आपोआप जोडले जातात. धन्य ते संत अँथनी ! !

- **बेन्जामिन केदारकर,** नंदाखाल
मोबाईल : 92 09 19 50 61

## बाळ येशूची संत तेरेजा

मला सर्वांत भावणाऱ्या संत म्हणजे बाळ येशूची संत तेरेजा. त्यांना प्रेमाने 'लिटल फ्लॉवर' (Little Flower) असे संबोधले जाते. त्यांचा जन्म २ जानेवारी १८७३ रोजी

फ्रान्समधील अलाँसॉन येथे झाला. लहानपणापासूनच त्यांच्या मनात येशू ख्रिस्ताविषयी अपार प्रेम आणि देवावर दृढ श्रद्धा होती. वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षी त्यांनी कार्मेलाईट संघात प्रवेश केला. संत तेरेजांनी आपले संपूर्ण जीवन देवाच्या प्रेमासाठी समर्पित केले. त्यांनी 'लिटल वे' म्हणजेच 'लहान मार्ग' शिकवला. त्यांच्या मते, दैनंदिन जीवनातील छोटी-छोटी कामेही प्रेम, नम्रता आणि श्रद्धेने करणे महत्त्वाचे आहे. क्षमा, त्याग, साधेपणा आणि प्रत्येक व्यक्तीवर प्रेम करणे, हे त्यांच्या जीवनाचे वैशिष्ट्य होते.

१ ऑक्टोबर रोजी त्यांचा सण साजरा केला जातो. त्यांच्या आध्यात्मिक शिकवणीचे महत्त्व ओळखून पोप संत जॉन पॉल द्वितीय ह्यांनी १९९७ मध्ये त्यांना 'Doctor of the Church' म्हणजेच 'चर्चच्या धर्मशिक्षिका' हा बहुमान दिला.

बाळ येशूची संत तेरेजांचे जीवन मला शिकवते की, छोटी कृतीही मोठ्या प्रेमाने केली तर ती देवाच्या दृष्टीने महान ठरते.

**-ब्रिनल सेल्विन क्रास्टो,** परसाव, नंदाखाल

मोबाईल : 92 09 19 50 61

## संत जेरोम



संत जेरोम हे महान धर्मपंडित होते. त्यांचा जन्म युगोस्लाव्हिया प्रांतात झाला. त्यांनी प्रथम ईशज्ञानाचा अभ्यास केला. पोप महोदयांनी त्यांची कुशाग्र बुद्धिमत्ता पाहून ५ वर्षांसाठी त्यांना आपले सेक्रेटरी नेमले. त्यांनी बायबलच्या आवृत्तीमध्ये सुधारणा करून ग्रंथालय उघडून स्त्रियांना पवित्र शास्त्राचा अभ्यास करण्यास प्रवृत्त केले.

सडेतोडपणे बोलणारे संत जेरोम ह्यांनी जुन्या व नव्या करारातील पुस्तके हिब्रू व अरेमाईक भाषांतून लॅटिन भाषेत भाषांतरित केली. त्यांना महापुरुष ग्रंथपालाचा आश्रयदाता संत मानले जाते. त्यांच्या मते पवित्र शास्त्र वाचल्यावर प्रार्थना करावी. प्रार्थना करताना पवित्र शास्त्राचा आधार घ्यावासा वाटला पाहिजे. पवित्र शास्त्राचे अज्ञान हे ख्रिस्ताविषयीचे अज्ञान होय. विश्वपरिषदेमध्ये 'जेरोमकृत' भाषांतरित बायबल हे ख्रिस्तसभेचे अधिकृत भाषांतर आहे.

**- वनितामेरी वॉल्टर डिमेलो,** वरभाट, मुळगाव

मोबाईल : 91 86 98 22 76 59

## संत जोसेफ

देवदूताने जोसेफला स्वप्नात दर्शन देऊन म्हटले, "दाविदपुत्रा जोसेफा, मरियेचा स्वीकार करण्यास तू भिऊ नको. कारण ती पुत्राला जन्म देईल व तू त्याचे नाव 'येशू' असे ठेव. कारण तो राष्ट्राचा उद्धार करील" अशा प्रकारे येशूचा पालकपिता म्हणून परमेश्वराने जोसेफची निवड केली.

मरियेचे प्रसूतीचे दिवस जवळ आले त्यावेळी बादशाहाने जनगणना जाहीर केल्याने जोसेफने नाझरेथहून बेथलेहेमला मरियेसह प्रयाण केले. पुढे बेथलेहेम गावात त्यांना राहायला जागा मिळाली नाही. त्यामुळे त्यांना गुरांच्या गोठ्यात आसरा घ्यावा लागला आणि तेथेच मरियेने येशूबाळाला जन्म दिला. पुढे हेरोदच्या भीतीमुळे जोसेफने मरिया आणि येशूबाळाला घेऊन बेथलेमहून इजिप्तला स्थलांतर केले. सिमिओनच्या भविष्यवाणीनंतर जोसेफ मरियेचा आधारस्तंभ बनला. जोसेफ आणि मरिया येशूला घेऊन येरुशलेमात सणाला गेले असता सणाचे दिवस संपल्यानंतर परतीच्या प्रवासात येशू दिसला नाही त्यावेळी नातलग आणि ओळखीचे लोक ह्यांच्यात येशू बाळाला शोधण्यासाठी केलेली धडपड उल्लेखनीय आहे.

दिवंगत पोप फ्रान्सिस आपल्या समस्या संत जोसेफच्या पायाजवळ ठेवत असत आणि त्यातून त्यांना मार्ग सापडत असे. आज समाजात फार मोठ्या समस्या निर्माण होताना दिसतात. कुटुंबं विभागली जात आहेत. अशा वेळी त्यांनी कुटुंबाचा धनी म्हटलेल्या संत जोसेफकडे वळावे. त्याच्या मध्यस्थीची प्रार्थना करावी. नक्कीच त्यातून काहीतरी मार्ग निघू शकेल.

**- श्रीमती प्रेसिला रिचर्ड परेरा,** सांडोर

मोबाईल : 88 88 25 83 58

## संत जोसेफ

वयाच्या अवघ्या पाचव्या वर्षी ज्या संस्थेत माझ्या शिक्षणाचा प्रारंभ झाला, त्या संस्थेचा आश्रयदाता संत जोसेफ. त्यामुळे त्यांच्या शांत साध्या आणि नीतिमान व्यक्तिमत्त्वाची छाप माझ्या कोवळ्या मनावर उमटली. संत जोसेफच्या संस्थेत मला विद्यादानाची सेवा करण्याचे सद्भाग्य लाभले. त्यामुळे संत जोसेफ हे माझ्यासाठी केवळ श्रद्धेचे संत राहिले नाही; तर ते माझ्या जीवन प्रवासाचे एक अविभाज्य साथीदार झाले.

पवित्र मरियेचे पती आणि येशूचे पालनपिता म्हणून संत जोसेफने स्वीकारलली भूमिका विलक्षण आहे. मरिया पवित्र आत्म्याने गर्भवती असल्याचे समजल्यावरही तिची बदनामी न करता तिला गुपचूप सोडण्याचा विचार करणारे जोसेफ स्वप्नात देवदूताचा संदेश मिळताच क्षणाचाही विलंब न लावता मरियेचा आणि येशूचा स्वीकार करतात. हा स्वीकार केवळ एका स्त्रीचा किंवा एका बालकाचा नव्हता; तर तो देवाच्या योजनेचा स्वीकार होता.

मला सर्वाधिक भावते ते त्याचे नीतिमत्त्व आणि मौनातील कर्तव्य. सुतार काम करणारा साधा श्रमिक; पण अंत:करणाने अत्यंत समृद्ध. अहंकार नाही, स्वतःचे मोठेपण सांगण्याची धडपड नाही. त्यांच्या जीवनात बोलण्यापेक्षा जगून दाखविण्याला महत्त्व होते. देवाच्या इच्छेला त्यांनी प्रत्येक वेळी होकार दिला आणि आपल्या कुटुंबाचे प्रेमाने व धैर्याने रक्षण केले. त्यांनी श्रमाला प्रतिष्ठा दिली. आपल्या कष्टाने कुटुंबाचा उदरनिर्वाह करणारा हा साधा सुतार आज जगातील सर्व श्रमिकांसाठी प्रेरणास्थान आहे. चर्चनेही त्यांना ‘श्रमिकांचे आश्रयदाते’ म्हणून गौरविले आहे. संत जोसेफविषयी माझ्या मनात केवळ भक्ती नाही; तर एक जिव्हाळ्याचे प्रेम, कृतज्ञता आणि अभिमान आहे. माझ्या आयुष्यात प्रत्येक वळणावर जणू त्यांच्या शांत सावलीची मला जाणीव होत राहते.

- **सौ. इझाबेल जोकीम कोरिया,** नंदाखाल

## संत मदर तेरेजा

संत मदर तेरेजा एक महान समाजसेविका होत्या. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य गरीब, आजारी, निराधार आणि अनाथ मुलांची सेवा करण्यात घालवले. मदर तेरेजा ह्यांचा जन्म २६

ऑगस्ट १९१० रोजी स्कोप्ये (आताचे उत्तर मॅसेडोनिया) येथे झाला. त्यांचे मूळ नाव अग्नेस गोंक्झा बोजाक्षियू असे होते. १९२९ मध्ये त्या भारतात आल्या आणि त्यांनी कोलकात्यामध्ये राहून गरजूंसाठी कार्य केले.

१९५० मध्ये त्यांनी ‘मिशनरीज ऑफ चॅरिटी’ नावाची संस्था स्थापन केली. ह्या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी रस्त्यावर सोडलेल्या असाहाय्य लोकांसाठी, कुष्ठरोग्यांसाठी आणि अनाथ मुलांसाठी आश्रम सुरू केले. त्यांचे संपूर्ण जीवन निराधार, गरीब, अनाथ, आजारी आणि गरजू लोकांच्या सेवेसाठी समर्पित होते. त्यांनी मानवतेची सेवा हीच खरी ईश्वरसेवा मानली. प्रेम, करुणा, दया आणि सेवाभाव ह्या गुणांचा त्यांनी जगाला आदर्श दिला. त्यांच्या कार्यामुळे त्यांना १९७९मध्ये ‘नोबेल शांतता पुरस्कार’ मिळाला. भारतानेही त्यांना ‘भारतरत्न’ हा सर्वोच्च सन्मान प्रदान केला. ५सप्टेंबर १९९७ रोजी कोलकात्यामध्ये त्यांचे निधन झाले. २०१६ मध्ये त्यांना ‘संत’ म्हणून घोषित करण्यात आले.

संत मदर तेरेजा त्यांच्या निःस्वार्थ सेवेमुळे मला भावतात. त्यांच्या जीवनातून मला गरजू व्यक्तींना मदत करणे, दुःखी व्यक्तींना आधार देणे आणि कोणताही भेदभाव न करता माणुसकी जपणे, ही शिकवण मिळते.

- **सौ. कॅथरीन इरेमस फरगोज,** फा. आग्नेल शेजोळ,गास

## संत जॉन मारी वियानी



संत जॉन मारी वियानी ह्यांचा जन्म ८ मे १७८६ रोजी फ्रान्समध्ये डार्डीली ह्या गावात झाला. त्यांचे बालपण धार्मिक वृत्तीत गेले. बालपणापासून त्यांनी कुटुंबातून नैतिकतेचे व आध्यात्मिकतेचे धडे गिरविले. अत्यंत नम्र व सेवाभावी वृत्तीचे जॉन मारी वियानी ह्यांनी धर्मगुरू होण्याचा निर्णय घेतला. धर्मगुरू झाल्यानंतर आर्स येथील निर्जन स्थळी त्यांची नेमणूक करण्यात आली. आर्स हे गाव तसे म्हटले तर कमी लोकवस्तीचे; परंतु त्यांनी संपूर्ण गाव धुंडाळून लोकांचे

प्रथम प्रायचित्त विधी अमलात आणण्याचा घाट घातला व त्याप्रमाणे प्रत्येकाचे पापनिवेदन ऐकून घेतले.

त्यांच्या पापक्षमेमध्ये एवढी शक्ती होती की ते भाविकांना वाममार्गापासून परावृत्त होण्यास कारणीभूत ठरे. परिणामी भावी आध्यात्मिकतेने तृप्त होत. त्यांची कीर्ती फ्रान्समध्ये चहुकडे पसरली. परिणामी भाविकांची पाप निवेदनाची तहान भागविण्यास त्यांना दिवसाचे १४ ते १८ तास कमी पडत; परंतु त्यांनी ते काम न कुरकुरता केले. परिणामी सरकारला आर्स गावात येणारे रस्ते व जाण्या-येण्याचे प्रवासाचे साधने ह्यांची उपलब्धता करून द्यावी लागली. त्यांचा मृत्यू ४ ऑगस्ट १८५९ रोजी झाला. ते 'सर्व धर्मगुरूंचे आश्रयदाता' म्हणून गणले जाऊ लागले. पोप पायस अकरावे ह्यांनी १९२५ मध्ये त्यांना संतपद बहाल केले.

**- जेम्स अंतोनी लोपीस,** पोंडेवाडी, पाली
मोबाईल : 8407935178

## संत गोन्सालो गार्सिया

वसईच्या मातीत जन्मलेला आणि जपानच्या भूमीत हौतात्म्य पत्करून इतिहासात अजरामर झालेला संत! त्याने आपल्या कार्याने व त्यागाने श्रध्देच्या इतिहासाला नवी उंची दिली. त्याच्या खडतर जीवनाचा प्रवास अनेक पिढ्यांसाठी प्रेरणास्रोत ठरलाय. त्याची जीवनगाथा आठवली की मन श्रद्धेने नतमस्तक होते आणि वसईकर म्हणून ऊर अभिमानाने भरून येतो.

सोळाव्या शतकाच्या पूर्वार्धात आपल्या जन्मभूमीच्या सीमा ओलांडून हा तरुण जपानपर्यंत पोहोचतो, हीच मुळात विलक्षण गोष्ट आहे. त्यांच्या जीवनप्रवासात धाडस, जिद्द, कर्तृत्व आणि श्रद्धेप्रति असलेली निष्ठा ह्यांचा सुंदर संगम पहायला मिळतो. जपानमध्ये व्यापारी म्हणून आपल्या मेहनतीने व्यवसायात सुयश मिळवून तेथील लोकांशी संवाद साधण्यासाठी अस्खलित जपानी भाषा गोन्सालोने आत्मसात केली. अपरिचित संस्कृती समजून घेत, स्थानिक समाजाशी जवळीक निर्माण केली. आपल्या कर्तृत्वाबरोबरच नवे शिकण्याची तयारी, परिस्थितीशी जुळवून घेण्याची वृत्ती आणि प्रतिकूलतेतही पुढे जाण्याची जिद्द त्याच्यात प्रकर्षाने जाणवते.

जपानमध्ये ख्रिस्ती धर्मप्रसाराला विरोध वाढत असताना त्यालाही धार्मिक छळाला सामोरे जावे लागले. अखेरीस इतर धर्मप्रसारकांसह त्यांना मृत्युदंड देण्यात आला. नागासाकी येथे त्यांनी हौतात्म्य पत्करले. त्यांच्या बलिदानातून ख्रिस्तावरील निष्ठेची आणि आपल्या विश्वासांशी प्रामाणिक राहण्याच्या अचाट धैर्याची प्रचिती येते. त्यांचे हौतात्म्य हे मानवी निष्ठा आणि समर्पणाचेही प्रतीक आहे. वसईकर म्हणून आम्हाला त्यांच्या प्रति विशेष आत्मीयता वाटते.

संत गोन्सालो आपल्या भूमीच्या अस्मितेचा, श्रद्धेच्या सामर्थ्याचा आणि मानवी समर्पणाचा जिवंत वारसा आहेत.

**- संजीवनी व डॉनल्ड तुस्कानो,** गास

## संत जोसेफ

ज्यांचे संपूर्ण आयुष्य शांतता, आज्ञाधारकपणा आणि अढळ निष्ठेचे प्रतीक राहिले, असे व्यक्तिमत्त्व म्हणजे संत जोसेफ. माझ्या महाविद्यालयाचा आश्रयदाता संत म्हणून त्याच्याशी माझे एक विशेष नाते आहे. ह्या महान संताचे जीवन आजच्या प्रत्येक विद्यार्थ्यासाठी, पालकासाठी आणि सुजाण नागरिकासाठी दीपस्तंभासारखे आहे. मरियेच्या गर्भावस्थेची बातमी कळल्यानंतर त्यांनी दाखवलेला संयम, देवदूताचे ऐकून केलेला आज्ञाधारकपणा आणि कुटुंबाचे केलेले संरक्षण मला विशेष भावते.

दरवर्षी १९ मार्च रोजी येशूचे पालक आणि माता मरियेचे पती म्हणून त्यांचे कौटुंबिक समर्पण साजरे केले जाते. १ मे रोजी 'कामगारांचा आश्रयदाता संत' म्हणून श्रमाचे मोल आणि सन्मान अधोरेखित केला जातो. संत जोसेफ ह्यांच्या चारित्र्यातील शुचिता इतकी श्रेष्ठ होती की, माता मरिया त्यांच्यासोबत पूर्णत: सुरक्षित व आश्वस्त राहिल्या. सुतारकाम करून त्यांनी कुटुंबाचे पालनपोषण केले. श्रमाला प्रतिष्ठा मिळवून देणे आणि भावी पिढीला स्वावलंबी बनवणे ही त्यांची शिकवण आजच्या तरुणांसाठी अत्यंत मोलाची आहे.

**- डॉ. सुभाष डिसोजा,** उपप्राचार्य, सेंट जोसेफ कॉलेज
मोबाईल : 98 81 62 26 61

## लढवय्या संत मायकल

अंगावर दैवी सैनिकी पोशाख, हातात टोकदार भाला, पिळदार शरीरयष्टी, त्या शरीरयष्टीला शोभेल असा सुंदर पण करारी चेहरा, पायाखाली कासावीस झालेला सैतान, कोणत्याही कणखर माणसाला भुरळ घालणारा व माणिकपूर-सारख्या राकट गावाला लाभलेला एक स्वर्गीय संत. सुमारे ४२५वर्षांपासून ह्या संताने माणिकपूर गावासाठी अनेक सैतानांचा सामना केला.

४००वर्षांपूर्वी लोकांमध्ये अडाणीपणाचा सैतान वावरत होता. गावात आपापसांत भांडणे होऊन घरा-घरांत, नात्या-नात्यांत वैमनस्य धुमसत होते. संत मायकलच्या सरदारांनी (जेज्वीट फादरांनी) धर्माची शिकवण देऊन त्यांना एकत्र आणले. मिस्सेची, प्रार्थनेची गोडी लावली. गावात श्रमदानाच्या माध्यमातून तलाव, रस्ते ह्यांची सुधारणा केली. अडाणीपणाचा सैतान थोडा मागे हटला तरी अशिक्षितपणाचे शेपूट अजून बाकी होते. संत मायकलने आपल्या भात्यातील शिक्षणाचा भाला काढला. गावातील लहान मुलांना एकत्र जमवून झाडाखाली संत मायकलचे सरदार त्यांना शिकवू लागले. कालांतराने शाळा काढल्या. अशिक्षिततेचा सैतान अजून घायाळ झाला. परंतु सैतान कधी मरत नसतो. अजून लोकांमध्ये जुन्या परंपराचा, रुढींचा सैतान वाईट चालीरीतींचा सैतान जिवंत होता. हा सैतान समाजात धुमाकूळ घालू लागला होता. संत मायकलच्या सरदारांनी अथक प्रयत्न करून गावात संघटना काढल्या. मुलामुलींना एकत्र आणून शिक्षण आणि सामंज्यस्यातून त्या सैतानाला घालवून दिले.

आजही सैतान मेला नाही. निरनिराळ्या रूपाने तो अजून जिवंत आहे. शिक्षण वाढले, आर्थिक सुबत्ता आली परंतु पूर्वी ज्या लग्नाच्या, कम्युनियनच्या प्रथा होत्या त्यांनी आता एक वेगळे रूप धारण केले. पैशाच्या ओंगळ प्रदर्शनाने सैतानाने थैमान घातले आहे.

दुसऱ्या बाजूला त्याने आपला विळखा मोबाईल, इंटरनेट, सोशल मीडिया ह्या रूपाने आपल्या मुलाबाळांवर आवळला आहे. मुलांच्या एकूण बुद्धीचा व मनाचा ताबा घेणारा ह्या सैतानाशी आपल्याला लढायचे आहे. चला तयार रहा संत मायकलचे सरदार व खुद्द संत मायकल आपल्या बरोबर आहे.

- **इग्नेशियस पिंटो,** माणिकपूर
मोबाईल : 97 64 33 28 05

## जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती



संत आपल्यासारखेच हाडामांसाचे, आई-बापाच्या पोटी जन्म घेतलेले. माणसांमधून निवडलेले. ईश्वराच्या जनतेची सेवा करण्यासाठी संत जॉन मारी वियानी ह्यांना पाचारण झाले. फ्रान्समधील एका गरीब शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. ते तल्लख बुद्धीचे नव्हते. साधारण प्रकृतीचे. गुरुविद्यालयाच्या बहुतेक परीक्षांमध्ये ते नापास होत. तरीसुद्धा त्यांची जिद्द व आत्म्याविषयीची तळमळ वाखाणण्याजोगी होती.

कन्फेशनच्या परीक्षेत ते अनेकदा नापास होत. गुरुविद्यालयाचे प्राध्यापक त्यांना दीक्षा द्यायला मनाई करत होते. परंतु बिशपांनी त्यांची जिद्द, नम्रता, साधेपणा व तळमळ पाहून त्यांना गुरुदीक्षा दिली. पुष्कळ लोक त्यांच्याकडे पापनिवेदनासाठी येत असत. त्यांच्याकडे देवाशी समेट करून परतताना पश्चात्तापी पापी म्हणू लागले, ''आपल्या फादरांमध्ये आम्हाला ईश्वराचे दर्शन घडले.'' जीवनातील अपयशांना धीर न गमावता ते तळमळीने पुढेच गेले आणि यशस्वी झाले. त्यांची राहणी साधी आणि उच्च विचारसरणी होती.

- **आल्बर्ट कोयलो,** सांडोर

## संत गाडगे महाराज

मला भावणारा संत म्हणजे 'संत गाडगे महाराज.' त्यांनी कधी हार-तुरे घेतले नाहीत, त्यांच्या हातात नेहमी खराटा असायचा. ते म्हणायचे, देव देवळात नाही; तर स्वच्छ रस्त्यात आणि माणुसकीत आहे. आज आपण देवाला नारळ फोडतो पण शेजाऱ्यांशी भांडतो. गाडगे बाबांनी हे चुकीचे आहे, हे दाखवले. त्यांनी गाव स्वच्छ केले, लोकांना शिक्षण दिले. जेव्हा मी आमच्या गल्लीतला कचरा उचलतो, तेव्हा मला त्यांची आठवण येते. त्यांची शिकवण सोपी आहे - आधी माणूस व्हा, मग भक्त. म्हणून ते मला सगळ्यात जास्त भावतात.

- **नागेश प्रमोद राऊत, आगाशी,** भंडारवाडा
मोबाईल : 90 28 28 38 75

## कोरड्या मातीची हाक

आभाळाकडे डोळे लागले
शेतकरी बसला दारात
ढग आले अन् कोरडे गेले
पाऊस नाही शिवारात!

नांगर आहे ,बैलही आहेत
मनगटात ताकद आहे
परि काळ्या आईच्या कुशीत
ओलाव्याची वानवा आहे!

बी पेरताना स्वप्नं पेरली
कणसांची होती प्रतीक्षा
पण उन्हानेच जाळून  टाकली
शेतकऱ्यांची जगण्याची आशा!

विहिरीच्या तळाशी आता
दिसतो फक्त कोरडा पाषाण
घागर घेऊन मैलोनमैल
चालते माय-लेकीची  वाण!

तहानलेली जनावरं हंबरती
‘मालका, पाणी ,चारा कुठं आहे?’
मालकाच्या डोळ्यांत मात्र
कोरड्या अश्रूंची धार!

कर्जाचा डोंगर डोक्यावर
हातात बँकेची नोटीस
पिकाच्या जागी उरली
शेतकऱ्याच्या काळजाची राख!

पाणी अडवा, पाणी जिरवा
ही घोषणा नको फक्त ओठीची
थेंबाथेंबाने पाणी वाचवा
हीच हाक आहे तृषार्त मातीची!

- **ज्यो परेरा,** ज्योती
मोबाईल : 985049749

## राहूनी गेले...?



राहूनी गेले जीवन जगायचे,
प्रश्न पडला आता काय करायचे?
उमगले जेव्हा प्राण निघून गेल्याचे,
भर-भर गणित उभे राहिले
जीवनाच्या वजाबाकीचे.

राहूनी गेले आनंदाने जगायचे,
राहूनी गेले सदाचारी शिक्षण घ्यायचे
राहूनी गेले अनुभवणे शांती-ज्ञान अध्यात्माचे

राहूनी गेले आई-वडिलांशी प्रेमाने बोलण्याचे
राहूनी गेले पत्नीला आदराने वागविण्याचे
राहूनी गेले मुलाबाळांसोबत वेळ घालवण्याचे
राहूनी गेले बहीण-भावाशी आपुलकीने बोलण्याचे
कारण मन होते व्यापलेले,
अंधकारमय द्वेष-अहंकाराचे

राहूनी गेले करणे खऱ्या ईश्वरभक्तीचे
शेवटी प्रश्न पडला आता काय करायचे?

- **रॉनल्ड गाब्रीयल ग्रेशियस,**
डोंगरी-भाईंदर
मोबाईल : 70 21 25 81 34



## घर

घरात  असतात  माणसं
देणारी  प्रेम अन् माया
भिंती अन्  छप्परालाही  असते
तुमच्या  कष्टांची  काया...

घरात  असतो   आवाज, गोंधळ
कामवालीने   खाडा  केल्यास
उडते   गृहिणीची  तारांबळ...

घर   भरते   मोठ्यांनी  अन्  मुलांनी
स्वप्नांनाही  बळ  दिलं
बागेतल्या  फुलांनी...

घर  असते  बहुदा   सगळ्यांचे
सगळे  असतात   का  त्या घराचे?

घरही  रुसते , ओलावा  हरवून  बसते
जेव्हा  माणसांची  जातवळ  जवळ  नसते...

- **विजय डायगो रॉड्रिग्ज,** गास
मोबाईल : 8830244293

## असे कसे दिवस आलेत



असे कसे दिवस आलेत
सगळं असून मती हुरहुर
नाती गोती जपून सुद्धा
माणसापासून माणूस दूर ।।

असे कसे दिवस आलेत
घर म्हणजे होते स्वर्ग
आज संवाद नाही एकमेकांत
कसलं भरलंय डोक्यात खुळ ।।

असे कसे दिवस आलेत
पिकणार आहे तेच रान
जवळून वहात आहे नदी
पण भागवित नाही ती तहान ।।

असे कसे दिवस आलेत
सुख दुःखात होता शेजार
एकाच गावात राहूनही
बसतात घरात लावून दार ।।

असे कसे दिवस आलेत
नाही का कधी पलटणार
पैशामागे धावता धावता
पोरके झालेत खूप परिवार ।।

- **नॉर्मा डिसील्वा,** मुळगाव

## ‘ती’

स्वतःलाच पाहून आरशात आज ‘ती’ थोडी थांबली
तिच्या संघर्षाची व्यथा ‘ती’ने मांडली.

तीच लक्ष्मी, तीच सरस्वती अन् तीच शक्ती
तरी सर्व बंधनांची तिच्यावर सक्ती.

हरवून बसली स्वतःला कामाच्या गर्दीत
कधी नाही उरली कुणाच्या मर्जीत.

दिवा नाही ती तर आहे पणती
तरी स्वार्थी जगात ‘ती’ची  नाही गणती.

माहेर आणि सासर दोन्ही तिला सारखी
परी दोन्ही घरांसाठी ती झाली परकी.

जबाबदारीच्या ओझ्याखाली स्वतःला हरवले
आरशातल्या ‘ती’ने आज स्वतःला सावरले.

‘ती’च्यातल्या ‘ती’ने आज स्वतःला गवसले
जगासाठी जगताना स्वतःसाठी जगायचे ठरवले.

- **ऋतुजा बने**
मोबाईल : ९७ ६८ ६६ ०३ ७७

# माझे मत

## चर्च म्हणजे आर्टगॅलरी नव्हे!

काही दिवसांपूर्वी एका चर्चमध्ये जाण्याचा योग आला. चर्चच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर एक भली मोठी टेलिव्हिजन स्क्रीन लावलेली दिसली. त्या स्क्रीनमुळे मुख्य वेदी झाकली गेली होती. थोड्या-फार फरकाने अशीच परिस्थिती बहुतेक चर्चमध्ये आहे. प्रश्न असा आहे की, मुख्य वेदी ते प्रवेशव्दार हे अंतर फार-तर विस-पंचवीस मीटर इतके असते. ह्या पंचवीस मीटरवरून भाविक सहज मुख्य वेदी पाहू शकतात. तर मग ह्या टेलिव्हिजन स्क्रीन लावण्याची गरज का भासते? आधुनिकतेच्या नावाखाली आणि आपल्या प्रतिष्ठेचे दर्शन घडविण्यासाठी मुख्य वेदीचे महत्त्व कमी केले जात आहे. भाविक मिस्सा ऐकण्यासाठी येतात; पण त्यांना मुख्य वेदीचे दर्शन घडत नाही, ही शोकांतिका आहे.

आणखी असेही ऐकण्यात आले की, एक भाविक अमुक एका संताचा परमभक्त आहे. सदर व्यक्तीने फादरांची भेट घेऊन त्या संताची इमाज चर्चला दान म्हणून देण्याची इच्छा व्यक्त केली आणि फादरांनी ती विनंती लगेच मान्यही केली. बऱ्याच वेळेला आपल्या पैशाचे प्रदर्शन घडविण्यासाठी काही संतांच्या इमाज अथवा टेलिव्हिजन स्क्रीन दान स्वरूपात दिल्या जातात. चर्चमधील कुठलेही नवीन बांधकाम अथवा इतर कामे असतील तर त्यावर आधी पॅरिश-कौन्सिलच्या सभेमध्ये सविस्तर चर्चा व्हायला हवी आणि हा संपूर्ण खर्च पॅरिशमधील प्रत्येक कुटुंबाच्या सहभागीतेतून व्हायला हवा. त्यासाठी तथाकथित दानशूर व्यक्तीचा शोध घेऊ नये.

ख्रिस्तसभेतील प्रत्येक संत सन्माननीय असताना काही ठरावीक संतांच्याच इमाजी चर्चमध्ये का ठेवल्या जातात? मुख्य वेदीवर क्रुसासह प्रभू येशूची इमाज, पवित्र मरियेची इमाज आणि ज्या संताला ते चर्च वाहिलेले आहे त्या संताची एखादी इमाज इतके पुरेसे आहे. चर्चमधील प्रत्येक कोपऱ्यावर विविध इमाजी ठेवण्याची गरज नाही. चर्च म्हणजे आर्ट गॅलरी अथवा म्युझियम नाही. चर्चमधील मोकळ्या जागा स्वच्छ असू द्या. चर्चच्या प्रत्येक भिंतीवर टेलिव्हिजन स्क्रीनचा झगमगाट नसावा. चर्चमधील पवित्रता आणि शांतता जपावी. चर्चमध्ये प्रार्थना करत असतांना भाविकाचे ध्यान मुख्य वेदीवर राहील ह्याची दक्षता घ्यावी. मिस्सा सुरू होण्याआधी चर्चमधील सर्व खिडक्या दरवाजे उघडावेत जेणेकरून बाहेरील शुद्ध हवा सहज आत येईल.

**- रोशन लोपीस,** नानभाट

## समाजाची वैचारिक वाळवी

आज उघड्या डोळ्यांनी समाजाकडे पाहिले तर माणसांचे तीन उघड-उघड गट दिसतात.

**पहिला** वर्ग आहे अज्ञानी आणि अशिक्षितांचा. ज्यांना आपल्या मूलभूत हक्कांची पुसटशी जाणीवही नाही. सकाळी उठून संध्याकाळच्या भाकरीची सोय करणे, एवढेच ज्यांचे आयुष्य आहे. सत्ताधाऱ्यांच्या भुलथापांना बळी पडणाऱ्या ह्या वर्गाचा राजकीय व सामाजिक व्यवस्थेने कायम 'वापर' करून घेतला आहे. त्यांच्या हतबलतेचा आणि अज्ञानाचा रोज लिलाव होतो, पण त्यांना त्याची जाणीवही होऊ दिली जात नाही. ही ह्या देशाची सर्वांत मोठी शोकांतिका आहे.

**दुसरा** वर्ग, अर्धवट ज्ञानाचा अहंकार उराशी बाळगणारा आणि राजकीय किंवा वैचारिक अंधभक्तीत बुडालेला वर्ग! व्हॉट्सॲप युनिव्हर्सिटीच्या फेक न्यूजवर जगणाऱ्या ह्या जमातीला वाटते की जगभराचे ज्ञान त्यांच्याच खिशात आहे. एखाद्या नेत्याची, पक्षाची किंवा धर्माची अंधभक्ती ह्यांच्या डोक्यावर इतकी स्वार असते की, समोर सत्य, तथ्य आणि पुरावे मांडले तरी ह्यांना काही फरक पडत नाही. ह्यांच्या डोक्यात विवेकाचा प्रकाश पाडणे म्हणजे पार पालथ्या घड्यावर पाणी ओतण्यासारखे आहे. ही अंधभक्तांची फौज समाजाच्या वैचारिक आरोग्याला लागलेली सर्वांत मोठी वाळवी आहे!

**तिसरा** वर्ग आहे स्वतःला सुशिक्षित, बुद्धिवंत आणि पांढरपेशा म्हणवून घेणारा तटस्थ वर्ग. स्वतःचे बँक बॅलेन्स सुरक्षित आहे, आय.टी.पार्कमध्ये किंवा ए.सी. केबिनमध्ये नोकरी चालू आहे, घरात सर्व सोयी-सुविधा आहेत; मग बाहेर समाजात कितीही मोठा अन्याय झाला तरी त्यांना काय फरक पडतो? अन्यायाविरुद्ध, स्वतःच्या हक्कासाठी जेव्हा एखादा सामान्य माणूस रस्त्यावर उतरतो, तेव्हा हे सुशिक्षित बुद्धिवंत टी.व्ही.वर किंवा सोशल मीडियावर बसून त्यांच्या चुका शोधण्यात धन्यता मानतात! 'लढण्याची पद्धत चुकली', 'मोर्चा कशाला हवा होता', 'रस्ता अडवून काय मिळाले?' असले अकलेचे तारे तोडण्यात हे हुशार असतात. अन्यायाविरुद्ध लढणाऱ्यांच्या पाठीशी उभे राहण्याची इच्छा ह्यांच्यात नसते.

अज्ञानाला शिक्षणाची जोड द्यावी लागेल, अंधभक्तांचे उघडे पडलेले डोके जागेवर आणावे लागेल; पण सर्वांत आधी ह्या तिसऱ्या सुशिक्षित आणि उदासीन वर्गाच्या गालावर विवेकाची सनसनाटी चपराक मारावी लागेल. कारण अन्यायाविरुद्ध गप्प बसणारा आणि केवळ चुका काढणारा सुशिक्षित वर्ग हा अन्यायाचा सर्वांत मोठा पाठीराखा असतो.

सुशिक्षितांनो, अपंग मानसिकतेतून बाहेर पडा आणि न्यायाच्या बाजूने उभे राहा!

**- जोसेफ एस. डाबरे,** निर्मळ

## मानवतावादी राजमार्ग : कृतज्ञतेची ज्योत

लेखक जॉन गोन्सालविस लिखित ग्रंथाली प्रकाशित ‘कृतज्ञतेची ज्योत’ ह्या लेखसंग्रहाचे नुकतेच प्रकाशन झाले. स्वअनुभवामधून हे पुस्तक साकारले आहे. ह्या पुस्तकास साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुरेश सावंत ह्यांची मर्मग्राही समरसून प्रस्तावना दिलेली आहे. त्यात ते म्हणतात, ‘‘कृतज्ञतेची ज्योत ह्या संग्रहातील ललितरम्य शैलीतील सर्वच लेख अतिशय वाचनीय आहेत. प्रत्येक लेख काही ना काही विचार देऊन जातो. सर्वच लेखांतून लेखकाने जीवनमूल्यांची बाग फुलविली आहे.’’

‘कृतज्ञतेची ज्योत’ ह्या पुस्तकात वाचनीय असे एकूण १८ लेख आहेत. कृतज्ञतेविषयी लेखक भाष्य करतात की, संस्कृतीच्या वेलीवर उमललेले सौंदर्यात्मक फूल म्हणजे कृतज्ञता. कृतज्ञता असणे हे सुसंस्कृतपणाचे लक्षण आहे. कृतज्ञ राहणे म्हणजे मानवाशी, निसर्गाशी असलेले नाते अधिक दृढ करणे. मानवी जीवनातील कृतज्ञता ह्या मूल्याचे महत्त्व अधोरेखित करताना लेखक संत मदर तेरेजा ह्यांच्या जीवनातील घटना उद्धृत करतात.

येशू ख्रिस्ताच्या प्रेरणेने गेल्या दोन हजार वर्षांत अनेक लेखक, कवी, कलावंत, संगीतकार, शिल्पकार ह्यांनी येशूची शब्दशिल्पे उभी केली. ह्या सगळ्यांचा धांडोळा ‘येशू ख्रिस्त : कलावंत घडवणारा कलावंत’ ह्या लेखात घेतला आहे.

बाबा आमटे ह्यांच्या जीवनावरील येशू ख्रिस्ताचा प्रभाव सांगताना ‘ज्यावर अखेरचा नि:श्वास सोडलास तो क्रूस माझ्यासाठी सेवेचे विरामचिन्ह बनला नाही; तर करुणेचा कलाम बनला’ हे ठासून सांगतात. महात्मा गांधी ह्यांच्याविषयी लेखकाने ‘महात्मा गांधी : एक वैश्विक प्रेरणास्रोत’, ‘ख्रिस्ताचे सच्चे अनुयायी’, ‘महात्मा गांधीजींच्या मरणाचे स्मरण’ आणि ‘गांधी बाबा’ हे चार लेख विचारप्रवर्तक वाटतात.

रे. ना. वा. टिळक ह्यांच्या लेखात लेखकांनी मातृप्रेमी, विक्षिप्तपणा, विश्वासू, पुत्रवत्सल पिता, दातृत्व, निष्कांचन योगी, स्वदेशाभिमान हे टिळकांचे गुण पुस्तकात वर्णन केले आहेत. टिळक हे विरक्त वृत्तीचे होते. ते घराला कड्या लावू देत नसत.

मराठी मातृभाषेचे ऋण मान्य करताना लेखकांनी १९२५ साली महामहोपाध्याय प्रा. दत्तोपंत वामन पोतदार ह्यांनी मराठी भाषेच्या संवर्धनासाठी जो ‘अष्टसूत्री कार्यक्रम’ दिलेला आहे तो मुळात वाचून प्रत्येक मराठी भाषक माणसाने अवलंब केला; तर अभिजात मराठी भाषेला सोनियाचे दिवस आल्याशिवाय राहणार नाहीत.

डॉ. सुरेश सावंत ह्यांच्या शब्दांत सांगायचे म्हणजे ‘‘हा लेखसंग्रह म्हणजे ख्रिस्ती जीवनपद्धतीपासून मानवतावादी जीवनपद्धतीकडे नेणारा सुंदर असा राजमार्ग आहे.’’

श्री. रिचर्ड वाझ ह्यांनी चितारलेले मुखपृष्ठ कल्पक आणि रंगसंगतीयुक्त लक्षवेधी आहे.

हे पुस्तक लेखकांनी वसईतील बुजुर्ग पत्रकार व संस्थापक संपादक श्री. ॲण्ड्र्यू कोलासो (साप्ताहिक जनपरिवार), श्री. मार्कुस डाबरे (वसई टाईम्स), श्री. मनवेल तुस्कानो (निर्भय आंदोलन) ह्या त्रयींना कृतज्ञतापूर्वक अर्पण केलेले आहे.

**- संदीप राऊत**

मोबाईल : 91 58 94 82 00

**‘कृतज्ञतेची ज्योत’**
लेखक : जॉन गोन्सालविस
ग्रंथाली प्रकाशन
मूल्य रु. २००/-.


## ‘सुवार्ता’ जाहिरात दर

**कमर्शियल**

**कलर :-**

| | |
|---|---|
| पूर्ण पान | रु. २६,२५०/- |
| अर्धे पान | रु. १३,६५०/- |
| पाव पान | रु. ७,३५०/- |

**ब्लॅक ॲण्ड व्हाईट :-**

| | |
|---|---|
| पूर्ण पान | रु. १५,७५०/- |
| अर्धे पान | रु. ७,३५०/- |
| पाव पान | रु. ५,२५०/- |
| छोटी (१/६) | रु. ३,१५०/- |
| छोटी (१/१२) | रु. २,१००/- |

**शोक/अभिनंदन फोटो**

**कलर :-**

| | |
|---|---|
| पूर्ण पान | रु. २३,१००/- |
| अर्धे पान | रु. ११,५५०/- |
| पाव पान | रु. ६,३००/- |

**ब्लॅक ॲण्ड व्हाईट :-**

| | |
|---|---|
| पूर्ण पान | रु. १२,६००/- |
| अर्धे पान | रु. ६,३००/- |
| पाव पान | रु. ४,२००/- |
| छोटी (१/६) | रु. २,६२५/- |
| छोटी (१/१२) | रु. १,५७५/- |

## ‘सुवार्ता’ वर्गणी दर

| | |
|---|---|
| वार्षिक वर्गणी | रु. २००/- |
| पोस्टाने वार्षिक वर्गणी | रु. २५०/- |
| पाच वर्षांची वर्गणी | रु. ९५०/- |

**संपर्क : ‘सुवार्ता’ कार्यालय**
जीवन दर्शन केंद्र, गिरीज,
वसई - ४०१२०१.
**मोबाईल : 9702090231**
E-mail : suvartavasai@gmail.com

# विशाल विश्वात

- झेविअर डिमेलो

## पोप लिओ ह्यांचा फ्रान्स येथील प्रेषितीय दौरा



**व्हॅटिकन :** पोप लिओ २५ ते २८ सप्टेंबर ह्या दरम्यान फ्रान्सच्या प्रेषितीय दौऱ्यावर गेले होते. ह्यात त्यांनी युनेस्को मुख्यालय, मेसन बखिता, पॅरिसमधील प्लेस डेला कॉनकोर्ड आणि लुर्ड्स तीर्थस्थान ह्यांना भेटी दिल्या. फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन ह्यांनी पोपचे हार्दिक स्वागत केले. युनेस्को मुख्यालयात पोपनी सांगितले, ''कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे (AI) यंत्राचा स्वर्ग तयार होत असून माणसाने आपली नैतिक मूल्ये व मानवी प्रतिष्ठा जपली पाहिजे.'' मेझ शहरात पोपनी युरोपातील वाढत्या उग्र राष्ट्रवादावर चिंता व्यक्त केली आणि युद्धाचा त्याग करून संवाद व राजनैतिक मार्गाने शांतता प्रस्थापित करण्याचे आवाहन केले. लुर्ड्समध्ये पोपनी वैद्यकीय मदतीने मृत्यू देण्याच्या सरकारच्या कायद्याबद्दल नापसंती व्यक्त केली आणि मानवी जीवनाच्या पवित्रतेचे रक्षण करण्याचा संदेश दिला. पोप लिओ ह्यांचे फ्रान्समध्ये उत्स्फूर्त व जोरदार स्वागत झाले व त्यांच्या मिस्साविधीला भाविकांनी लाखोंच्या संख्येने गर्दी केली.

## नवनियुक्त बिशपांसाठी प्रशिक्षण वर्ग

**व्हॅटिकन :** पाच खंडांतील १४७ नवनियुक्त बिशपांसाठी येथे प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आला होता. व्हॅटिकन प्रशासनाच्या बिशपांसाठीचा विभाग आणि सुवार्ता प्रसार विभाग ह्यांनी ह्या प्रशिक्षण वर्गाचे संयोजन केले. नऊ दिवसांच्या प्रशिक्षणामध्ये बिशपांना विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. ज्यामध्ये चर्चचे नेतृत्व, प्रार्थनाविधी, प्रेषित कार्य, सांस्कृतिक बदल, अत्याचारग्रस्तांचे संरक्षण/मार्गदर्शन, चर्चचे प्रशासन, कॅनन लॉ, आंतरधर्मीय संवाद, धर्मगुरूंचे मार्गदर्शन हे विषय महत्त्वाचे होते. समारोपाच्या दिवशी पोप लिओ ह्यांनी बिशपांना मिशनरी हृदय जपण्याचा आणि सर्वांना सोबत घेऊन नम्रपणे सेवा करण्याचे आवाहन केले.

## आफ्रिकेत पहिले युवासंमेलन

**आक्रा (घाना) :** पश्चिम आफ्रिकेतल्या सोळा देशांतील कॅथलिक तरुणांचे पाच दिवसीय युवासंमेलन येथे संपन्न झाले. ह्या संमेलनात चार हजार युवा-युवती सहभागी झाले होते. ह्या परिसरातील राजकीय अस्थैर्य, हिंसाचार, जातीय तणाव, आर्थिक समस्या, बेकारी, स्थलांतर, पर्यावरण ऱ्हास अशा समस्या भेडसावत असताना सैरभैर झालेल्या तरुणाईला ह्या संमेलनात आश्वस्त करण्यात आले. पोप लिओ ह्यांनी 'आफ्रिकेच्या परिवर्तनासाठी देवाचे दूत बना' असा संदेश त्यांना पाठवला होता.

## एकविसावे शतक हे हौतात्म्यांचे शतक?

**व्हॅटिकन :** आपल्या श्रद्धेसाठी प्राण गमावणाऱ्या ख्रिस्ती बांधवांची माहिती गोळा करण्यासाठी व्हॅटिकनच्या संतपद प्रक्रिया विभागामार्फत आयोग नेमण्यात आला आहे. आयोगाने दिलेल्या अहवालानुसार एकविसाव्या शतकात आतापर्यंत १७०० पेक्षा जास्त ख्रिस्ती शहीदांच्या मृत्यूची माहिती मिळाली आहे. ह्यावर्षी आणखी १०० ते १५० शहीदांची त्यामध्ये भर पडली आहे.

## पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी...

**लुसाका (झांबिया) :** झांबियामधील कॅथलिक बिशपांनी १ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर ह्या दरम्यान 'सृष्टीचा ऋतू-२०२६' हा उपक्रम राबवला. ह्या उपक्रमांतर्गत पर्यावरणाचे रक्षण करण्यास, ठोस कृती करण्यास, लोकांना उद्युक्त करण्यात आले. ह्या वर्षीची मुख्य संकल्पना 'जीवंत पाणी' ही होती. नद्या, प्रवाह आणि पाणथळ जागांचे रक्षण करण्याचे आवाहन करण्यात आले.

## पोप लिओ ह्यांची वाढदिवसाची विशेष भेट



**व्हॅटिकन :** पोप लिओ ह्यांनी आपला १४ सप्टेंबरचा वाढदिवस आपल्या कर्मचाऱ्यांसह साजरा केला. कोरोना महामारीच्या काळात कर्मचाऱ्यांच्या पगारात दहा टक्के कपात करण्यात आली होती, ती त्यांनी रद्द केली. व्हॅटिकनच्या ग्रंथालयालाही पोपनी भेट दिली. त्यावेळी त्यांनी घोषणा केली की, व्हॅटिकनमध्येच ग्रंथालयासाठी नवीन इमारत बांधली जाईल.

## गाझामधील शाळा पुन्हा उघडली

**गाझा :** ऑक्टोबर २०२३ पासून बंद असलेल्या होली फॅमिली चर्च स्कूलचे दरवाजे पुन्हा उघडले आहेत. गाझामधील ह्या एकमेव कॅथलिक चर्चचे धर्मगुरू फा. गॅब्रिएल रोमानेली म्हणाले की, अनंत यातना सहन केलेल्या गाझातल्या लोकांसाठी ही शाळा अंधारातील प्रकाशासारखी आहे. ह्या शाळेत सुमारे एक हजार विद्यार्थ्यांची अध्ययनाची सोय असून सर्वधर्मीय विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश दिला जातो. संयुक्त राष्ट्रांच्या माहितीनुसार गाझामधील रक्तरंजित संघर्षात २०१७९ मुले मारली गेली आणि ४४१४३ जखमी झाली. जगात सर्वात जास्त दिव्यांग मुले आज गाझात आहेत.

## अमेरिकेत कृष्णवर्णीय बिशप कमी का?

**वॉशिंग्टन (अमेरिका) :** वॉशिंग्टनचे साहाय्यक बिशप रॉबर्ट बॉक्सी अमेरिकेतील सर्वात तरुण (४६) बिशप आहेत. त्यांनी म्हटले आहे की, अमेरिकेत कृष्णवर्णीय बिशपांची संख्या कमी असण्याचे कारण वर्णद्वेष हे आहे. अमेरिकन इतिहासामध्ये बऱ्याच काळापर्यंत कृष्णवर्णीय तरुणांना सेमिनरीमध्ये प्रवेश नाकारला जात होता. अमेरिकेतील कॅथलिक चर्चमध्ये श्वेतवर्णीय संतांच्या प्रतिमा/मूर्ती पाहावयास मिळतात. येथील २७० बिशपांपैकी फक्त ५ कृष्णवर्णीय बिशप आहेत.

## पोप लिओ ह्यांचा पुतळा

**कल्याओ (पेरू) :** कल्याओ शहरात पॅसिफिक महासागराच्या किनाऱ्यालगत पोप लिओ ह्यांचा १४ मीटर उंचीचा पुतळा उभारला जात आहे. अमेरिकन नागरिक असलेल्या पोप लिओ ह्यांना पेरूचे नागरिकत्व मिळाले असून २०१५ ते २०२३ पर्यंत ते येथे बिशप म्हणून कार्यरत होते. पेरूमधील लोकांना पोप लिओ ह्यांच्याविषयी खूप आदर वाटतो. म्हणून ते त्यांच्या येथील आगमनाची आतुरतेने वाट पाहत आहेत. पोप नोव्हेंबर ११ ते १७ दरम्यान येथे असतील.

## डॉमिनिकन सिस्टर्स सायबेरियात

**बुरियाटिया (सायबेरिया) :** सायबेरिया हा अत्यंत थंड आणि गूढ असा रशियाचा प्रांत आहे. ह्या प्रांतातील बुरियाटिया ह्या ठिकाणी डॉमिनिकन सिस्टर्स मिशनकार्य करतात. सन २००० मध्ये त्या पोलंडमधून येथे आल्या. बौद्ध व शर्मॅनिक संस्कृतीचे प्राधान्य असलेल्या ह्या प्रदेशात सिस्टर्स आंतरसांस्कृतिक वातावरणात रुळल्या आहेत. बौद्ध धर्मातील अहिंसा आणि ख्रिस्ती धर्मातील 'शेजाऱ्यांवर प्रेम करा' ह्या मूल्यांमधील समानता शोधून स्थानिक लोकांबरोबर त्यांनी जवळीक साधली आहे. अत्यंत आदराची परंपरा असलेली रेशमी स्कार्फ (खदाक) आणि घोडीचे आंबवलेले दूध (कुमिस) देऊन पाहुण्यांचे स्वागत करण्याची प्रथा सिस्टर्स आपल्या कॉन्व्हेंटमध्येही पाळत आहेत.

## स्थलांतरित, निर्वासित मुलांच्या संरक्षणासाठी...

**व्हॅटिकन :** पोप लिओ ह्यांनी जगभरातील स्थलांतरित आणि निर्वासित मुलांच्या संरक्षणासाठी आणि काळजीसाठी जागतिक पातळीवर एकत्र येण्याचे कळकळीचे आवाहन केले. युद्ध, गरिबी, हिंसाचार आणि हवामान संकट ह्यामुळे लाखो निष्पाप मुलांना आपली मायभूमी सोडावी लागत आहे. स्थलांतराच्या मार्गावर ही मुले हिंसाचार, मानवी तस्करी, शोषण आणि अत्यंत दु:खदायक परिस्थितीला बळी पडतात. आपली घरे सोडण्याच्या मूळ कारणांचा शोध घेऊन मुलांचे संरक्षण करण्यासाठी जागतिक प्रयत्नांची गरज असल्याचे पोप महोदयांनी अधोरेखित केले.

## ... म्हणजे अभिव्यक्ती स्वातंत्र्य नव्हे

**न्यूयॉर्क (अमेरिका) :** द्वेषयुक्त भाषण म्हणजे अभिव्यक्ती स्वातंत्र्य नव्हे. अभिव्यक्ती स्वातंत्र्य हा एक मूलभूत हक्क असला तरी त्याला काही जबाबदाऱ्यांचे बंधन असते. जे भाषण मुद्दाम

द्वेष किंवा हिंसाचार पसरवण्याचे काम करते, ते स्वातंत्र्याच्या संरक्षणाचा दावा करू शकत नाही, असे विचार आर्चबिशप क्रिस्टोफ झाकिया अल-कासिस ह्यांनी येथे जागतिक परिषदेत मांडले. ते व्हॅटिकनचे संयुक्त राष्ट्रातील प्रतिनिधी (स्थायी निरीक्षक) आहेत. ●

### धार्मिक

## ९० वर्षांचा श्रद्धेचा प्रवास

**डहाणू :** अवर लेडी ऑफ डॉलर्स चर्च, मसोली, डहाणू ह्यांचा ९०वा वर्धापन दिन 'मरियेसोबत आपण श्रद्धेने वाटचाल करतो', ह्या संकल्पनेखाली साजरा करण्यात आला. विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि सामुदायिक कार्यक्रमांचे आयोजन

करण्यात आले. सांस्कृतिक स्पर्धांमध्ये मुलांनी, युवकांनी आणि विविध वयोगटांतील सभासदांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. चित्रकला, निबंध, वक्तृत्व, गायन, नृत्य आणि नाटिका अशा विविध माध्यमांतून त्यांनी आपले कलागुण सादर केले.

ह्या उत्सवाचा समारोप २० सप्टेंबर २०२६ रोजी अवर लेडी ऑफ डॉलर्स  वार्षिक सणाने झाला. मिस्साचे पौरोहित्य बिशप थॉमस डिसोजा ह्यांनी केले.

प्रमुख पाहुणे म्हणून अल्बर्ट विल्फ्रेड डिसोझा ह्यांची उपस्थिती लाभली. ह्यावेळी 'PIETÀ' ह्या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले.

- **विनस रोझारिओ,** डहाणू

### सामाजिक

## SVP चा स्नेहमेळावा

**रमेदी :** सोसायटी ऑफ सेंट विन्सेंट डी पॉल, रमेदी कॉन्फरन्सतर्फे सेंट विन्सेंट डी पॉल सणानिमित्त दत्तक व गरजवंत कुटुंबांसमवेत स्नेहमेळावा रविवार २७ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात पवित्र मिस्साने झाली. त्यानंतर रमेदी माता संकुल येथे दत्तक व गरजवंत कुटुंबांसह स्नेहमेळावा आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी कॉन्फरन्सच्या अध्यक्षा रिटा आल्मेडा ह्यांनी प्रास्ताविक केले. त्यानंतर वसई सेंट्रल कौन्सिलचे अध्यक्ष मॉर्गन डिमेलो ह्यांनी उपस्थितांशी संवाद साधला. रमेदी तीर्थस्थानाचे रेक्टर फा. एरिक आल्फान्सो ह्यांनी प्रेम, दया, सहकार्य आणि गरजवंतांची सेवा ही ख्रिस्ती जीवनाची महत्त्वाची मूल्ये असून, ती प्रत्यक्ष कृतींतून जपण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान रमेदी SVP कॉन्फरन्सचे आध्यात्मिक सल्लागार फा. रेन्विक डाबरे ह्यांनी भूषविले. आपल्या मार्गदर्शनात त्यांनी SVP कुटुंबाची संकल्पना, बंधुभाव आणि सेवाभाव ह्याबद्दल माहिती दिली. स्पॉट गेम्सचे आयोजन लिली परेरा ह्यांनी केले.

- **स्टिफन डिमेलो**

## शासकीय दाखले शिबिर

**गास :** गासकर सामाजिक संस्थेच्या वतीने रविवार २७ सप्टेंबर रोजी 'शासकीय दाखले शिबीर' आयोजित करण्यात आले होते. एकूण २७७ ग्रामस्थांनी ह्या शिबिराचा लाभ घेऊन विविध दाखल्यांसाठी आपले अर्ज यशस्वीरीत्या दाखल केले : ज्येष्ठ नागरिक कार्ड - १३६, डोमिसाईल सर्टिफिकेट (अधिवास दाखले) -७०, रेशनकार्ड (नाव समाविष्ट/कमी करणे)- ४५, उत्पन्न दाखले - २१ व  रहिवासी दाखले - ५

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रमुख धर्मगुरू फा. मायकल रोझारिओ ह्यांनी प्रार्थना केली. फा. जेम्स ह्यांची उपस्थिती लाभली. मायकल आल्मेडा आणि लुईस परेरा ह्यांनी  शिबीर प्रमुख म्हणून संपूर्णपणे जबाबदारी पाहिली.

## ज्येष्ठ नागरिक दिन

**गिरीज :** १ ऑक्टोबर जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त विरंगुळा केंद्र, गिरीज येथे विरंगुळा केंद्राच्या सभासदांसाठी एक स्नेहमेळावा आयोजित करण्यात आला होता. ह्या स्नेहमेळाव्यात ४५० सभासदांनी सहभाग घेतला. फा. ज्यो आल्मेडा ह्यांच्या पौरोहित्याखाली झालेल्या पवित्र मिस्सेनंतर अध्यक्ष म्हणून पास्कोल जॉन आल्मेडा (निर्मळ) आणि विशेष अतिथी अंतोनी पिटर घोन्सालविस  (चुळणे) ह्यांनी मार्गदर्शन केले.

## जीवन गौरव पुरस्कार

**वसई :** जागर नारी शक्ती, वसईतर्फे न्यू इंग्लिश स्कूल येथे शनिवार १७ ऑक्टोबर रोजी डॉमिनिका डाबरे (गिरीज), शैला गोन्सालविस (उमराळे), शोभना वाझ (माणिकपूर), क्लेरा मिनेझिस (माणिकपूर) ह्यांना 'जीवन गौरव' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. सर्वांचे 'सुवार्ता' परिवारातर्फे हार्दिक अभिनंदन!

## ज्येष्ठ नागरिक मेळावा

**गास :** संत घोन्सालो ज्येष्ठ नागरिक संघटना, गास ह्यांच्या वतीने रवि. १८ऑक्टोबर रोजी संध्या. ६:०० वाजता गास चर्च पटांगणात मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी मायकल कोलासो होते. प्रमुख अतिथी म्हणून फादर नोबेल मेन, उपमहापौर मार्शल लोपीस, उद्योजक मनवेल डायस तसेच प्रभाग क्रमांक १३ च्या नगरसेविका सॅरल डाबरे व नगरसेवक परेश किणी उपस्थित होते.

ज्येष्ठ नागरिक संघटनेचे अध्यक्ष बावतीस परेरा ह्यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. फादर नोबेल मेन, उपमहापौर मार्शल लोपीस व उद्योजक मनवेल डायस ह्यांनी ज्येष्ठ नागरिकांचे मेळाव्याच्या आयोजनाबद्दल अभिनंदन केले व संघटनेच्या उज्ज्वल वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. संघटनेचे ४०० पेक्षा जास्त सभासद व परिसरातील नागरिक व मान्यवर व्यक्ती ह्या मेळाव्यासाठी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सिसिलिया परेरा व सांतान फोस यांनी केले.

जय हिंद ब्रास बँड पथकाने सुमधुर गायनाने उपस्थितांचे मनोरंजन केले. आभारप्रर्दशन डेक्लान पेन ह्यांनी केले.

## आध्यात्मिक शिबिर

**रमेदी :** सोसायटी ऑफ सेंट विन्सेंट डी पॉल, दक्षिण वसई एरिया कौन्सिलच्या वतीने आयोजित करण्यात आलेले शिबिर रविवार ४ ऑक्टो. रोजी रमेदी प्राथमिक मराठी शाळेत संपन्न झाले. ह्या शिबिरास १२ कॉन्फरन्समधून १०३ क्रियाशील सभासद व पदाधिकारी उपस्थित होते. रमेदी प्रार्थना ग्रुपने स्तुती व आराधना सादर केली. दक्षिण वसई एरिया कौन्सिलचे अध्यक्ष सेबेस्टियन बावकर ह्यांनी प्रास्ताविक केले. रमेदी कॉन्फरन्सचे आध्यात्मिक सल्लागार फा. रेन्विक डाबरे ह्यांनी आपल्या मार्गदर्शनात सेवाभावी कार्यातील नम्रतेचे महत्त्व अधोरेखित केले.

## जागृती सेवा संस्थेचा ३८ वा वर्धापन दिन

**चुळणे :** जागृती सेवा संस्थेचा ३८ वा वर्धापन दिन रविवार सप्टेंबर रोजी इनोसंट मेमोरियल हॉल, चुळणे येथे संपन्न झाला. कार्यक्रमास चुळणे धर्मग्रामाचे प्रमुख धर्मगुरू फा. बॅप्टिस्ट लोपीस, जागृती सेवा संस्थेचे संस्थापक फा. मायकल जी., संस्थापकीय अध्यक्ष जॅक गोम्स तसेच माजी सल्लागार पीटर डिसोजा ह्यांची विशेष उपस्थिती लाभली.

ह्यावेळी ख्रिस्ती मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष सायमन मार्टिन, अखिल भारतीय बिशप परिषदेने गौरविलेल्या डॉमिनिका डाबरे आणि ठाणे व पालघर शिक्षक पतपेढीचे अध्यक्ष मायकल गोन्सालविस ह्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गार्डवेल इंडस्ट्रीजच्या संचालिका विलोना तुस्कानो होत्या.

संस्थेचे अध्यक्ष बर्नार्ड डिसोजा ह्यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन स्कारलेट नुनीस आणि स्वप्नील डाबरे ह्यांनी केले. श्रावणोत्सवाच्या पारितोषिक वितरण समारंभाचे सूत्रसंचालन युवा जागृतीचे अध्यक्ष ऑस्टिन ह्यांनी युवा जागृतीच्या सभासदांच्या सहकार्याने केले, तर मान्यवरांच्या सन्मान सोहळ्याचे सूत्रसंचालन राजेश गोन्सालविस ह्यांनी केले. मान्यवरांचे स्वागत क्रिस्तोफर रॉड्रिग्ज ह्यांनी केले, आभारप्रदर्शन ऑस्टिन डिसा ह्यांनी केले.

## देहदान

**पाली :** 'सुवार्ता' मासिकाच्या माजी वितरक श्रीमती रीता आसिस मच्याडो, करीजभाट, पाली ह्यांचे २७ सप्टेंबर रोजी वयाच्या ९४ व्या वर्षी वृद्धापकाळामुळे निधन झाले. त्यांनी आपला देह वैद्यकीय प्रशिक्षणासाठी दान देण्याचा निर्णय ९०व्या वाढदिवशी जाहीर केला. कुटुंबीयांनी त्यांची इच्छा मरणोत्तर पूर्ण केली. देहदान करणाऱ्या पालीच्या त्या पहिल्या महिला आहेत. श्रीमती रीता मच्याडो ह्यांचे पाली चर्चला अनेक संस्थेतून योगदान होते. सध्याचे 'सुवार्ता' वितरक चार्लस मच्याडो हयांच्या त्या मातोश्री आहेत.

## डिनरी युथ रॅली २०२६

**वसई :** डिनरी युथ रॅलीचे आयोजन २० ते २७ सप्टेंबर २०२६ ह्या कालावधीत धर्मप्रांतातील सांडोर, पापडी, नंदाखाल, तलासरी आणि निर्मळ ह्या पाच डिनरींमध्ये करण्यात

आले. ह्या रॅलीमध्ये युवक-युवती, धर्मग्रामातील धर्मगुरू, युवक संचालक, धर्मभगिनी, धार्मिक मार्गदर्शक आणि सामान्य विश्वासू मार्गदर्शक ह्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. ह्या कार्यक्रमांमधून श्रद्धा, बंधुभाव आणि वैयक्तिक विकासाला प्रोत्साहन मिळाले. ह्या रॅलींचे मुख्य उद्दिष्ट ख्रिस्ती जीवनाची साक्ष देणे, आत्मविश्वास वाढवणे, सर्वांगीण विकास साधणे, चर्चमधील युवकांचा सहभाग वाढवणे आणि प्रामाणिक मानवी नातेसंबंध अधिक दृढ करणे हे होते. ह्या कार्यक्रमांमध्ये प्रार्थना, पवित्र मिस्सा, प्रमुख मार्गदर्शन, कृतिगीते, परिचयात्मक खेळ, कार्यशाळा, गटचर्चा, संवादात्मक खेळ आणि संघभावना वाढवणाऱ्या उपक्रमांचा समावेश होता.

ह्या कार्यक्रमातील एक महत्त्वाचा भाग म्हणजे POCSO (Protection of Children from Sexual Offences) आणि POSH (Prevention of Sexual Harassment) ह्या विषयांवरील जनजागृती सत्रे. ह्या सत्रांमुळे युवकांना त्यांचे हक्क, जबाबदाऱ्या आणि सुरक्षिततेचे महत्त्व समजण्यास मदत झाली. सांडोर डिनरीमध्ये 'Reel Life vs Real Life' ह्या विषयावर, सेंट मार्क निर्मळ डिनरीमध्ये 'The Joy of Rebuilding the Church with St. Francis of Assisi' ह्या विषयावर तर इतर डिनरींमध्ये ख्रिस्ती जीवनाची साक्ष, आत्मविश्वास वाढवणे आणि सर्वांगीण विकास ह्यांवर भर देण्यात आला.

ह्या पाचही डिनरींमध्ये मिळून ८०० हून अधिक युवक-युवतींनी सहभाग घेतला. तलासरी डिनरीमध्ये सर्वाधिक २९२ युवक-युवती उपस्थित होते. सर्व डिनरींचे डीन ह्या रॅलींना उपस्थित होते. त्यांनी युवक-युवतींना प्रोत्साहन दिले आणि त्यांना श्रद्धेत, सहभागात व सेवाभावात वाढ करण्यासाठी प्रेरित केले.

**- स्वीनल कर्वाल,** भुईगाव

### आर्थिक

## अभिनंदन

**नंदाखाल :** जेलाडी गावचा सुपुत्र स्टॅनीस्लॉस सायमन डिब्रिटो हे COO (Chief Operating Officer) ही जबाबदारी सांभाळत असलेल्या Elevate Campuses Ltd ह्या कंपनीचे भारतीय शेअर बाजारातील NSE व BSE वर लिस्टिंग झाले. स्टॅनीसाठी ही खूप अभिमानाची व आपल्या सर्वांसाठी गौरवाची

घटना आहे. २०१७ पासून स्टॅनी ह्या कंपनीच्या मॅनेजमेन्टचा अविभाज्य भाग आहे. NSEच्या BKC स्थित मुख्य कार्यालयात झालेल्या कार्यक्रमामध्ये आपल्या ह्या सुपुत्राला पाहून त्याचा खूप अभिमान वाटला.

स्टॅनी ह्यांना ह्या क्षेत्रातला सुमारे २६ वर्षांचा गाढा अनुभव आहे. त्यांच्या अथक मेहनतीचे, जिद्दीचे, दूरदृष्टीचे आणि चिकाटीचे हे फळ आहे. त्यांनी हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजीमध्ये डिप्लोमा केलेला आहे, तसेच वेलिंगकर इन्स्टिट्यूटमधून बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन मध्ये डिग्री घेतलेली आहे. ह्याअगोदर त्यांनी आपल्या कार्याचा ठसा ISS Facility Services India Pvt. Ltd. येथे उच्च पदावर काम करून उमटवलेला आहे.

**- रॉबर्ट लोबो,** नंदाखाल

## ‘भारत श्रेष्ठ रत्न सन्मान २०२६’

**गास :** इंडिया रिपब्लिक टाईम्स ह्यांच्या वतीने प्रदान करण्यात येणाऱ्या ‘भारत श्रेष्ठ रत्न सन्मान २०२६’ ह्या पुरस्कारासाठी उदयोन्मुख उद्योजक दांपत्य श्री. व सौ. शिल्पा प्रकाश परेरा ह्यांना शनिवार १० ऑक्टोबर २०२६रोजी मुंबई येथे गौरविण्यात आले. त्यांनी उभारलेल्या J. K. Teach Mech Pvt. Ltd. मधील यशस्वी भरारीसाठी हा पुरस्कार त्यांना देण्यात आला. ‘सुवार्ता’ परिवारातर्फे अभिनंदन!

### साहित्यिक

## ‘प्रवास’ लेखास द्वितीय पुरस्कार

**पाली :** परभन्ना फाउंडेशन पुणे, महाराष्ट्र पर्यटन आणि महा. चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ ह्यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजिलेल्या प्रवासवर्णन लेखन स्पर्धेत वडवली, पाली येथील लेखक दीपक मच्याडो ह्यांना ‘युरोपियन भक्तिस्थळे - प्राचीन स्थापत्य शास्त्राचे अद्भुत नमुने’ ह्या त्यांच्या लेखास द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले. ‘सुवार्ता’ परिवारातर्फे अभिनंदन!

## स्टीफन परेरा ह्यांना कोमसाप पुरस्कार

**मर्सेस :** कथालेखक स्टीफन एम. परेरा ह्यांच्या 'काळवेळ' ह्या साहित्यकृतीस कोकण मराठी साहित्य परिषदेचा प्रथम क्रमाकाचा बि. सी. गुर्जर स्मृती पुरस्कार मिळालेला आहे. 'सुवार्ता' परिवारातर्फे अभिनंदन!

## कविवर्य नारायण सुर्वे पुरस्कार

**वसई :** वसईतील अण्णासाहेब वर्तक महाविद्यालयात मराठी विषयाचे अध्यापन करणाऱ्या डॉ. सखाराम डाखोरे ह्यांच्या 'हूलबिगूल' ह्या कवितासंग्रहास नाशिक येथील 'कविवर्य नारायण सुर्वे साहित्य पुरस्कार' मिळाला आहे. 'सुवार्ता' परिवारातर्फे अभिनंदन!

## प्रकाश पाटील ह्यांना कोमसाप पुरस्कार

**वसई :** वसईचे लेखक प्रकाश पाटील ह्यांच्या 'डंकी रूट' ह्या कादंबरीस कोकण मराठी साहित्य परिषदेचा 'विशेष पुरस्कार' जाहीर झाला आहे. 'सुवार्ता'परिवारातर्फे अभिनंदन!

### सांस्कृतिक

## असाही एक विश्व विक्रम

**मर्सेस :** 'अलबत्या गलबत्या' नाटकात अक्षय बरबोज ह्या वसईतील नाट्यकलावंताचा नाटकांमध्ये कलाकार म्हणून प्रवेश झाल्यानंतर त्यांनी १३० प्रयोगात काम केले आहे. एकाच दिवशी सात हजार विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत सात प्रयोग करण्याचा विश्वविक्रम पुण्यातील बालगंधर्व नाट्यगृह येथे झाला. त्यात अक्षय बरबोज ह्याचा सहभाग होता. वडील डेनिस बरबोज हे संगीत क्षेत्रामध्ये एक वसईतील नावाजलेले नाव. त्यांनी आपल्या मुलाला कलागुण व कलेचा वारसा दिला. 'सुवार्ता' परिवारातर्फे अक्षय आणि त्यांच्या कुटुंबाचे हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा!

### क्रीडा

## मॅरेथॉन

**उमराळे :** मराडी गावचे हरहुन्नरी मॅरेथॉन धावपटू लॉसन डिब्रिटो ह्यांना बोरिवली मॅरेथॉनमध्ये साडेबारा किलोमीटरच्या रन मध्ये दुसरे बक्षीस मिळालेले आहे. 'सुवार्ता' परिवारातर्फे अभिनंदन!

## मुंबई क्रिकेट संघात निवड

**सोपारा :** उमराळे, राऊत आळी गावातील कुमारी सेजल किरण राऊत हिची मुंबई महिला सिनियर क्रिकेट संघामध्ये निवड झाली आहे. ह्याअगोदर ती मुंबई महिला क्रिकेट संघातून १६ वर्षांखालील, १८ वर्षांखालील आणि २१ वर्षांखालील संघांमध्ये खेळलेली आहे. 'सुवार्ता' परिवारातर्फे अभिनंदन व पुढील यशस्वी कारकिर्दीसाठी शुभेच्छा!

### सहवेदना

## नटसम्राट नाना पाटेकर ह्यांचे निधन

**गोवा :** ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर ह्यांचे गुरुवार ८ ऑक्टोबर रोजी वयाच्या ७५व्या वर्षी गोवा येथे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. वयाच्या १३व्या वर्षापासून अर्थार्जनासाठी झेब्रा क्रॉसिंग-पासून चित्रपटांचे पोस्टर रंगवण्यापर्यंतची कामे त्यांनी केली. पुढे जे. जे. स्कूल ऑफ आर्ट येथे कलाशिक्षण पूर्ण केले.

अंकुश, माफीचा साक्षीदार, क्रांतिवीर, परिंदा, सलाम बॉम्बे, प्रहार, खामोशी, देऊळ, वेलकम, प्रकाश बाबा आमटे, नटसम्राट अशा अनेक चित्रपटांतून त्यांनी आपल्या अभिनयाची मोहर उमटविली. 'नाम' ह्या स्वयंसेवी संस्थेमार्फत त्यांनी दुष्काळग्रस्त आणि आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबासाठी केलेले कार्य नजरेआड करता येणार नाही.

## अंतोन मास्तर ह्यांचे निधन



**उमराळे :** होली क्रॉस हायस्कूल, निर्मळ शाळेतील सेवानिवृत्त शिक्षक अंतोन सायमन गोन्सालविस (उमराळे, जोसघर) ह्यांचे ३० सप्टेंबर रोजी वयाच्या ८९व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. ठाणे जिल्हा परिषदेतर्फे त्यांना 'आदर्श शिक्षक' पुरस्काराने गौरविण्यात आले होते. श्री. अंतोन गोन्सालविस ह्यांनी बसीन कॅथलिक को.ऑप. बँकेचे माजी संचालक व माजी उपाध्यक्ष म्हणून अनेक वर्षे सेवा केलेली आहे.

## मर्सियाना लोपीस ह्यांचे निधन

**आगाशी :** 'सुवार्ता' परिवारातील आगाशी, कातरवाडी येथील 'एकता' पतपेढीचे चेअरमन फ्रान्सिस लोपीस ह्यांची पत्नी मर्सियाना लोपीस ह्यांचे कॅन्सरच्या दुर्धर आजाराने वयाच्या ७०व्या वर्षी ४ ऑक्टोबर रोजी निधन झाले. मर्सियाना ह्या बँकिंग क्षेत्रातील तज्ज्ञ होत्या. भारतीय स्टेट बँकेत त्यांनी अनेक वर्षे अधिकारी पदावर यशस्वीपणे कार्यभार सांभाळला होता.

## एलायस डिआब्रियो ह्यांचे निधन

**निर्मळ :** सामाजिक कार्यकर्ते एलायस इग्नेशियस डिआब्रियो, माळीआळी ह्यांचे वयाच्या ६२व्या वर्षी २७ सप्टेंबर रोजी निधन झाले. ते निर्मळ चर्च येथील विन्सेंट डी पॉल संघटनेचे सक्रिय कार्यकर्ते होते. ह्याशिवाय स्वाभिमानी वसईकर संघटना, निर्भय जन मंच, जीवन विकास मंडळ आणि समाजसेवा मंडळ, उत्तर वसई ह्यांचे सेवाभावी कार्यकर्ते होते.

## सेबेस्टीयन वाझ ह्यांचे निधन

**चुळणे :** सेबेस्टीयन वाझ ह्यांनी दिनांक १७ ऑक्टोबर रोजी आपल्या वयाची ९०वर्षे पूर्ण केल्यानंतर दिनांक १८ ऑक्टोबर २०२६ रोजी त्यांचे निधन झाले. क्रिकेट हा त्यांच्या जीवनातील जिव्हाळ्याचा विषय. ए. सी. सी. सिमेंट कंपनीत नोकरी करीत असताना ए.सी.सी. क्रिकेट टीममधून खेळण्याची त्यांना संधी मिळाली होती. कंप्यानियन्स को. ऑप. क्रेडिट सोसायटीचे माजी अध्यक्ष म्हणून त्यांनी सहकारी क्षेत्रात योगदान दिलेले आहे.

ह्या सर्वांना 'सुवार्ता' परिवारातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली!

## 'सुवार्ता'ला प्रेमाचे दान

| | |
|---|---|
| फ्रान्सिस डॉमणिक डिसोजा, चुळणा | १०,०००/- |
| लेस्ली वाझ, पापडी | ५५०/- |
| सिल्वीया रिचर्ड डिकुना, रमेदी | ५००/- |
| ब्रिजेटा इनास मिरांडा. चुळणे | ५००/- |
| मागरिट जोसेफ परेरा, पापडी | ५००/- |
| मायकल आल्मेडा, निर्मळ | ३५०/- |
| विन्सेंट जोजेफ डिकुना, रमेदी | ३००/- |
| अगस्टीन फर्नांडीस, निर्मळ | २००/- |
| नोवेल डिसोजा, गोम्सआळी | २००/- |
| लीन मायकल परेरा, सांडोर | २००/- |
| स्टेला निकलाव कर्व्हालो गिरीज | १५०/- |
| अनामिक, गिरीज | १००/- |
| जेनीफर वैभव डिसोजा, भुईगाव | १००/- |
| पॅट्रीक फिलीप डाबरे, भुईगाव | ५०/- |
| पॅट्रीक डाबरे, भुईगाव | ५०/- |
| निलीमा पास्काल रॉड्रिग्ज निर्मळ | ५०/- |

**प्रेमळ स्मरणार्थ**



**ख्रिस्तवासी मार्शेल डॉमणिक मच्याडो**

सातोडी, गिरीज

जन्म : ०५/०२/१९४७

मृत्यू : ०९/११/१९९३

मिस्सा : ०९/११/२०२६

सेंट फ्रान्सिस झेविअर चर्च, गिरीज.

**मच्याडो कुटुंबीय**

**प्रेमळ स्मरणार्थ**

**ख्रिस्तवासी मागरिट फ्रान्सिस कार्लोस**

कोकरमवाडी, दिघा, पापडी

जन्म : ०१/०५/१९५४; मृत्यू : १९/१२/२०२०

***''जे आत्म्याने लीन ते धन्य; कारण स्वर्गाचे राज्य त्यांचे आहे. जे अंत:करणाने शुद्ध ते धन्य; कारण ते देवाला पाहतील.''***

(मत्तय ५:३,८)

*हे प्रभू, आमच्या आईला तुझ्या स्वर्गीय नंदनवनात चिरंतन शांती लाभू दे हीच तुजचरणी विनम्र प्रार्थना!*

**मुले, सून, मुलगी, जावई व नातवंडे**

शब्दकोडे

# ‘सुवार्ता’ शब्दकोडे क्रमांक - १५

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | | ४ | ५ | |
| ६ | | ✕ | | ✕ | ७ | | ✕ |
| | ✕ | ८ | | | ✕ | ✕ | ९ |
| | ✕ | १० | | ✕ | ११ | १२ | |
| ✕ | १३ | ✕ | | ✕ | १४ | | ✕ |
| १५ | | ✕ | १६ | | ✕ | १७ | |
| १८ | | ✕ | | ✕ | १९ | | ✕ |
| | ✕ | २० | | | ✕ | २१ | |

**रचना : अनिल डायगो गोन्साल्वीस**
उमराळे

**आडवे शब्द :-**

१) उत्तर वसईतील नंदाखालचे होली स्पिरीट चर्च ××× ××× ×× हे वसईच्या पोर्तुगीजकालीन इतिहासातील महत्त्वाचे ऐतिहासिक चर्च आहे (८)

६) सत्ता ×× (२)

७) कागदाच्या ५०० पानांचा गठ्ठा ×× (२)

८) विश्रांती, विसावा ××× (३)

१०) समान, बरोबरीचा, सारखा ×× (२)

११) सोय, सुलभता, व्यवस्था ××× (३)

१४) कृष्णाची, प्रेमिका ×× (२)

१५) हिंदू धर्मातील मुलाचा उपनयन संस्कार ×× (२)

१६) काम ×× (२)

१७) विनयशील, लीन ×× (२)

१८) वन, जंगल (हिंदी) ×× (२)

१९) धुन, ओढ, तळमळ, आसक्ती ×× (२)

२०) बटू, खुजा, ठेंगणा ××× (३)

२१) पत्नी, बायको, अर्धांगिणी, सहधर्मचारिणी ×× (२)

**उभे शब्द :-**

१) ×××× आहे, जगती पुत्र मानवाचा दोष ना कुणाचा हे गीत ‘गीत रामायणातील’ असून त्याचे गीतकार ग.दि.माडगूळकर आहेत(४)

२) द्युत ×× (२)

३) ‘तारक मेहता का उल्टा चष्मा’ मालिकेतील गोकुळधाम सोसायटीतील एकमेव सेक्रेटरी ××××  ×××× भिडे (८)

४) एक प्रकारचे लालसर गोड फळ ×× २)

५) चमक, तेज × (२)

८) इच्छा, अपेक्षा, आशा ×× (२)

९) वसईतील निलेश नाईक लिखित दिग्दर्शीत नुकताच प्रकाशित झालेला मराठी सिनेमा ×× (२)

११) मद्य, दारू, मदिरा ×× (२)

१२) विधीमंडळाचे कनिष्ठ सभागृह असेंब्ली ××××× (५)

१३) डोळ्यात घालायचे औषध, काजळ ××× (३)

१५) महाराष्ट्राची राजधानी ××× (३)

## ‘सुवार्ता’ शब्दकोडे क्रमांक - १४ चे उत्तर

**आडवे शब्द :-** १) तुकाराम मुंढे ७) कास ८) कडक ९) राव १०) रनर ११) सडा १२) के १३) क्रांती १५) रब १६) सनातन १८) दारे १९) हमाल २०) सार २१) रज २२) आसरा २३) ई

**उभे शब्द :-** २) कासव ३) मकर संक्रात ४) मुंडन ५) ढेकर ६) मार्कुस डाबरे ११) सरदार १४) तीन १६) माज १७) नाल १९) हर २०) सारा

# हास्यरंग

## बचत

दीपू : डॅडी, डॅडी! आज मी दहा रुपये वाचवले.

डॅडी : ते कसे रे?

दीपू : शाळेत जाताना मी की नाही, एस.टी.बसच्या मागून धावत गेलो. त्यामुळे बसच्या तिकिटाचे दहा रुपये वाचले.

डॅडी : मूर्खा, तुला अक्कल कधी येणार! जर तू बसऐवजी रिक्षाच्या मागे धावला असताच; तर चांगले पंचवीस रुपये नसते का वाचवता आले असते!

## एकच उत्तर

सम्राट अकबराने दरबारात बिरबलाला तीन प्रश्न विचारले, अट मात्र एक होती. ह्या तिन्ही प्रश्नांचे उत्तर मात्र एकच असायला हवे.

प्रश्न : दूध का ऊतू जाते? पाणी का वाहते? भाजी का करपते?

बिरबलने उत्तर दिले, ‘व्हॉट्सॲप’मुळे.

## स्वप्न

पत्नी : सकाळी, सकाळी कुठे  निघालात?

पती : मी माझं बँक अकाऊंट बंद करायला बँकेत चाललोय.

पत्नी : अचानक बँक अकाऊंट बंद! काय झालं काय?

पती : काल स्वप्नात मला  तू खूप मारतेयस असं दिसलं.

पत्नी: ह्या स्वप्नाचा आणि बँक अकाऊंटचा काय संबंध?

पती : त्या बँकेचे ब्रीदवाक्य आहे, ‘‘आम्ही तुमच्या स्वप्नांना सत्यात उतरवतो.’’

## शिट्टी

रामू गडी सारखा शिट्टी मारायचा. हे पाहून त्याची मालकीण म्हणाली, ‘‘रामू, काम करताना शिट्टी वाजवू नये, हे तुला कळत नाही का?’’ ह्यावर रामू म्हणाला, ‘‘पण बाईसाहेब, मी नुसती शिट्टीच वाजवतोय. काम करतच नाही.’’

मनन-चिंतन मंथन

# जीवनातील लक्ष नि आयुष्याचे लक्ष्य

अकबर (१५४२-१५५६-१६०५) दिल्लीच्या तक्तावर विराजमान झाला. तो एक गुणग्राही राजा होता. सर्वधर्म समावेशक वृत्ती हे त्याच्या कारकिर्दीचे वैशिष्ट्य मानले जाते. कल्पकता, कलावंत, कलाकार व कारागीर ह्यांची तो कदर करीत असे, दखल घेत असे. त्याच्या दरबारात तज्ज्ञ, सल्लागार व जाणते नेते अशी 'नवरत्ने' होती, नऊ जबाबदार मंत्री होते. उदाहरणार्थ, तानसेन (रामतनू पांडे) हिंदुस्तानी शास्त्रोक्त संगीततज्ज्ञ, राजा तोडरमल महसूल व भूमापनाच्या पद्धतीचे प्रणेते, बिरबल (महेश दास) हे विलक्षण बुद्धी नि प्रसंगावधानासाठी प्रसिद्ध होते. त्याकाळी घडलेली ही गोष्ट...

राजे अकबर नवरत्नांचा वेळोवेळी सन्मान करीत. परंतु महाराजांना बिरबल (१५२८-१५८६) जास्त आवडतो, असे एका मंत्र्याला वाटू लागले. ते तो येन केन प्रकारेण व्यक्त करू लागला. चाणाक्ष महाराजांच्या तीक्ष्ण नजरेतून ते काही सुटले नाही... एके दिवशी अकबर राजाने त्या मंत्र्याला विचारले, ''तुला काही खटकते का?'' त्यावर तो मंत्री म्हणाला, ''महाराज, तुम्ही सुज्ञ आहात, पण तरीसुद्धा सांगण्याची हिम्मत करतो : कोणतेही काम आले की नेहमी बिरबलच का? आमच्यावरही काही कामगिरी सोपवा की...?'' राजे अकबर काहीसे दचकलेच, तरी म्हणाले, ''ज्या त्या कामाप्रमाणे मी जबाबदारी सोपवित असतो. तरीसुद्धा तू तयारी दाखवलीच आहेस तर ये. माझ्या बाजूला बैस. दरबारात आज जबाबदारी तुझी.'' मोठ्या उत्साहाने तो मंत्री राजाजवळ येऊन बसला.

काही वेळाने एक बैलगाडी चालवित एक माणूस रस्त्यावरून जाताना दिसला. महाराजांनी त्या मंत्र्याला सांगितले, ''कोणाची गाडी चालली आहे? बघ बरे.'' मंत्र्याने धूम ठोकली, गाडीवाल्याला विचारले, धावत-धावत परतला आणि गाडीवाल्याचे नाव सांगितले... महाराजांनी मंत्र्याला दुसऱ्यांदा विचारले, ''कोठून आला, कोठे जातोय तो?'' मंत्र्याने गाडीवाल्याला विचारले, धापा टाकत परतला आणि प्रस्थान व गंतव्य स्थळाची माहिती दिली. महाराजांनी मंत्र्याला तिसऱ्यांदा विचारले, ''गाडीवाल्याकडे परवाना आहे का?'' ह्यानंतर महाराजांनी मंत्र्याला चौथ्यांदा, पाचव्यांदा, दहा-बारा, अनेक वेळा प्रश्न विचारायला पाठवले : परवाना अधिकृत आहे का, कधी काढला, कधी संपणार, गाडीत काय माल आहे, इत्यादी...

आता मात्र मंत्री थकला, वैतागला नि महाराजांना म्हणाला, ''मी प्रश्न विचारला म्हणून तर तुम्ही मला असे वागवित नाहीत ना?'' राजा अकबर शांतपणे म्हणाला, ''नाही. उलट ही सगळी साध्यंत माहिती तू एका दमात गोळा करू शकला असतास. तरी, आता आराम कर'', असे म्हणून त्यांनी बिरबलला बोलावले नि बैलगाडीची माहिती आणायला सांगितले. बिरबल गेला नि त्याने एका फेरीत सर्व माहिती गोळा केली : गाडी कोणाची, कोण नेतय, गाडीत काय माल आहे, त्यासाठी परवाना आहे का, तो अधिकृत आहे का, गाडी परत येणार का, ह्यात तस्करी आहे का, इत्यादी. एका दमात त्याने सारी माहिती सादर केली. त्यामुळे तो मंत्री चकित झाला. त्याचा हेवा, द्वेष, मत्सर विरला. त्यांची जागा कौतुक, प्रेम व अभिमानाने घेतली होती. त्या मंत्र्यानेच ह्या बाबतीत वशिलेबाजी नाही हे कबूल केले तसेच बिरबलच्या हजरजबाबीपणाची स्तुती करीत त्याची शिफारस केली.

एखादी व्यक्ती चमकू लागली की काही जण अस्वस्थ होतात, त्यांचा जळफळाट सुरू होतो. परंतु ह्या सर्व नकारार्थी भावनांच्या तळाशी त्या यशस्वी व्यक्तीच्या गुणाबद्दल मत्सरी माणसाला आकर्षण असते, ओढ असते, आपण ते प्राप्त करू शकत नाहीत ह्याबद्दल वैषम्याची भावना असते. मात्र हेवा, द्वेष, मत्सर ह्यावर काही लोक मात करतात अशा व्यक्ती त्या माणसाच्या यशाचे गमक, मर्म, मूळ शोधतात. त्याबद्दल जाहीरपणे बोलू लागतात नि यथावकाश तेच नव्हे, तशाच प्रकारचे यश प्राप्त करतात. किंबहुना, तक्रार-तुलना करीत न बसता, स्वत:ची बलस्थाने सबळ करू लागतात, मर्यादा कमी करून इतिहास घडवू लागतात.

वस्तुत: काही माणसांचे जीवन हिमनगासारखे बनते. त्यांना त्यांच्या जीवनाचा अर्थ १/१० इतकाच कळतो, समजतो नि वापरला जातो. मानवी जीवनाच्या उर्वरित ९/१० भागांचा त्यांनी विचार केलेला नसतो, वेध घेतलेला नसतो; त्यामुळे त्याचा शोध नि बोध त्यांना होतच नाही मग इतरांना कुठून होणार? आणि इतरांनी त्यांच्या जीवनात त्याचा वापर-विनियोग केला की अशा व्यक्तींचा जळफळाट सुरू होतो, अस्वस्थता वाढू लागते नि ते वेगवेगळ्या प्रकारे प्रकट होऊ लागते.

म्हणूनच ज्यांच्याबद्दल आपल्याला हेवा, द्वेष, मत्सर वाटतो अशा व्यक्तींमध्ये (१) काय चांगले आहे (२) त्यांच्या यशाचे गुपित, गमक, रहस्य कशात आहे नि (३) त्यांच्याकडून (माझ्या क्षमता व मर्यादा लक्षात घेऊन) काय शिकता येईल ह्यावर लक्ष केंद्रित केले तर खचितपणे आपल्याला आपल्या आयुष्याचे लक्ष्य गाठता येईल.

* **'लक्ष'** हे सध्याच्या क्षणी आपले चित्त, ध्यास, ध्यान कुठे केंद्रित करते त्याबरोबर जोडलेले असते. ते दैनंदिन जीवन, आपली निवड नि वर्तमानाचा भाग असते.

* **'लक्ष्य'** हे आपल्या आयुष्याचे अंतिम ध्येय वा उद्दिष्ट ह्याच्याशी निगडित असते. ते भविष्याशी संबंधित असते. आयुष्यात काय करायचे, बनायचे वा मिळवायचे आहे ते 'लक्ष्य' निश्चित करते..

**- फा. (डॉ.) जोएल डिकुना**

## उपासना वर्ष दिनदर्शिका : नोव्हेंबर २०२६

वाचनग्रंथ : रवि., सोहळे, सण - पहिले वर्ष; सप्ताह - दुसरे वर्ष

१. **सामान्यकाळ ३१वा रविवार**
**सर्व संतांचा सोहळा**
प्रकटी ७:२-४,९-१४
स्तोत्र २४:१-६
१योहान ३:१-३
मत्तय ५:१-१२

२. **सर्व मृत भाविकांचा स्मृतीदिन**
प्रज्ञाग्रंथ ३:१-९
स्तोत्र २३:१-६
रोम ६:३-९ किंवा ५:५-११
योहान ६:३७-४०

३. फिलिप्पे. २:५-११
स्तोत्र २२:२६-३२
लूक १४:१५-२४

४. फिलिप्पे. २:१२-१८
स्तोत्र २७:१,४,१३-१४
लूक १४:२५-३३

५. फिलिप्पे. ३:३-८
स्तोत्र १०५:२-७
लूक १५:१-१०

६. फिलिप्पे. ३:१७-४:१
स्तोत्र १२२:१-५
लूक १६:१-८

७. फिलिप्पे. ४:१०-१९
स्तोत्र ११२:१-२,५-६, ८, ९
लूक १६:९-१५

८. **सामान्यकाळ ३२वा रविवार**
प्रज्ञाग्रंथ ६:१२-१६
स्तोत्र ६३:२-८
१थेस्सलनी ४:१३-१८
मत्तय २५:१-१३

९. **लॅटरन महामंदिराचे समर्पण-सण**
यहेज्केल ४७:१-९,१२
स्तोत्र ४६:२-३,५-६,८-९
१करिंथ ३:९-१३,१६-१७
योहान २:१३-२२

१०. **संत लिओ द ग्रेट-स्मृती**
तीताला पत्र २:१-८,११-१४
स्तोत्र ३७:३-४, १८, २३, २७, २९
लूक १७:७-१०

११. **टूर्सचा संत मार्टिन-स्मृती**
तीताला पत्र ३:१-७
स्तोत्र २३:१-६
लूक १७:११-१९

१२. फिलेमोनला पत्र ७-२०
स्तोत्र १४६:६-१०
लूक १७:२०-२५

१३. २ योहान ४-९
स्तोत्र ११९:१-२,१०-११, १७-१८
लूक १७:२६-३७

१४. ३योहान १:५-८
स्तोत्र ११२:१-६
लूक १८:१-८

१५. **सामान्यकाळ ३३वा रविवार**
नीतीसुत्रे ३१:१०-१३, १९-२०, ३०-३१
स्तोत्र १२८:१-५
१थेस्सलनी ५:१-६
मत्तय २५:१४-३०

१६. प्रकटी १:१-४,२:१-५
स्तोत्र १:१-४,६
लूक १८:३५-४३

१७. **हंगेरीची संत एलिझाबेथ-स्मृती**
प्रकटी ३:१-६,१४-२२
स्तोत्र १५:२-५
लूक १९:१-१०

१८. **संत पेत्र व संत पॉल ह्यांच्या महामंदिराचे समर्पण**
प्रे.कृ. २८:११-१६,३०-३१
स्तोत्र ९८:१-६
मत्तय १४:२२-३३

१९. प्रकटी ५:१-१०
स्तोत्र १४९:१-६,९
लूक १९:४१-४४

२०. प्रकटी १०:८-११
स्तोत्र ११९:१४,२४,७२, १०३, १११,१३१
लूक १९:४५-४८

२१. **पवित्र मरियेचे मंदिरात समर्पण**
जखऱ्या २:१०-१३
स्तोत्र : लूक १:४६-५५
लूक १२:४६-५०

२२. **सामान्यकाळ ३४वा रविवार**
**ख्रिस्त राजाचा सण**
यहेज्केल ३४:११-१२, १५-१७
स्तोत्र २३:१-३,५-६
१करिंथ १५:२०-२६,२८
मत्तय २५:३१-४६

२३. प्रकटी १४:१-५
स्तोत्र २४:१-६
लूक २१:१-४

२४. **संत ॲण्ड्र्यू डंग आणि सहकारी - स्मृती**
प्रकटी १४:१४-१९
स्तोत्र ९६:१०-१३
लूक २१:५-११

२५. प्रकटी १५:१-४
स्तोत्र ९८:१-३,७-९
लूक २१:१२-१९

२६. प्रकटी १८:१-२,२१-२३, १९:१-३,९
स्तोत्र १००:१-५
लूक २१:२०-२८

२७. प्रकटी २०:१-४,११-२१:२
स्तोत्र ८४:३-६,८
लूक २१:२९-३३

२८. प्रकटी २२:१-७
स्तोत्र ९५:१-७
लूक २१:३४-३६

२९. **आगमनकाळ-पहिला रविवार**
यशया ६३:१६-१७, ६४:१,३,८
स्तोत्र ८०:२-३,१५-१६, १८-१९
१करिंथ १:३-९
मार्क १३:३३-३७

३०. **संत ॲण्ड्र्यू-सण**
रोम १०:९-१८
स्तोत्र १९:२-५
मत्तय ४:१८-२२

### डिसेंबर २०२६

१. यशया ११:१-१०
स्तोत्र ७२:१-२,७-८, १२-१३,१७
लूक १०:२१-२४

२. यशया २५:६-१०
स्तोत्र २३:१-३,५-६
मत्तय १५:२९-३७

३. **संत फ्रान्सिस झेविअर-सण**
यिर्मया १:४-८
स्तोत्र ७१:१-६,१५,१७ ,
२करिंथ ४:७-१५
लूक १०:१-१६

४. यशया २९:१७-२४
स्तोत्र २७:१-४,१३-१४
मत्तय ९:२७-३१

५. यशया ३०:१९-२१,२३-२६
स्तोत्र १४७:१-६
मत्तय ९:३५-१०:१,६-८

६. **आगमनकाळ -दुसरा रविवार**
यशया ४०:१-५,९-११
स्तोत्र ८५:९-१४
२पेत्र ३:८-१४
मार्क १:१-८

७. यशया ३५:१-१०
स्तोत्र ८५:९-१४
लूक ५:१७-२६

८. **धन्य कुमारी मरियेचा निष्कलंक गर्भसंभव - सोहळा**
उत्पत्ती ३:९-१५,२०
स्तोत्र ९८:१-४
इफिस १:३-६,११-१२
लूक १:२६-३८

## एक महिन्याची आठवण

*''कारण जर आपण जगतो तर प्रभूकरिता जगतो आणि जर आपण मरतो तर प्रभूकरिता मरतो. म्हणून आपण जगलो किंवा मेलो तरी आपण प्रभूचेच आहोत.''*

(रोमकरांस पत्र १४:८)

*आमच्या प्रेमळ डॅडींना प्रभू येशू ख्रिस्ताने स्वर्गात स्थान द्यावे, हीच प्रभूचरणी विनम्र प्रार्थना!*

**ख्रिस्तवासी पिटर फ्रान्सिस घोन्सालवींस**

मेरोडी, मर्सेस

जन्म : ०५/०५/१९५१; मृत्यू : ०७/१०/२०२६

**एक महिन्याची मिस्सा : रविवार दिनांक ०८/११/२०२६ सकाळी ७.१५ वाजता, दयामाता चर्च, मर्सिस.**

**शोकाकुल :-**

**पत्नी : लिना पिटर घोन्सालवीस**

**मुलगा व सून : लेरॉय व श्वेता घोन्सालवीस**

**मुलगी व जावई : पूनम व रॉसी सिरवेल**

**नातवंडे : सलेस्ट, आयझाया व लिऑर**

---

**प्रेमळ स्मरणार्थ** | **१५ वर्षांची आठवण** | **प्रेमळ स्मरणार्थ**

**ख्रिस्तवासी जोसेफ आलेक्स नुनीस**

जन्म : २२/१२/१९३०

मृत्यू : ०१/०९/२०२३

**ख्रिस्तवासी स्तेला नुनीस**

वाघमारेवाडी, गिरीज

जन्म : ११/०३/१९३६

मृत्यू : २०/११/२०११

**ख्रिस्तवासी कॉसमॉस नुनीस**

जन्म : ०४/११/१९७३

मृत्यू : १९/०२/२०१०

***प्रभू येशू म्हणाला, ''पुनरुत्थान व जीवन मीच आहे. जो माझ्यावर विश्वास ठेवतो, तो मेला तरी जगेल.''***

(योहान ११:२५)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुम्हांला चिरंतन शांती लाभो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**तुमचेच शोकाकुल नुनीस कुटुंबीय**

## प्रेमळ स्मरणार्थ

## ख्रिस्तवासी सिसिलिया सायमन डाबरे

'जेरेमिएल' बंगलो, भुईगाव, मारियानगर

जन्म : ०९/११/१९६१; मृत्यू : २८/०७/२०२६

***प्रभू परमेश्वर म्हणतो, ''पुनरुत्थान व जीवन मीच आहे. जो माझ्यावर विश्वास ठेवतो, तो मेला असला तरी जगेल.''***

(योहान ११:२५)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुला चिरंतन शांती लाभो,*

*हीच ईश्वरचरणी विन्रम प्रार्थना!*

**जॉर्डन डाबरे व कुटुंबीय**

## प्रेमळ स्मरणार्थ

**ख्रिस्तवासी कॅजीटन मायकल कोलासो**
माणिकपूर तलाव
जन्म : २९/०१/१९५८; मृत्यू : २९/०६/२०२०
***''नीतिमानांचा मृत्यू परमेश्वराच्या नजरेत मौल्यवान असतो.''***
(स्तोत्र ११६:१५)
*हे प्रभू परमेश्वरा तुझ्या स्वर्गीय नंदनवनात आमच्या डॅडींना चिरंतन शांती दे हीच तुजचरणी विनम्र प्रार्थना!*
**पत्नी : मेरी कॅजीटन कोलासो;**
**मुलगी : रेचल कॅजीटन कोलासो;**
**मुलगा व सून : रॉय व अल्टीना कोलासो;**
**नातू : रोवेन रॉय कोलासो**

## वार्षिक स्मृती

**ख्रिस्तवासी जोसेफ ॲन्थोनी डिकूना**
बेंडाळेवाडी, मर्सिस
जन्म : १३/१२/१९४२; मृत्यू : २७/११/२०२५
एक वर्षाची मिस्सा : रविवार दिनांक २९/११/२०२६ सकाळी ७.१५ वाजता, मर्सिस चर्च.
***प्रभू परमेश्वर म्हणतो, ''माझ्या योजना ह्या तुमच्या योजना नव्हेत आणि माझे मार्ग हे तुमचे मार्ग नव्हेत.''***
(यशया ५५:८)
*हे प्रभू, आमच्या पप्पांना तुझ्या स्वर्गीय नंदनवनात सुखी ठेव!*
**पत्नी :मार्तीन (शांता) डिकूना; मुले-सुना : जेरी-ब्रिनल, ॲश्ली-स्विडल; मुलगी-जावई : प्रिया-रोशन व नातवंडे**

## एक महिन्याची आठवण

**ख्रिस्तवासी मर्सियाना (मर्शान) फ्रान्सिस लोपीस**
कातरवाडी, शिरलय
जन्म : ०८/०६/१९५६; मृत्यू : ०४/१०/२०२६
एक महिन्याची मिस्सा : रविवार दिनांक ०१/११/२०२६ सकाळी ७.००वा.,अवर लेडी ऑफ लुर्ड्स चर्च, शिरलय.
***प्रभू येशू म्हणतो, ''जेथे मी आहे तेथे त्यांनीही असावे, अशी माझी इच्छा आहे.''***
(योहान १७:२४)
**पती : श्री. फ्रान्सिस लोपीस; मुलगा-सून : राहूल-हेझल मुलगी-जावई : रेनीता-अभिषेक रॉड्रीक्स; नातवंडे : नॅझ, लायझा, मायरा, आयरीस, लोपीस व डिमेलो कुटुंबीय**

## २५ वर्षांची आठवण

**ख्रिस्तवासी सांतान (बेबी) आल्बर्ट परेरा**
ओळंबवाडी, पापडी
जन्म : ०२/०२/१९३५; मृत्यू : १६/११/२००१
***''नीतिमानांचा मृत्यू परमेश्वराच्या नजरेत मौल्यवान असतो.''***
(स्तोत्र ११६:१५)
*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुला चिरंतन शांती लाभो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*
**बिशप आयवन परेरा व कुटुंबीय**

**प्रेमळ स्मरणार्थ** **तीन महिन्यांची आठवण**

**ख्रिस्तवासी अपलन फ्रान्सिस लोपीस**

**ख्रिस्तवासी प्रशांत फ्रान्सिस लोपीस**

माणिकपूर

जन्म : १५/०६/१९५० जन्म : १०/०४/१९८१
मृत्यू : २५/०९/२०२४ मृत्यू : २७/०८/२०२६

तीन महिन्यांची मिस्सा : मंगळवार दिनांक २४/११/२०२६
सकाळी ७.००वाजता, सेंट मायकल चर्च, माणिकपूर.

**''जे आत्म्याने लीन ते धन्य; कारण स्वर्गाचे राज्य त्यांचे आहे जे अंत:करणाचे शुद्ध ते धन्य; कारण ते देवाला पाहतील.''**
(मत्तय ५:३,८)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुम्हांला चिरंतन शांती लाभो,*
*हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**प्रमिला लुकस लोपीस व कुटुंबीय**

---

**वार्षिक स्मृती**

**ख्रिस्तवासी मायकल जॉन डाबरे**

न्यू डाबरेवाडी, गिरीज

जन्म : २९/०५/१९४८; मृत्यू : १८/११/२०२५
वार्षिक मिस्सा : शनिवार दिनांक २१/११/२०२६
सकाळी ७.००वाजता, संत फ्रान्सिस झेवियर चर्च, गिरीज.

**''मी देहाने दूर आहे तरी आत्म्याने तुम्हांजवळ आहे आणि प्रभूवरील तुमचा विश्वास पाहून आनंद करीत आहे.''**
(कलस्सै. २:४-५)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवात तुम्हाला चिरंतन शांती लाभो,*
*हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**शोकाकुल : डाबरे व परेरा कुटुंबीय**

---

**प्रेमळ स्मरणार्थ**

**ख्रिस्तवासी आग्नेस मार्शल फर्नांडीस**

सोनारभाट, पापडी

जन्म : १८/०१/१९४५; मृत्यू : १५/०९/२०२६

**''जे आत्म्याने लीन ते धन्य; कारण स्वर्गाचे राज्य त्यांचे आहे जे अंत:करणाचे शुद्ध ते धन्य; कारण ते देवाला पाहतील.''**
(मत्तय ५:३,८)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुला चिरंतन शांती लाभो,*
*हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**शोकाकुल पती : मार्शल अंतोनी फर्नांडीस व सर्व कुटुंबीय**

---

**वीस वर्षांची आठवण**

**ख्रिस्तवासी वॉल्टर डिमेलो**
किरावली, पाली
जन्म : १७/०५/१९५०
मृत्यू : १६/११/२००६

**ख्रिस्तवासी पॉल डिमेलो**
पोखरणी, पापडी
जन्म : २०/०७/१९२३
मृत्यू : ०७/१०/२००६

**''जे आत्म्याने लीन ते धन्य; कारण स्वर्गाचे राज्य त्यांचे आहे. जे अंत:करणाने शुद्ध ते धन्य; कारण ते देवाला पाहतील.''**
(मत्तय ५:३,८)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुम्हांला चिरंतन शांती लाभो,*
*हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**कुटुंबीय**

JEWEL OF CHIRABAZAR
HALLMARK JEWELLERY 100%
परंपरेचा साज,
सौंदर्याची ओळख..
या दिवाळीत सणासुदीच्या प्रत्येक क्षणाला सोन्याची खास साथ!
SPECIAL OFFER
EXTENDED
फक्त
8%
MAKING CHARGES
Till 31st December 2026
Happy Diwali
MAY THIS FESTIVAL OF LIGHTS BRING PROSPERITY, HAPPINESS AND SHINE TO YOUR LIFE.
Showroom will be open on Every Sunday
from 25th October to 20th December 2026 | Time : 10.00 am to 5.00 pm
MK JEWELLERS
SUNDAY CLOSED
Shah & Co.™
528, Chira Bazar, Mumbai - 400 002.
Tel. 2205 6380, 2205 1124
OUR NEW LANDMARK
Now Facing
Kalbadevi Metro Station
77180 19981 | Email : mkshahjewellers@gmail.com
We have no branch at Virar, Vasai & Mumbai
Our Showroom is very Nearby Marine Lines Station (Mumbai)
VALET PARKING

RNI MAHMAR - 11692 / 1960

हे मासिक, मालक, मुद्रक, सुवार्ता ट्रस्ट ह्यांनी मॅन्युएल प्रिन्ट, वालीव फाटा, सातिवली, ता. वसई, जि. पालघर -४०१ २०८ महाराष्ट्र येथून छापून सुवार्ता कार्यालय, जीवन दर्शन केंद्र, गिरीज, ता. वसई, जि. पालघर, जि. ४०१ २०१ येथून प्रकाशित केले. संपादक : फा. डॉ. जोएल डिकुना.